<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड</u>

**( दि. २४.३.२०१५ ची तहकुब सर्व साधारण सभा )**

मंगळवार दि. ३१.३.२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या नविन पम्पींग स्टेशन येथे भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. सदस्य उपस्थित होते.

**मा.अ.सत्तार अ.गफुर, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| चव्हाण आनंद शंकरराव | कदम गंगाबाई नारायणराव |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | स्वामी शैजला किशोर |
| पवळे उमेश देवराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| पांढरे स्नेहा सुधाकर | फारुख अली खा इलियाज खॉं |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | आनेवार गंगासागर संदीप |
| भवरे किशोर दामोधर | कदम शीला कदम |
| प्रमोद मुरलीधराव खेडकर | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| गुर्रम विनयकुमार जगदिश | चव्हाण श्रध्दा सुशिल |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | उमरेकर अशोक रावण |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | रजियाबेगम अयुबखान |
| गाडगे शंकर जयवंतराव | गायकवाड अंजली सुरेशराव |
| देशमूख बालासाहेब गंगाधराव | स.इतरत फातेम स.मजहुर हुसेन |
| गफारखान गुलाम महमंद खान | धबाळे गणपतराव भिवाजी |
| अनुजा अमितसिंह तेहरा | ज्योती महेंद्र खेडकर |
| गिल सरजितसिंध पंजाबसिंघ | स.शेर अली स.महेबूब अली |
| फारुख हुसेन कासिम साब | राखेवार सतिष शेषप्पा |
| कुरेशी शफी अहेमद | अ.लतिफ अ.मजीद |
| जकिया बेगम स.मुखतार | गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल |
| खोमणे सुदर्शना महेश | बावजीर शे. हबीब शे. अब्दुल्ला |
| रावत दिपकसिंह काशिनाथसिंह | गायकवाड वैजयंती भिमराव |
| मोरे संजय गंगाधरराव | अभिषेक सौदे |
| काकडे सिंधू पांडूरंग | देशमूख मंगला गजानन |
| चिखलीकर संदिप सुभाषराव | विनय विश्वांभरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | घोगरे इंदूबाई शिवाजीराव |
| कदम विश्वास बालाजी | ऍड.बन शाम वामनराव |
| काबरा रामनारायण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री अ.सत्तार अ,गफूर, हे होते. तसेच श्री सुशील खोडवेकर, आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (प्रशासन), सौ.मिरा कुलकर्णी, मुख्य वैद्याकिय आरोग्याधिकारी,श्री मुख्य लेखा परिक्षक श्री आर.एस.कोलगणे श्री विजय मुंढे, स.आयुक्त आरोग्य, श्री गिरीष कदम, अभियंता, श्री अंधारे, अभियंता व महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त/क्षेत्रिय अधिकारी व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले.

**सरजितसिंघ गिल** — नांदेड दक्षिणचे आमदार व महानगरपालिकेचे माजी महापौर श्री ओमप्रकाशजी पोकर्णा याच्या मातोश्री दगडाबाई गणेशलाल पोकर्णा याचे तसेच महानगरपालिकेचे स.सदस्य श्री गुरुमितसिंघ नवाब याच्या दादीमाचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झालेले असल्यामूळे त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**विरेंद्रसिघ गाडीवाले** — या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**ठराव क्र.२००** **ठ रा व**

दक्षिण नांदेडचे माजी आमदार तथा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे माजी महापौर श्री ओमप्रकाश पोकर्णा यांच्या मातोश्री दगडाबाई गणेशलाल पोकर्णा यांचे वृध्दापकाळाने कालच दुः खद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते भावपुर्ण श्रदांजली अर्पण करते व त्यांच्या कुटुंबियावर ओढावलेल्या दु:खात सहभागी होते.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे स. सदस्य श्री गुरुमितसिंघ नवाब यांच्या दादीमा याचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते भावपुर्ण श्रदांजली अर्पण करते व त्यांच्या कुटुंबियावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**दिपकसिंह रावत** महानगरपालिकेच्या मलेरिया विभागातील कर्मचारी मरीबा कांबळे यांचेही अकाली दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांनाही भावुपर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**महापौर** महानगरपालिकेचे मलेरिया विभागातील कर्मचारी मरीबा कांबळे याचेही दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

**ठराव क्र.२०१** **ठ रा व**

नांदेड वाधाळा शहर महानगरपालिका मलेरिया विभागातील कर्मचारी मरीबा कांबळे यांचे अकाली दुः खद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते भावपुर्ण श्रदांजली अर्पण करते व त्यांच्या कुटुंबियावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**सरजितसिंघ गिल** नांवामनपाकेस १३ व्या वित्त आयोगा अंतर्गत पुर्नवसीत अबचलनगर कॉलनी भागात मलनिस्सारण लाईन टाकणेसाठी रु.१५० लक्षाची तसेच नंदीग्राम हौसिंग सोसायटी मध्ये मलनिस्सारण लाईन विस्तारीकरणासाठी ५० लक्षाची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** श्री सरजितसिंघ गिल यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** विशेष बाब म्हणून श्री सरजितसिंघ गिल यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास मान्य्ता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२०२** **ठ रा व**

नांवामनपाकेस १३ व्या वित्त आयोगा अंतर्गत पुर्नवसीत अबचलनगर कॉलनी भागात मलनिस्सारण लाईन टाकणेसाठी रु.१५० लक्षाची तसेच नंदीग्राम हौसिंग सोसायटी मध्ये मलनिस्सारण लाईन विस्तारीकरणासाठी ५० लक्षाची प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुदर्शना खोमणे** स्वातंत्र सैनिक माजी नगरसेवक व प्रजावाणीचे जेष्ठ संपादक याचे शहराच्या विकासासाठी खुप मोठे योगदान राहिलेले आहे त्यामूळे त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ महानगरपालिकेच्या रस्त्याला, इमारतीला नांव देण्याबाबत चर्चा झाली होती .त्यांच्या कुटुंबियानी नाना नानी पार्क मध्ये जेष्ठ नागरीकांकरीता बांधण्यात आलेल्या भवनास कै. सुधाकरराव डोइफोडे असे नाव देण्यास संमती दिलेली असल्यामूळे नाना नानी पार्क मध्ये जेष्ठ नागरीकांकरीता बांधण्यात आलेल्या भवनास कै. सुधाकरराव डोइफोडे असे नांव देण्याचा प्रस्ताव मी मांडत आहे त्यास मान्यता देण्यात यावी.

**आनंद चव्हाण** नांदेड शहरातील कै.सुधाकररावजी डोईफोडे हे एक प्रतिष्ठीत व प्रतिभावंत जेष्ठ पत्रकार स्वातंत्र सेनानी व नांदेड जिल्हा जेष्ठ नागरीक संघटनेचे सल्लागार होते त्यामूळे नांवामनपा तर्फे नांदेठ शहरात जेष्ठ नागरीकांसाठी शिवाजीनगर येथील नाना नानी पार्क मध्ये बांधण्यात आलेल्या जेष्ठ नागरीक भवनास कै. सुधाकररावजी डोईफोडे स्मृती जेष्ठ नागरीक भवन असे नाव देण्यात यावे.

**विनय पाटील** प्रभाग क्र.३९ मध्ये महानगरपालिकेच्या ओपन स्पेस मध्ये उद्यान विकसित करण्यात आलेले असून या उद्यानास महाराष्टाचे माजी मुख्यमंत्री तथा मराठवाडयाचे शिल्पकार,सिडको वसाहतीचे जनक कै.शंकररावजी चव्हाण उद्यान असे नांव देण्यात यावे तसेच या उद्यानात सिडको हडको भागातील विद्यार्थ्याकरीता अभ्यासिका व वाचनालयाच्या इमारतीचे बांधकामाच होत असून असून या अभ्यासिका व वाचनालयास कै.शंकररावजी चव्हाण यांचे नांव देण्यात यावे असा माझा प्रस्ताव आहे यास सभागृहाने मान्यता द्यावी.

**मंगल देशमूख** श्री विनय पाटील सभापती, स्थायी समिती यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** सौ.सुदर्शना खोमणे व श्री विनय पाटील यांनी नांव देण्याचे जे प्रस्ताव मांडले त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२०३** **ठ रा व**

स्वातंत्र सैनिक तत्कालिन नांदेड नगरपालिकेचे नगरसेवक व प्रजावाणी वृत्तपत्राचे जेष्ठ संपादक कै.सुधाकररावजी डोईफोडे यांनी मराठवाडा रेल्वे संषर्घ समितीचे अध्यक्ष असतांना मराठवाडयातील अनेक रेल्वेचे प्रश्न मार्गी लावलेले आहे तसेच नांदेड शहराचा विकासासाठी त्यांचे खुप मोठे योगदान राहिलेले आहे.शहरातील नागरीकांना त्यांनी केलेल्या कार्याची आठवण रहावी म्हणून त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमार्फत शिवाजीनगर भागात नाना नानी पार्क मध्ये जेष्ठ नागरीकां करीता बांधण्यात आलेल्या भवनास **कै. सुधाकररावजी डोईफोडे स्मृती जेष्ठ नागरीक भवन** असे नांव देण्यास ही नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

तसेच सिडको हडको भागातील प्रभाग क. ३९ मध्ये महानगरपालिकेच्या मोकळया जागेत नव्याने विकसित करण्यात आलेल्या उद्यानास महाराष्टाचे माजी मुख्यमंत्री तथा मराठवाडयाचे शिल्पकार,सिडको वसाहतीचे जनक **कै.शंकररावजी चव्हाण उद्यान** असे नांव देण्यास तसेच याच उद्यानात बांधण्यात येत असलेल्या अभ्यासिका व वाचलयास **कै.शंकररावजी चव्हाण अभ्यासिका व वाचनालय** असे नांव देण्यास ही नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**स.शेर अली** केंद्र शासनाची जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान (जेएनएनयुआरएम) योजना चांगल्या प्रकारे राबवून या योजनेतील सर्व विकासाची कामे लवकरात लवकर पुर्ण करण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करुन महानगरपालिकेस सहकार्य केले त्याबध्दल महानगरपालिकेचे सल्लागार (कन्सलटंट) आयएलएफएसचे प्रमुख श्री डि.के.सिंघ व त्यांचे सहकारी याचे अभिनंदन करुन त्यांचा प्रशस्ती पत्र देवून गौरंव करण्यात यावा. असा प्रस्ताव आहे.

**सरजितसिंध गिल** श्री शेर अली यांनी मांडलेल्याप्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री शेर अली यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. व हा ठराव यांच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२०४** **ठ रा व**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत केंद्र शासनाची जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान (जेएनएनयुआरएम) योजना चांगल्या प्रकारे राबवून या योजनेतील सर्व विकासाची कामे लवकरात लवकर पुर्ण करण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करुन महानगरपालिकेस सहकार्य केले त्याबध्दल महानगरपालिकेचे सल्लागार (कन्सलटंट) आयएलएफएसचे प्रमुख श्री डि.के.सिंघ व त्यांचे सहकारी याचे अभिनंदन करुन महानगरपालिकेचे वतीने त्याचा प्रशस्ती पत्र यथोचितगौरंव करण्यात यावा असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२५** **प्रस्ताव**

नांवामनपा हध्दीतील प्रभाग क्र.३७ कौठा परिसरात अटोस्टॉप नसल्यामूळे अटोधारक कोणत्याही ठिकाणी उभे करुन वाहतुकीस अडथळा निर्माण करीत आहेत करीता नागरीकांच्या व अटोधारकाच्या सुविधासाठी कौठा परिसरात अहिल्याबाई होळकर चौकात,रविनगर चौकात, जून्या कौठयास जाताना लागणा-या चौकात व नागार्जूना शाळासमोरील रस्त्याच्या दोन्ही बाजूने प्रत्येकी ५ अटोकरीता अटोथांबे जाहिर करण्यास मान्यता देणे बाबत.

**सुचकः-** अभिषेक सौदे **अनुमोदकः-** सूंदरलाल किशनलाल गुरुखुर्दे

**सिंधुताई काकडे** या प्रस्तावास विरोध नाही परंतु रविनगर चौकात, जून्या कौठयास जाताना लागणा-या चौकात नागरीकाचे घरासमोर ऍटो उभे केल्यास नागरीकांना त्रास होइल त्यामूळे त्याऐवजी जून्या कौठयातून नविन गोवर्धनघाट पुलाकडे येणा-या रस्त्यांच्या कॉर्नर जवळ ऍटोस्टॉप करण्यात यावा.

**महापौर** संबंधित प्रभागाच्या सं.सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्ती प्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्या येते.

**ठराव क्र.२०५** **ठ रा व**

नांवामनपा हध्दीतील प्रभाग क्र.३७ कौठा परिसरात अटोस्टॉप नसल्यामूळे अटोधारक कोणत्याही ठिकाणी उभे करुन वाहतुकीस अडथळा निर्माण करीत आहेत करीता नागरीकांच्या व अटोधारकाच्या सुविधासाठी कौठा परिसरात पुण्यष्लोक अहिल्याबाई होळकर चौकात,( लातूर रोड पोलिस चौकीजवळ )जून्या कौठयातून नविन गोवर्धनघाट पुलाकडे जाणा-या रस्त्यांच्या डाव्या बाजूने व उजव्या बाजुच्या कॉर्नर जवळ व नागार्जूना शाळे समोरील रस्त्याच्या दोन्ही बाजूने प्रत्येकी ५ अटोकरीता अटोथांबे जाहिर करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**विषय क्र.२६** **प्रस्ताव**

नांवामनपा हध्दीतील आयटिआय चौका जवळ महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारण्याकरीता मनपा सर्वसाधारणसभा दि.५.८.२००३ ठराव क्र.६६ नुसार मान्यता दिलेली आहे.सदरील ठिकाणी महानगरपालिकेकडून २८५ चौ.मी.जागा शासकीय तंत्रनिकेतन याचेकडून मागणी केल्यानुसार सदर २८५ चौ.मी.जागेचा न्यायालयीन वाद संपुष्ठात आल्यानंतर लवकरच हस्तांतर करण्यात येणार आहे.

आयटिआय चौक हा शहरातला मुख्य चौक असुन सदरील चौका पासूनच महत्वाच्या मिरवणूका ,मोर्चे, निघुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जातात तसेच महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारण्यात आल्यानतर सुशोभिकरण करण्यात येणार आहे.सदरील ठिकाणी जयंती व पुण्यतिथी व इतर कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात येते. भविष्याचा विचार करता पुतळयाच्या व लेबर कॉलनी रोड मधील त्रिकोणी शिल्लक जागा महानगरपालिकेने संपादित केल्यास जयंती व पुण्यतिथी ,मोर्चे .ईत्यादी कार्यक्रमा करीता पार्कीगची व्यवस्था होऊन वाहतुकीची कोंडी होणार नाही करीता सदरील मोकळी त्रिकोणी जागा महानगरपालिकेने संपादित करण्याकरीता मान्यता देणे बाबत.

**सुचकः-** आनंद शंकरराव चव्हाण **अनुमोदकः-** डॉ.करुणा जमदाडे

**आंनद चव्हाण** आयटिआय चौकात महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुतळा असून लवकरच त्या ठिकाणी महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले याचे पुर्णाकृती पुतळे उभारण्यात येणार असून त्यांची जयंती व पुण्यतिथी मोठया प्रमाणात साजरी करण्यात येते त्यानिमित्य आयटिआय चौकात विविध पक्षाचे कार्यकर्ते,सामाजिक संघटनेतर्फे जमा होतात तसेच याच चौकापासून विविध मागणीसाठी मोर्चे निघतात.वाहनासाठी पार्कीगची व्यवस्था नसल्यामूळै पुर्ण वाहतुकी विस्कळीत होत असल्यामूळै वाहनाच्या पार्कीसाठी जागा असणे आवश्यक आहे म्हणून पार्कीग करीता सदरील जागा संपादन करण्यासाठी आम्ही प्रस्ताव दिलेला आहे.त्यास सभागृहाने मान्यता द्यावी.

**सरजितसिंघ गिल** शहरातील वाढती वाहतुक लक्षात घेता शिवाजी पुतळा ते वजिराबाद मुथा चौक या रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक झालेले आहे.करीता या रस्त्याचे रुंदीकरणासाठी जागा संपादन करण्यात यावी.

**महापौर** खाजगी मालकीची जागा असुन पार्कीग करीता सदरील जागा संपादन करण्याचा स.सदस्यांच्या प्रस्तावास मान्यतादेण्यात येते .व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२०६** **ठ रा व**

नांवामनपा हध्दीतील आयटिआय चौका जवळ महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारण्याकरीता मनपा सर्वसाधारणसभा दि.५.८.२००३ ठराव क्र.६६ नुसार मान्यता दिलेली आहे.सदरील ठिकाणी महानगरपालिकेकडून २८५ चौ.मी.जागा शासकीय तंत्रनिकेतन याचेकडून मागणी केल्यानुसार सदर २८५ चौ.मी.जागेचा न्यायालयीन वाद संपुष्ठात आल्यानंतर लवकरच हस्तांतर करण्यात येणार आहे.

आयटिआय चौक हा शहरातला मुख्य चौक असुन सदरील चौका पासूनच महत्वाच्या मिरवणूका ,मोर्चे, निघुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जातात तसेच महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारण्यात आल्यानतर सुशोभिकरण करण्यात येणार आहे.सदरील ठिकाणी जयंती व पुण्यतिथी व इतर कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात येते. भविष्याचा विचार करता पुतळयाच्या व लेबर कॉलनी रोड मधील त्रिकोणी शिल्लक जागा महानगरपालिकेने संपादित केल्यास जयंती व पुण्यतिथी ,मोर्चे .ईत्यादी कार्यक्रमाकरीता पार्कीगची व्यवस्था होऊन वाहतुकीची कोंडी होणार नाही करीता सदरील मोकळी त्रिकोणी जागा महानगरपालिकेने संपादित करण्याकरीता व त्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते .व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२७** **प्रस्ताव**

नांदेड शहरात चालू असलेल्या विविध डिपीआर अंतर्गत घरकुलाचे कामे झाली आहेत व काही ठिकाणी चालू आहेत काही प्रभागामध्ये घरकुलाची कामे स्थलांतरीत करुन घरकुल बांधकाम करण्यात आले आहेत. उदा.वसरणी, शंकरनगर, जावाईनगर,व इतर परंतु सदर भागात रस्ते, नाल्या, व इतर कामे केलेली नसल्यामूळे घरकुलांची कामे करुनही लाभार्थ्याची गैरसोय होत आहेत.शहरात ज्या प्रभागात घरकुलाची कामे स्थलांतरीत करुन बांधण्यात आली आहेत व चालू आहेत अशा वस्त्यामध्ये मुलभूत सुविधाची कामे करणे आवश्यक आहे.

बिएसयुपी अंतर्गत वेगवेगळया डिपीआरमधून होत असलेल्या कामापैकी ज्या डिपीआर मध्ये मुलभूत सुविधांच्या कामासाठी निधी उपलब्ध्द आहे त्या डिपीआरमधून निधि उपलब्ध्द करुन स्थलांतरीत करुन बांधकाम झालेल्या घरकुलाच्या वस्त्यामध्ये मुलभुत सुविधांची कामे करण्यासाठी ही सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः**- संजय मोरे **अनुमोदकः**- डॉ.विश्वास कदम

**<u>प्रशासकीय अभिप्राय</u>**

बिएसयुपी योजने अंतर्गत ११ डिपीआर मध्ये ९७ झोपडपटी भागामध्ये कामे मंजुर आहेत त्यानुसार कंत्राटदाराची नियुक्ती करुन तसेच स्वतः बांधकाम करणे प्रगतीपथावर आहेत.बिएसयुपी अंतर्गत मंजुर झोपडपटी भागामध्ये काही ठिकाणी मंजुर असलेली लाभार्थी संख्या उपलब्ध्द होत नव्हती तसेच काही लाभार्थी मंजुर यांदीत नाव असतांनाही घरकुलाचा लाभ धेण्यास तयार नव्हते त्यामूळै घरकुले शासनास परत जावू नये तसेच गरीब लाभार्थी घरकुलापासून वंचित राहू नये या दृष्टीने शासनाचा शहर झोपडपटी मुक्त करणे हा उध्देश समोर ठेवून मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.११२ दि.२६.८.२०१० व ठराव क्र.८४ दि.१४.८.२०१४ अन्वये मान्यता देवून इतर वस्त्यामधील मंजुर लाभार्थ्याना घरकुल स्थलांतर करुन लाभ देण्यात आल आहे व देण्यात येत आहे.

बिएसयुपी योजने अंतर्गत झोपडपटी भागामध्ये धरकुलाचे बांधकाम झाल्यामूळे मुलभूत सुविधांची कामे त्या ठिकाणी करण्यात आलेली आहेत तसेच मूळ वस्त्यामध्ये मुलभूत सुविधांची कामे झाली असल्यामूळे स्थलांतरीत करुन घरकुलाची कामे केलेल्या झोपडपटीमध्ये निधी अभावी मुलभूत सुविधांची कामे हाती धेता आलेली नाहीत या ठिकाणी महानगरपालिकेच्या निधीतून अथवा इतर योजनेतुन नागरी सुविधाची कामे टप्या टप्याने हाती घेण्यात येतील.

**संजय मोरे** मागील ३५ वर्षापासुन वसरणी भागात अनेक झोपडपटया अस्तित्वात आल्या. या भागात ,बिएसयुपी योजने अंतर्गत घराचे बांधकाम करण्यासाठी २००६ ला सर्व्हे करण्यात आला.सर्वे अंती फक्त २००-२२५ घराना मान्यता देण्यात आली असून काही घराचे बांधकाम करण्यात आले काही घराचे बांधकाम प्रगती पथावर आहे परंतु या नागरीकांना योजनेतील कोणत्याही मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या नाही. जेएनएनयुआरएम व मलनिस्सारण लाईन टाकण्यासाठी याभागतील सर्व रस्ते खोदल्याने पुर्ण रस्ते खराब झालेले आहे. नागरीकांना या रस्त्यावरुन चालणे अवघड झालेले आहे. बिएसयुपी योजने बांधकाम करण्यात आलेल्या वस्त्यात मुलभूत नागरी सुविधा पुरविणे आवश्यक आहेत,यासंदर्भात मी आयुक्त साहेबांना सबंधित अभियंत्याना अनेक विनंती अर्ज दिलेले आहे. परतु कामे करुन देण्यास तयार नाही. माझी विनंती आहे इतर डिपीआर मध्ये शिल्लक असलेल्या निधीतून वसरणी भागातील लाभार्थ्याना मुलभेत नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देण्यात याव्यात.

**सरजितसिंघ गिल** ज्या भागात बिएसयुपी योजने अंतर्गत घराचे बांधकाम झालेले आहे तेथे मुलभूत नागरी सुविधा उपलब्ण्द करुन देणे आवश्यक आहे.श्री संजय मोरे यांनी मांडलेल्या प्रस्तावा पमाणे ज्या भागात मुलभूत नागरी सुविधासाठी निधी शिल्लक नाही त्याकरीता इतर डिपीआर मध्ये शिल्लक असलेला निधी देण्यात यावा व कामे करुन देण्यात यावी .

**डॉ.करुणा जमदाडे** श्री संजय मोरे यांनी चांगला प्रस्ताव मांडलेला आहे. बिएसयुपी योजनें अंतर्गत घराचे बांधकाम करण्यात आले परंतु नागरीकाना मुलभूत नागरी सुविधा देण्यात आलेल्या नाहीत. माझ्या प्रभागात राहुलनगर, लूम्बीनीनगर,शाहुनगर येथे घराचे बांधकाम करण्यात आले परंतु तेथीली नागरीकांना मुलभूत नागरी सुविधा देण्यात आलेल्या नाहीत. बिएसयुपी उपआयुक्त श्री रत्नाकर वाघमारे यांनी या भागाची पाहणी केलेली आहे.राहुलनगरात २० वर्षापासुन कोणतीच कामे झालेली नाही. लहुजीनगरला जाण्यासाठी रस्ता नसल्यामूळे भू संपादन करुन रस्ता करण्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे त्यावरही आज पर्यत कार्यवाही झालेली नाही.

**श्रध्दा चव्हाण** विष्णुनगरात घराचे शिफटींग करण्यात आले परंतु त्यांना नागरी सुविधा देण्यात आलेल्या नाही. सर्व गोरगरीब मुस्लीम समाजाचे नागरीक असून त्यांना गुडघाभर पाण्यातून जावे लागते रस्ते नाही,विद्युत पोल उभे करण्यात आले परंतु त्यावर लाईट बसविण्यात आलेले नाही.शासनाच्या योजनेअंतर्गत घराचे बांधकाम करण्यात आले परंतु त्यांना अत्यावश्यक मुलभुत सुविधा का देण्यात येत नाही.त्यांना घरे बाधुन देवून त्याचा उपयोग काय . सर्वाना मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देण्यात याव्यात अशी विनंती आहे.

**अभिषेक सौंदे** माझ्या प्रभागात कौठा,शिवनगर भागात बिएसयुपी योजने अंतर्गत धराचे बाधकाम करण्यात आले परंतु नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देण्यात आलेल्या नाहीत ही खुप गंभिर बाब आहे. नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देण्यात याव्यात.

**दिपकसिंह रावत** दलित वस्त्यात शासनाच्या विविध योजने अंतर्गत विकासाची कामे करण्यात येतात परंतु जेथे दलित वस्ती,स्लम एरिया नाही अशा भागात गुरु ता गध्दी ,बिएसयुपी योजने अंतर्गत मुलभूत नागरी सुविधाची कामे करण्यास सुचविलेले आहे. त्यामूळे ज्या ज्या भागात अत्यावश्यक कामे निकडीचे आहे त्याभागात ती कामे करण्यात यावीत.शिफटींग केलेल्या घरांना मुलभूत नागरी सुविधा देता येत नाही असे शासनाचे जी आर नाही.महानगरपालिकेचा निधी वाचण्यासाठी ज्या डिपीआर मध्ये पैसे शिल्लक आहे त्या शिल्लक निधीतून घराचे शिफटींग केलेल्या भागात नागरी सुविधाची कामे करण्यात यावी.

**श्रध्दा चव्हाण** श्री दिपकसिंह रावत यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**अशोक उमरेकर** हनुमान मंदिर ,बौध्द विहार या भागात बिएसयुपी योजने अंतर्गत ५४ घराचे बांधकाम करण्यात आले परंतु त्यांना रस्ते, नाल्या,विद्युत ई.नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देण्यात आलेल्या नाही त्या देण्यात याव्यात. जी मलनिस्सारण लाईन टाकण्यात आली ती लेव्हलमध्ये टाकण्यात आलेली नाही दुरुस्त करुन देण्यात यावी. रस्ताचा सर्व्हे करण्यात आला परंतु काम सूरु करण्यात आलेले नाही.

**फारुख अली खॉ** जेएनएनयूआर व बिएसयुपी योजना सुरु होवून आठ वर्ष झाले परंतु अजूनही या योजने अंतर्गत रस्त्याची पाणी पुरवठयाची ,मलनिस्सरणाची लाईटची,रस्त्याची कामे पुर्ण झालेली नाही. ही खेदाची बाब आहे. शासन आपणास विकास कामासाठी कोटयावधी रुपयाचा निधी देते परंतु ते आपण खर्च करु शकत नाही.आम्ही मागील आठ वर्षापासून जेएनएनयूआरएम व बिएसयुपी च्या कामासंदर्भात सर्वसाधारण सभेत चर्चा करीत आहोत. शासनाचा निधी खर्च करण्यास खरोखरच महानगरपालिकेचे अधिकारी ,पदाधिकारी, नगरसेवक असमर्थ आहे काय .विहित कालावधीत या पैश्याचा विनियोग केला नाही तर हा निधी शासन वापस घेईल. एकीकडे अपिलला लाखो रुपयाचे पेमेट करण्यात येत आहे. शासनाच्या निधीतून नागरीकांना लाभ देवू शकत नाही. शासन निधी खर्च करण्यास काय अडचण आहे.याचा खुलासा करण्यात यावा.

**बाळासाहेब देशमूख** जयभिमनगर,श्रावस्तीनगर येथे जवळपास ११०० घरांचे बांधकाम करण्यात आलेले असून नागरी सुविधा उपलब्ण्द करुन देण्यासाठी अनुक्रमे २.५० कोटी व २.२५ कोटीचा निधी होता परंतु निधी कमी पडल्यामूळे रस्त्याची नाल्याची ,पाईप लाईन, विद्युत ई.मुलभूत नागरी सुविधाची कामे झालेली नाही. ज्या भागात घराचे बाधकाम नाही तेथे १०-१० कोटीची मूलभूत सुविधाची कामे करण्यात येत आहे. आमचे प्रभागात १५०० घराचे बांधकाम होवूनही नागरी सुविधा नाही. घरे बांधून काय उपयोग.आयुक्त साहेबांना विनंती आहे ज्या भागात नागरी सुविधाची कामे करण्याचा निधी संपलेला आहे त्या भागात इतर डिपीआर मधील शिल्लक निधी वळता करुन नागरी सुविधाची कामे करण्यात यावी.

**सभापती** बिएसयुपी च्या कामाचा आढावा घेण्यासाठी एक विशेष सभा बोलाविण्यात यावी.

**महापौर** बिएसयुपी चा पैसा वापस जावू नये अशी स.सदस्यांची भावना आहे. आयुक्तांनी सहयोग देवून इतर डिपीआर मधील शिल्लक निधीतून शिफटीग झालेल्या वस्त्यात कामे करावीत.

**संजय मोरे** ज्याभागात खरोखरच काम करणे आवश्यक आहे त्या भागात प्रथम प्राधान्याने कामे करण्यात यावीत.

**गणपत धबाळे** एनटिसी मिल भागात घराचे बांधकामासाठी शासनाने पैसे मंजुर केलेला आहे परंतु गुरुव्दारा बोर्ड व एनटिसी जागा हस्तांतरीत करीत नसल्याचे सांगण्यात येत आहे. जागा मिळाली नाही तर हा निधी वापस जाणार आहे काय, जागा हस्तांतरीत करण्यासाठी महानगरपालिकेकडून काय प्रयत्न करण्यात येत आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** केंद्र शासनाने विशेष बाब म्हणून जवाहरलाल नागरी पुनरुत्थान योजने अंतर्गत ( एनएनयूआरएम ) समाविष्ट केलेला आहे. या योजनेबरोबर बिएसयपी योजने अंतर्गत पहिल्या भागात शहरात जो झोपडपटी भाग आहे त्या झोपडपटी भागातील नागरीकांना ते रहात असलेल्या जागेवर निश्चित केलेल्या आकाराचे व किमतीत घराचे बांधकाम करुन द्यावे.व दुस-या भागात त्याच झोपडपटी भागात नागरीकांना रस्ते,नाल्या,विद्युत व्यवस्था,पाणी पुरवठा,मलनिस्सारण व्यवस्था ई.मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध्द करुन द्यावयाच्या आहेत त्यानुसार आपण घराचे बांधकामाचे व त्या त्या झोपडपटीत नागरी सुविधाचे कामाचे डिपीआर तयार करुन शासनाची मान्यता घेवून मंजुर डिपीआर प्रमाणे कामे पुर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. शासनाचा पैसा असल्यामूळे शासन योजनेतील निकषा प्रमाणे महानगरपालिकेस कामे करावी लागतील. बिएसयुपी योजने मुदत दि.३१ मार्च २०१५ रोजी संपत असून एकूण १९६४० मजुर धरापैकी (एनटिसी मिल भागातील ५१३६ घरे वगळून) आज पर्यत १४८५५ घरांची बांधकामे पूर्ण झाली ,३१७५ प्रगतीपथावर आहेत,१६१० घराचे बांधकाम सुरु करण्याच्या प्रतिक्षेत आहे, २४२ नागरीकांनी स्वतः व कंत्राटदारानी १३६८ घराचे बांधकाम सुरु केलेले नाही. शिल्लक घरांचे बांधकाम या कालावधीत होणे शक्य नाही म्हणून या योजनेस मुदत वाढ देण्याकरीता केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली आहे. माजी मुख्यमंत्री व नांदेडचे खासदार मा.श्री अशोकरावजी चव्हाण साहेब या योजनेस मुदतवाढ देण्यासाठी केंद्र शासनास सतत पाठपुरावा करीत आहेत. तसेच एनटिसी मिल भागात ५१३६ घरे मंजुर आहेत परंतु एनटिसी मिलने व गुरुव्दारा बोर्डाने घराचे बांधकामासाठी लागणारी जागा हस्तांतरीत न केल्यामूळे हा प्रकल्प रध्द झालेला आहे गुरुव्दार व एनटिसी मिलने आपल्या मालकीची जागा ताब्यात देण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने सतत पाठपुरावा करण्यात आलेला आहे.शासनाने मंजुर केलल्या डिपीआर प्रमाणे जेथे जेथे बिएसयुपी योजने अंतर्गत घराचे बांधकाम झालेले आहे तेथे कामे करण्यात येणार आहे. शिफटींग केलेल्या धराचे वस्त्यातही मनपानिधीतून टप्याटप्याने नागरी सुविधाची कामे करण्यात येतील. ज्या लाभार्थ्यानी २३ नोव्हेंबर २०१४ पुर्वी घराचे बांधकामासाठी आपला वाटा भरलेला आहे व घराचे बांधकामाचे मार्क आवुट दिलेले आहे त्यांना घरे बांधून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**गफार खान** बिएसयुपी योजनेच्या संदर्भात ब-याचश्या स.सदस्यांनी आपल्या समस्या मांडलेल्या आहेत. महापौराना विनंती आहे की, बिएसयुपीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी एक विशेष सभा बोलवावी.

**महापौर** श्री संजय मोरे,स.सदस्य यांनी जो प्रस्ताव मांडला तो मंजुर करण्यात येतो. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.२०७** **ठ रा व**

नांदेड शहरात चालू असलेल्या विविध डिपीआर अंतर्गत घरकुलाचे कामे झाली आहेत व काही ठिकाणी चालू आहेत काही प्रभागामध्ये घरकुलाची कामे स्थलांतरीत करुन घरकुल बांधकाम करण्यात आले आहेत. उदा.वसरणी, शंकरनगर, जावाईनगर, रहिमपुर, भिमवाडी व इतर परंतु सदर भागात रस्ते,नाल्या,व इतर कामे केलेली नसल्यामूळे घरकुलांची कामे करुनही लाभार्थ्याची गैरसोय होत आहेत.शहरात ज्या प्रभागात घरकुलाची कामे स्थलांतरीत करुन बांधण्यात आली आहेत व चालू आहेत अशा वस्त्यामध्ये मुलभूत सुविधाचीकामे करणे आवश्यक आहे.

बिएसयुपी अंतर्गत वेगवेगळया डिपीआरमधून होत असलेल्या कामापैकी ज्या डिपीआर मध्ये मुलभूत सुविधांच्या कामासाठी निधी उपलब्ध्द आहे त्या डिपीआरमधून निधि उपलब्ध्द करुन स्थलांतरीत करुन बांधकाम झालेल्या घरकुलाच्या वस्त्यामध्ये मुलभुत सुविधांची कामे करण्यासाठी ही सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२८** **प्रस्ताव**

मनपा प्रभाग क्र.५ (अ) मध्ये विविध विकास कामे करण्यासाठी शासनाकडे निधी मागण्याकरीता प्रस्ताव पाठविणे

**सुचकः-** स्नेहा सुधाकर पांढरे **अनुमोदकः-** आनंद चव्हाण

**फारुख अली खा** प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी शासनाच्या विविध योजने अंतर्गत निधी येतो परंतु तो निधी कशा प्रकारे प्रभागांना विभागून देण्यात येतो याची सं.सदस्यांना माहिती होत नसल्यामूळे ठराविक प्रभागाकरीता शासन निधी देण्यात येतो. माझे प्रभागात पुर्ण अल्प संख्याक नागरीक राहतात परंतु अल्प संख्याकाकरीता मागील १० वर्षपासून जो निधी आला त्यातून माझ्या प्रभागात एकही काम करण्यात आलेले नाही ही गंभिर बाब आहे. खास प्रभागाकरीता निधी वाटप करतात व इतर प्रभाग त्यापासून वंचित

राहतात, आयुक्त साहेबांना विनंती आहे की प्रभागाचा सर्व्हे करुन ज्या प्रभागात कामे करणे आवश्यक आहे तेथे शासना निधीतून कामे करण्यात यावी. पाच नगरसेवकांच्या शिफारशीनूसार त्याचे प्रभागात कामे करण्यात येतात बाकीचे ८० नगरसेवक वंचित राहतात. विकास कामाकरीता जो शासन निधी येतो तो सर्व प्रभागांना समानतेने वाटप करीत जावा. महापौरांनी सर्व प्रभागाचा विचार केलेला नाही ठराविक प्रभागतच निधी दिला.

**महापौर** — श्री फारुख अली खा यांनी अत्यंत खोटा आरोप केलेला आहे शासन निधीतून कोणत्या प्रभागात कामे घ्यावयाची हे प्रशासन ठरविते. व त्यास सभागृह मान्यता देते. महापौरांना व्यक्तीगत निधी वाटप करण्याचे अधिकार नाही. खोटा आरोप करण्यात येत आहे.

**अशोक उमरेकर** — महापौरांनी सर्व प्रभागाकडे लक्ष द्यावे.

**संजय मोरे** — शासनाच्या गाईड लाईन प्रमाणे शासन निधीचा विनियोग करावयास पाहिजे. आयुक्तांनी शासन निधीतून कामे करतांना खरोखरच त्या प्रभागात काम करण्याची गरज आहे हे तपासुन ज्या प्रभागात काम करणे आवश्यक आहे प्रभागात कामे करावयास पाहिजे.

**सोनाबाई मोकले** — आमचे प्रभागात मागील २० वर्षापासून पाण्याची टंचाई असल्यामूळे नविन पाईप लाईन टाकण्यात यावी. रस्तेही खराब झालेले असल्यामूळे रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी.

**बाळासाहेब तरोडेकर** — सध्या उन्हाळयाचे दिवस असल्यामूळे माझ्या प्रभागातील ५-६ नगरात लक्ष्मीनगरात पाण्याची टंचाई निर्माण झालेली असून पाण्याचा गंभिर प्रश्न सोडविण्यासाठी सबंधित अधिका-यांना विनंती केली ,नागरीकांनी उपोषणही केले.माझ्या प्रभागातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी काय उपाय योजना करण्यात येत आहे याचा खुलासा करण्यात यावा. पाणी पुरवठयाकरीता कोटयावधी रुपये खर्च करण्यात येत आहे परंतु आमचे प्रभागातील पाण्याची समस्या सुटत नाही, तरोडा पाणी पुरवठा योजनेचे काम कोणत्या स्टेजवर आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**बाळासाहेब देशमूख** — ज्या भागात महानगरपालिकेची पाणी पुरवठा व्यवस्था नाही किंवा शेवटचा भाग असल्यामूळे पुरेशा दाबाने त्या ठिकाणी विंधन विहिरी घेण्यात याव्यात. पाणी पुरवठा बाबत स.सदस्य ज्या काही सुचना करतील त्याची दखल घेण्यात यावी.

**उमेश चव्हाण** — मस्तानपुरा या भागात तीन महिण्यापासुन पाण्याची टंचाई आहे. साईट क्र.३४ येथे पाण्याची टाकीचे बाधंकाम करण्यात आले परंतु अद्याप ही पाण्याची टाकी सुरु करण्यात आलेली नाही.पाणी पुरवठा विभागात २६९ कर्मचारी असून ही नागरीकांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे.शिवाजीनगर भागात गळत्याचे प्रमाणे जास्त असल्यामूळे मोठया प्रमाणात पाणी वाया जात आहे त्याकडे कोणी लक्ष देण्यात यावे.

**विनयं गुर्रम** — पाणी प्रश्नावर उत्तरे देवू नये गंभिरतेने विचार करुन तोडगा काढावा मी अनेक दिवसापासून दरवेशनगर भागात पाण्याची टाकी बांधूनही त्या भागातील नागरीकांचा पाण्याचा प्रश्न सुटलेला नसल्याची तक्रार का.अभियंता, उपअभियंत्याकडे करीत आहे. परंतु पाईप लाईनची दुरुस्ती होत नाही.६ इंची पाईप लाईन आहे त्यामध्ये पोते ,प्लास्टीक कसे काय निघत आहे हे कुठून आले. पाणी पुरवठा विभागाचे उपआयुक्त यांनी सुध्दा स्थळावर येवून पाहणी केली आहे.

**उपआयुक्त पाणी पुरवठा** — श्री विनंय गुर्रम यांच्या प्रभागातील १५-२० घराना पाईप लाईनचा शेवटचा भाग असल्यामूळे पाणी पुरवठा होत नाही.याठिकाणी पाईप लाईन टाकण्यासाठी मनपाकेची जागा नाही, खाजगी जागा आहे, संबंधीत अभियंत्यानी काम केले नाही तर त्यांचे वरिष्ठाकड उपआयुक्त,आयुक्त यांना कल्पणा द्यावयास पाहिजे.

**विनय गुर्रम** — स.सदस्यांनी लहान सहान कामासाठी प्रत्येक वेळी आयुक्त ,उपआयुक्ताकडे तक्रार करावी काय संबंधित अभियंत्याची काही जबाबदारी आहे किंवा नाही.

**दिपक रावत** — संबंधित अभियंत्यां विरुध्द कार्यवाही करण्यात यावी व १५-२० घराचा पाण्याचा प्रश्न आहे तो सोडविण्यात यावा पाईप लाइन दुरुस्त करण्यात यावी.संबधित अभियंत्याविरुध्द काय कार्यवाही करण्यात येणार आहे याचा खुलासा करण्यात यावा. विष्णुपूरी शंकर जलाशयातील साठा कमी झालेला असल्यामूळे शहराला पाणी टंचाई जाणवण्याची शक्यता आहे तेव्हा अशा परिस्थितीत शहराला पाणी पुरवठा कसा करणार आहात, याचे काय नियोजन करण्यात आले ,किती हातपंम्प चालू आहेत किती बंद आहेत ते दुरुस्त करण्यासाठी काय उपाय योजना करण्यात आल्या,प्रभागात नविन विंधन विहिरी घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे काय याची माहिती देण्यात यावी.

**रामनारायणजी काबरा** — विष्णुपूरी धरणातील पाण्याचा साठा कमी झालेला आहे. ऐन उन्हाळयात पाण्याचा साठा संपुष्ठात आला तर नांदेड शहरावर पाण्याच संकट येणार आहे.वरच्या धरणातून नांदेड शहराकरीता पाणी सोडण्यात येणार आहे काय, पाणी संकट निर्माण झाल्यास कशा प्रकारे नियोजन करण्यात येत आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**गुरुप्रित कौर सोडी** प्रभागात रात्री बे रात्री पाणी सोडण्यात येत आहे पाणी सोडण्याची टाईमीग निश्चित करण्यात यावी.

**आयुक्त** नांदेड शहरास विष्णुपुरी शंकर जलाशयातून पाणी पुरवठा करण्यात येतो. या जलाशत आरक्षित करण्यात आलेले पाणी शेतकरी विद्युत पम्पाव्दारे शेती करीता वापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यामूळे जिल्हा प्रशासनामार्फत शेतक-याचा विद्युत पुरवठा बंद करण्यासाठी गोदावरी नदी काठावरील १६७ ट्रान्सफार्मर हलविण्याकरीता एमएसईबीला १६ रुपये लक्ष देण्यात आलेले आहे. सध्या धरणातील पाण्याची पातळी ३४६ असून सध्याचा पाणीसाठा जून जूलै पर्यत पुरेल एवढा शिल्लक आहे.तसेच उर्ध्वपैनंगंगा प्रकल्पाचे कालव्याव्दोर पाणी घेण्याची १५ कोटी योजनेचे काम सुरु असून हे काम प्रगतीपथावर आहे.गंभिर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यत असेल त्यावेळी आपण एकत्रित बसून निर्णय घेवू

**बाळासाहेब तरोडेकर** विष्णुपूरी शंकर जलाशयातील बॅक वॉटर ४० कि.मि.म्हणजे पुर्णा पर्यत असून पुर्णा तालुक्यातील शेतकरी शेतीकरीता मोठया प्रमाणात पाणी उपसा करीत असल्यामूळे विद्युत पुरवठा खंडीत करण्यासाठी तहसिलदार पुर्णा यांना विनंती करण्यात यावी.

**महापौर** स्नेहा पांढरे यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२०८** **ठ रा व**

मनपा प्रभाग क्र.५ (अ) मधील विविध भागात विकास कामे करणे अत्यंत आवश्यक आहे परंतु सध्याची महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता निधी अभावी या प्रभागातील विविध विकासाची कामे ब-याच दिवसापासून प्रलंबित आहे. करीता शहर अभियंता, यांनी प्रभाग क्र.५ चा सर्व्हे करुन प्रलंबित विकासाचे कामाचे अंदाजपत्रके व स्थळ नकाशे तयार करुन त्याप्रमाणे निधी उपलब्द करुन देण्यासाठी महाराष्ट्र शासनास विनंती करावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२९** **प्रस्ताव**

नांवामनपा नांदेड शिक्षण अस्थापनेवर मुख्याध्यापकाची ६ पदे मंजुर आहेत. मनपा नांदेड सेवा प्रवेश प्रारुप २०१२ नुसार मनपा शिक्षण अस्थापनेवरील पदे ५० टक्के सरळसेवा व ५० टक्के सेवा जेष्ठतेनुसार भरण्याचे प्रारुपात नमूद आहे. असे केल्यामूळे शिक्षण अस्थापनेवर फक्त ७४ (सन २०१३-२०१४ च्या संच मान्यतेनुसार) शिक्षकांची पदे मंजुर असल्यामूळे पदोन्नतीचे भरावयाची पदे फारच कमी आहेत,त्यामूळे प्रारुपानुसार पदोन्नती केल्यास कार्यरत शिक्षकांवर अन्याय होत आहे.

करीता ही मुख्याध्यापकाची पदे १०० टक्के सेवा जेष्ठतेनुसार भरण्यात यावीत व तसा प्रारुपात बदल करुन शासनास मंजुरीस्तव पाठविण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास्तव मनपा.सर्वसाधारण सभे समोर प्रस्ताव सादर.

**सुचकः-** आनंद शंकरराव चव्हाण **अनुमोदकः-** सौ.शैलजा किशोर स्वामी

## प्रशासकीय टिप्पणी

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका शिक्षण आस्थापनेवर मुख्याध्यापकाची 6 पदे मंजुर असुन त्यापैकी आजमितीस 5 पदे रिक्त आहेत. यापूर्वी सदरील पदावर कार्यरत कर्मचारी हे 100% पदोन्नतीद्वारे नियुक्त झालेले आहेत. यावरुन प्रथमदर्शनी सदरची 6 पदे यापूर्वी पूर्णपणे पदोन्नतीने भरलेली होती असे निदर्शनास येत आहे. परंतु सालसन 2011 मध्ये प्रमाणित केलेल्या बिंदू नामावलीचा व मनपा प्रारुप सेवा प्रवेश नियमाचा विचार करता सदरील 6 पदाचे विभाजन होऊन 50% सरळसेवा व 50% पदोन्नती असे प्रमाण निश्चित केलेले आहे.

शासन परिपत्रक क्र.ठामपा 2002/821/प्र.क.86/नवि-23, दिनांक 02 जुलै 2008 अन्वये महानगरपालिका कर्मचारी / अधिकारी यांचे मॉडेल सेवा प्रवेश नियम तयार करण्याचे निर्देश आहेत. त्याअनुषंगाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचारी / अधिकारी मॉडेल सेवा प्रवेश नियम शासनाने तयार केले असुन यापूर्वीचे सर्व सेवा नियम अधिक्रमीत करुन त्या आधारे प्रत्येक महानगरपालिकेने नव्याने त्यांचे स्वत:चे सेवा प्रवेश नियम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 च्या कलम 457 (3) अन्वये तयार करण्यासंबंधात निर्देशीत केलेले आहे. त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रारुप सेवा प्रवेश यापूर्वी तयार करण्यात आलेले असुन त्यास मनपा सर्व साधारण सभेने दि.08.08.2011 रोजी ठराव क्र.94 अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. तसेच सदरील प्रारुप सेवा प्रवेश नियम शासनास सादर केले असता शासनाने काही त्रुटी अभावी पुनश्चः प्रस्ताव सादर करण्यासंदर्भात सुचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने सदरचे प्रारुप सेवा प्रवेश नियम शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहेत.

वस्तुस्थिती पाहता सहशिक्षक या संवर्गात कार्यरत कर्मचा-यांना त्यांच्या सेवा कालावधीत पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने उक्त नमुद विभाजनाचा फटका सह.शिक्षक संवर्गातील कर्मचा-यांना बसणार आहे. सदरील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुठींतता घालविण्यासाठी सदरची 6 पदे सुध्दा 100% पदोन्नतीने भरणे संदर्भात प्रशासन सकारात्मक आहे.

उक्त बाब विचारात घेता मुख्याध्यापक या सवंर्गातील पदाची सुधारीत स्वरुपात बिंदु नामावली प्रमाणित करणे आवश्यक असून मनपा , प्रारुप सेवा प्रवेश प्रारुप २०१२ नियमात खालील प्रमाणे अंशत सुधारणा करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी 1.नामनिदेर्शन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | कमाल वयो मर्यादा | शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रेणी3 शिक्षण सेवा | मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका | नामनिर्देशन 00% | -- | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला किंवा विज्ञान शाखेची पदवी अथवा पदव्युत्तर पदवी तसेच शिक्षणशास्त्र शाखेतील पदवी (बि.एड.) किंवा पदव्युत्तर पदवी (एम.एड.) आवश्यक. ब) शासकीय, निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थे मधील समकक्ष पदावरील किमान 05 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती 100% | -- | नामनिर्देशना करिता विहीत केलेली शैक्षणिक अर्हतेसह महानगरपालिका आस्थापनेवरील सहशिक्षक / सहशिक्षिका या पदावरील किमान 10 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |

करीता, सुधारीत स्वरुपात बिंदु नामावली प्रमाणित करण्यासाठी आणि उक्त नमुद केल्याप्रमाणे मनपा सेवा प्रवेश नियमात अंशत सुधारणा करणे आवश्यक असल्याने मनपा सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**स.शेर अली** रिक्त असलेले मुख्याध्यापकाचे पद कार्यरत शिक्षकातुन जेष्ठते नुसार पदोन्नतीने भरण्यात यावी.तसेच त्यांना चटोपाध्याय समितीने केलेल्या शिफारशीनूसार वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**आयुक्त** शासन जीआर, सर्व शिक्षा अधिकार ( RIGHT OF EDUCATION ACT.),महानगरपालिका अधिनियमातील तरतूद ई.बाबी तपासून नियमानुसार प्रशासनामार्फत मुख्याध्यापक पदावर नेमणूका करण्यात येतील.

**दिपकसिंह रावत** हा प्रस्ताव प्रशासनाचा असल्यामूळे तो प्रशासनामार्फत का आलेला नाही. स.सदस्यांना प्रस्ताव ठेवण्याची का गरज पडली .

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** कर्मचा-याना शिक्षकांना पदोन्नती देण्यासाठी जीबीच्या ठरावाची आवश्यकता आहे काय

**उपआयुक्त प्रशासन** महानगरपालिकेतील कर्मचा-यांसाठी सेवा भरती नियम तयार केलेले असून ते शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहे त्यामध्ये काही दुरुस्ती करावयाची असेल तर त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** इतरही संवर्गातील कर्मचा-यांच्या सेवा भरती नियमात बदल करावयाचे असतील तर त्यातही दुरुस्ती करण्याचे प्रस्ताव सादर करावा.

**आनंद चव्हाण** प्रस्तावात नामनिर्देशना करिता सेवाजेष्ठातेनूसार कार्यरत शिक्षकामधून दोन वर्षाची अध्यापन पदविका अभ्यासक्रम डिएड)उत्तीर्ण, महानगरपालिका आस्थापनेवरील सहशिक्षक / सहशिक्षिका या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक अशी दुरुस्ती करुन प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**स.शेर अली** उपमहापौरांनी मांडलेल्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री आनंद चव्हाण यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२०९** **ठ रा व**

नांवामनपा नांदेड शिक्षण अस्थापनेवर मुख्याध्यापकाची ६ पदे मंजुर आहेत. मनपा नांदेड सेवा प्रवेश प्रारुप २०१२ नुसार मनपा शिक्षण अस्थापनेवरील पदे ५० टक्के सरळसेवा व ५० टक्के सेवा जेष्ठतेनुसार भरण्याचे प्रारुपात नमूद आहे. असे केल्यामूळे शिक्षण अस्थापनेवर फक्त ७४ (सन २०१३-२०१४ च्या संच मान्यतेनुसार ) शिक्षकांची पदे मंजुर असल्यामूळे पदोन्नतीचे भरावयाची पदे फारच कमी आहेत,त्यामूळे प्रारुपानुसार पदोन्नती केल्यास कार्यरत शिक्षकांवर अन्याय होत आहे.

करीता नांवामनपाकेच्या सुधारीत स्वरुपात बिंदु नामावली प्रमाणित करुन, नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेने तयार केलेल्या सेवा प्रवेश प्रारुप २०१२ नियमात खालील प्रमाणे सुधारणा करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.आयुक्तांनी केलेल्या दुरुस्ती प्रमाणे रिक्त असलेल्या मुख्याध्यापक या पदावर शिक्षकांच्या जेष्ठता यादीनुसार व त्यांनी केलेल्या कामाच्या व गुणवत्तेनुसार त्वरीत शिक्षकाना पदोन्नती देण्यात यावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| अ. क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी 1.नामनिर्देशन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | कमाल वयो मर्यादा | शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रेणी3 शिक्षण सेवा | | पदोन्नती 100% | | नामनिर्देशना करिता सेवाजेष्ठातेनूसार कार्यरत शिक्षकामधून दोन वर्षाची अध्यापन पदविका अभ्यास क्रम (डिएड)उत्तीर्ण, महानगरपालिका आस्थापनेवरील सहशिक्षक / सहशिक्षिका या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |

**विषय क्र.३०** **प्रस्ताव**

सन २०१० पासून ते २०१४ पर्यत लेखा परिक्षणामध्ये पाणी पुरवठा विभाग,कर विभाग,व इतर विभागात मनपा रक्कमेचा तात्पुरता अपहार केल्याचे एकूण किती प्रकरणे आहेत त्यापैकी तात्पुरता अपहारात कोणकोणते कर्मचारी आहेत,त्या कर्मचा-यावर केलेली कार्यवाही व तात्पुरता अपहारात वसुल झालेल्या रक्कमेची माहिती तसेच रक्कम वसुल झाली नसल्यास त्याची जबाबदारी कोणाची याबाबत केलेली कार्यवाही ही सर्व सविस्तर माहिती सभे समोर सादर करुन चर्चा करणेची ही सभा संमत करते.

**सुचकः-** आनंद शंकरराव चव्हाण **अनुमोदकः-** बाळासाहेब देशमुख प्र.क्र.१८

**प्रशासकीय अभिप्राय**

**• अंतर्गत लेखा परिक्षणास निदर्शनास आलेली अपहार प्रकरणे •**

| अ.क्र | अपहार केलेल्या कर्मचा-यांची नांवे | विभाग | कालावधी/वर्ष | अपहार रक्कम | अहवाल दिलेल्या पत्र क्रमांक | रक्कम वसुल केल्याचे संबंधित विभागाचे पत्र क्रं. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीआर.एन.ताडपवार , (लिपिक) | क्षे.का.क्र. 4 कर विभाग | 10-2-2010 ते 19-5-2011 | रु. 5,01,907/- | 1. मुलेप/40/12 दि.22-10-2012 2. मुलेप/48/12 दि. 20-12-2012 अन्वये अहवाल मा.आयुक्त व मा.सभापती (स्था.स.) यांना सादर केले आहे. | ---- |
| 2 | श्री यशवंत मनोहर सरोदे, लिपिक) | पाणीपट्टी वसुली | 2012-13 ते 2014-15 | रु. 2,09,575/- | 1. मुलेप/18662/15 दि. 19-1-2015 अन्वये अहवाल मा.सभापती (स्था.स.), उपआयुक्त (विकास), पाणिपुरवठा विभागास सादर केले आहे. | ---- |
| 3 | श्री गुरुनामसिंघ संधु, (लिपिक) | पाणीपट्टी वसुली | 2010-11 ते 2013-14 | रु. 1,16,865/- | 1. पत्र क्र. मुलेप/20599/15 दिना18-2-2015 अन्वये मा. आयुक्त, मा.सभापती व पाणिपुरवठा विभागास अहवाल सादर केले आहे. | मा. आयुक्त यांनी पत्र क्र. आस्था-5/19045/15 दि. 16-1-2015 अन्वये देय होणा-या रकमेतुन अपहारीत रक्कम समायोजित करण्याबाबत मुलेअ यांना कळविले आहे. |
| 4 | श्री शेख अख्तर , (वसुलीकार) | पाणीपट्टी वसुली | 2010-11 ते2013-14 **नोटः** 2010-11 मध्ये दोन पावतीपुस्तके अप्राप्त व 2011-12 मध्ये चार पावती पुस्तके अप्राप्त अंदाजित अपहारीत रक्कम | रु. 94,760/- रु. 10 लक्ष | 1. मुलेप/20600/15 दिनांक 18-2-2015 अन्वये मा. सभापती स्थायी समिती व मा.उपआयुक्त (विकास), पाणिपुरवठा विभागाला अहवाल सादर केले आहे. | ---- |
| 5 | श्री देविदास केशवराव जोशी (प्र.वसुलीकार) | पाणीपट्टी विभाग | 2010-11 ते 2012-13 **नोटः** 2010-11 मध्ये चार पावती पुस्तके अप्राप्त अंदाजित अपहारीत रक्कम | रु. 1,13,720/- रु. 7,08,000/- | 1. मुलेप/21581/15 दि. 9-3-2015 अन्वये अहवाल मा.सभापती स्थायी समिती, मा.उपआयुक्त (विकास) व पाणिपुरवठा विभागास सादर केले आहे. | ---- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | तात्पुरते अपहारः- | | | | | |
| | विविध कर्मचा-यांचे किरकोळ रक्कमा | क्षे.का.क्र. 1 | 2010-11 | रु. 450/- | 1. मुलेप/23/12 दि. 6-8-12<br>2. मुलेप/24/12 दि. 6-8-12 | ---- |
| | | क्षे.का.क्र.2 | 2010-11 | रु. 5,560/- | 1. मुलेप/49/12 दि.22-11-12 | ---- |
| | | क्षे.का.क्र. 3 | 2010-11 | रु. 3,347/- | 1) मुलेप/12 दि. 11-7-12<br>2)मुलेप/13/12 दि. 26-7-12<br>3) मुलेप/16/12 दि. 1-8-12<br>4) मुलेप/17/12 दि. 3-5-12 | 1) पत्र क्र.क्षे.का.क्र.3 /595 दि. 27-7-12<br>2) पत्र क्र.क्षे.का.क्र.3 /620 दि. 3-8-12<br>3) पत्र क्र.क्षे.का.क्र.3 /686 दि. 7-8-12 |
| | | क्षे.का.क्र. 4 | 2010-11 | रु.3,083/- | 1) मुलेप/30/12 दि.23-8-12<br>2) मुलेप/33/12 दि.18-9-12<br>3) मुलेप/42/12दि.23-10-12 | 1) पत्र क्र. क्ो.का.क्र. 4/138 2/12 दिनांक 3-11-12<br>2) पत्र क्र. क्ो.का.क्र. 4/94 /13दि.18-4-13 |
| | | क्षे.का.क्र. 5 | 2010-11 | रु. 11,634/- | 1)मुलेप/58/12 दि.20-12-12<br>2)मुलेप/65/13 दि. 15-1-13<br>3)मुलेप/71/13 दि. 19-1-13<br>4)मुलेप/77/13 दि. 3-1-13 | 1) पत्र क्र. क्षे.का.क्र. 5/1567 दि28-12-12<br>2) पत्र क्र. क्षे.का.क्र. 5/2065/13 दिनांक 15-3-13 |
| | | पाणिपट्टी वसुली | 2010-11 | रु. 6,800/- | मुलेप/27/12 दि. 13-8-12 | पत्र क्र.पापु/7274/14 दि. 14-7-14 |
| | | | 2010-11 | रु. 11,792/- | मुलेप/32/1 दि. 18-9-2012 | पत्रक्र. पापु/7275/14 दि. 14-7-14 |
| | | | 2010-11 | रु. 4910/- | मुलेप/64/13 दि. 8-1-2013 | 1) पत्रक्र. पापु/1014/ 13 दि. 22-2-13<br>2)पत्रक्र.पापु/1013/13 दि. 22-2-13<br>3)पत्रक्र.पापु/1012/13 दि. 22-2-13 |
| | | | 2010-11 | रु.1500/- | मुलेप/68/13 दि. 17-1-2013 | 1)पत्रक्र. पु/955/13 दि. 2-2-13<br>2) पत्रक्र. पापु/1011/ 13 दि. 22-2-13 |
| | | | 2010-11 | रु. 3750/- | मुलेप/100/13 दि. 21-3-2013 | --- |
| | | | 2010-11 | रु. 5900/- | मुलेप/22/12 दि. 6-8-2012 | पत्र क्र. पापु/7276/ 14 दि. 14-7-14 |
| | | क्षे.का.क्र.3 | 1-7-2014 ते 31-7-2014 | रु. 665/- | अहवाल मा. सभापती (स्थायी समिती) व सबंधित क्षेत्रिय अधिकारी यांना सादर केले आहे. | |
| | | | | | • | |
| | | | | | • | |
| | | क्षे.का.क्र. 4 | 1-7-2014 ते 31-7-2014 | रु.559/- | | |
| | | क्षे.का.क्र.5 | 1-7-2014 ते 31-7-2014 | रु. 5613/- | | |
| | | क्षे.का.क्र.6 | 1-7-2014 ते 31-7-2014 | रु.3500/- | | |
| | | पाणिपट्टी वसुली | 1-7-2014 ते 31-7-2014 | रु. 3225/- | मुलेप/16278/14 दि. 8-12-2014 अन्वये अहवाल मा.सभापती (स्थायी समिती) व पाणिपुरवठा विभागास सादर केले आहे. | |

**आनंद चव्हाण** प्रस्तावाचे अनुषंगाने लेखा परिक्षण विभागाने अहवाल आलेला आहे त्याचे अवलोकन केले असता अपहाराचा गुन्हा केलेल्या सर्व कर्मचा-या विरुध्द कार्यवाही न करता ठरावीक कर्मचा-याच्या विरुध्द कार्यवाही करण्यात आलेली आहे नियमानुसार पैश्याचा अपहार करणा-या सर्वच कर्मचा-या विरुध्द कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**बाळासाहेब देशमूख** श्री पंडीत देशमूख यांनी पैश्याचा अपहार केला म्हणून त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात आली परंतु त्याचे बरोबर इतरही कर्मचा-यांनी पैश्याचा अपहार केलेला आहे मात्र त्याचे विरुण्द कार्यवाही करण्यात आलेली नाही.प्रशासन असा भेदाभेद का करीत आहे.

**दिपकसिंह रावत** सन २०११-२०१२ चा लेखा परिक्षण अहवालास मान्यता देण्याचा प्रस्ताव आहे त्या विषयाबरोबर याप्रस्तावावर चर्चा करण्यात यावी.

**आनंद चव्हाण** ज्या कर्मचा-यांनी केलेल्या अपहाराची रक्कम वसुल करुन त्यांचे विरुध्द करण्यात आलेली कार्यवाही मागे घेण्यात यावी.

**विनय पाटील** श्री आनंद चव्हाण यांनी जो प्रस्ताव मांडलात्यास माझे अनुमोदन आहे. संबंधित कर्मचा-याकडून अपहाराची रक्कम वसुल करण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** या प्रस्तावास आमचा विरोध आहे. सन २०११-२०१२ चा शासनाच्या लेखा विभागने लेखा परिक्षण अहवालात खुप गंभिर स्वरुपाचे आक्षेप नोंदविलेले असून या लेखा आक्षेपावर नियमाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.नसता स.सदस्यांवरच गुन्हें नोंद होतील.

**महापौर** श्री आनंद चव्हाण यांनी मांडलेल्या प्रस्तावा प्रमाणे मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२१०** **ठ रा व**

नावामनपाकेतील ज्या कर्मचा-यांनी सन २०१० पासून ते २०१४ पर्यत लेखा परिक्षणामध्ये पाणी पुरवठा विभाग, कर विभाग,व इतर विभागात मनपा रक्कमेचा पैश्याचा तात्पुरता अपहार केलेला आहे त्यापैकी काही कर्मचा-या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात आली तर काही कर्मचा-या विरुध्द कोणतीच कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही. करीता ज्या कर्मचा-यांनी मनपाकेच्या तात्पुरत्या रक्कमेच्या पैश्याचा अपहार केलेला आहे त्या सर्व कर्मचा-याकडून त्यांनी केलेल्या अपहाराची रक्कम वसुल करुन त्यांचे विरुध्द केलेली कार्यवाही प्रशासनाने मागे घ्यावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**नगरसचिव** मुळ विषयपत्रिकेवरील विषय क्र.३१ व पुरवणी विषय क्र.१५,१६,१७ हे समान विषय असल्यामूळे सभापटलावर एकदाच निर्णयासाठी ठेवण्यात येत आहे.

**विषय क्र.३१** **प्रस्ताव**

मनपा अस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांना व त्याचे कुटुंबातील व्यक्तीस गंभीर आजार प्रकरणी कर्मचारी कल्याण निधीतून आर्थिक मदत दिली जाते ती अत्यंत त्रोटक व अत्यंत अपुरी आहे.

मनपा सेवा प्रवेश नियम व उपविधी यांना अद्याप मान्यता प्राप्त झालेली नसल्याने अधिकारी व कर्मचा-यांना राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे जसेच्या तसे महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू आहेत.

राज्य शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियाना खाजगी रुग्णालयातील औषधोपचाराच्या वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येते.

श्री प्रकाश माधवराव येवले,सहायक आयुक्त यांना दि.४.२.२०१५ रोजी –हृदविकाराचा झटका आल्याने शहरातील शासन मान्य संजिवणी हॉस्पीटीलमध्ये त्याचे वर एन्जीओग्राफी नंतर एन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात आली त्यासाठी त्यांना रु.३,५९,८६०/-(अक्षरी रु.तीन लक्ष एकोणसाठ हजार आठशे साठ फक्त) एवढा खर्च झाला आहे.

शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियानी आकस्मीक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील उपचाराच्या औषधावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९०टक्के रक्कम देण्याबाबत महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागचे शासन निर्णय क्र.एमएजी-२००५/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि.१९ मार्च २००५ च्या निर्णयात नमूद आहे.या शासन निर्णयातील तरतुदीनूसार संबंधितांना औषधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के रक्कम देण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः-** रावत दिपकसिह काशिनाथसिंह **अनुमोदकः-** उमेश चव्हाण

**पुरवणी विषय पत्रीका विषय क्र.१५** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अस्थापनेवर कायम स्वरुपी कार्यरत असलेल्या सौ.शीला हनुमंतराव हिवरे, मुख्य लिपिक तथा अभिलेखे पर्यवेक्षक मनपा नांदेड व सौ.लिलावती डावरे, लिपीक यांना सेवोत्तम या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रशासनामार्फत कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/२०४७७/१५ दि.१३.२.२०१५ च्या आदेशानुसार यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी यशदा पुणे यैथे उपस्थित राहण्यासाठी आदेशित केले होते.

वरील संबंधित कर्मचारी नांदेडयेथून दि.२५.२.२०१५ रोजी अमुल ट्रव्हल्स ने पुणे येथे जात असतांना दुर्दैवाने दि.२६.२.२०१५ रोजी शिरुर जवळील गव्हाणवाडी येथे अमुल ट्रव्हल चा अपघात झाला व सदर अपघातामध्ये दोन्ही महिला कर्मचारी गंभिर जखमी झाल्या असल्यामूळे त्यांना एम्बुलन्सने पुणे येथील हार्डीकर हॉस्पीटल येथे आयसीयु मध्ये दाखल करण्यात आले, तेथे सौ.शिला हिवरे यांच्या पाठीमागच्या मणक्यावर शस्त्राक्रिया करण्यात आली त्यासाठी व औषधोपचारासाठी रु. ६.०० लक्ष एवढा खर्च झालेला आहे. तसेच संबंधितांना यापुढे हि किमानप एक वर्षभर औषधोपचार करावा लागणार आहे.

सौ.शिला हिवरे व सौ.निलावती डावरे या महिला कर्मचारी ऑन डयुटी अपघातात गंभिर जखमी होवून त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली असल्यामूळे त्यांना विशेष बाब म्हणून औषधोपचार व शस्त्रक्रियेसाठी झालेला खर्च देण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देते व सदरचा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः**- किशोर यादव **अनुमोदकः**- चाऊस हसिना बेगम साबेर चाऊस

**पुरवणी विषय पत्रीका विषय क्र.१६ प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचारी शेख इस्माईल शेख हुसेन लिपीक पाणी पुरवठा विभागात कार्यरत असून त्याच पत्नीचे कमरेतून दोन्ही पाय चालण्यासाठी काम करीत नसल्यामुळे त्यांचा उपचार जसलोक हॉस्पीटल रिसर्च सेंटर मुंबई येथे उपचार चालू असून त्यांचे उपचारावर अंदाजे रु.३.०० लक्ष खर्च झालेला आहे, करीता संबंधिताचे उपचारावर झालेला खर्च रु.३.०० लक्ष मनपा फंडातून अनुदान देणेसाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः**- स.जानी मोहमद कासिम **अनुमोदकः**- गफार खान गुलाम महमंद खान

**पुरवणी विषय पत्रीका विषय क्र.१७ प्रस्ताव**

मनपाकेतील कार्यरत कर्मचारी एम.एम. चंदेल लिपीक यांची आई पक्षघाता आजाराने बेशुध्द अवस्थेत गेल्यामुळे त्यांचया वैद्यकिय उपचारासाठी मोठा खर्च णालेला असून डॉक्टरच्या सल्यानुसार पुढील उपचार हैद्रबाद या ठिकाणी करणे आवश्यक असल्याने त्यांच्या इलाजासाठी रु. २.०० लक्ष खर्च अपेक्षीत आहे. संबंधीत कर्मचा-यांची आर्थीक परिस्थिती अत्यंत बिकट झालेली असल्यामुळे संबंधीत हे येवढा खर्च करु शकत नसल्याने त्यांना मनपा तर्फे आर्थीक मदत म्हणुन रु. २.०० लक्ष देण्यास ही मनपा सर्व साधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते..

**सुचकः**- गणपत गुणाजी धबाले, अन्नापुर्ण जम्मुसिंह ठाकूर **अनुमोदकः**- गफार खान गुलाम महमंद खान

**<u>प्रशासकीय अभिप्राय</u>**

नावाशमनपा आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना वैद्यकिय प्रतिपुर्तीच्या लाभ अनुज्ञेय नसल्यामुळे दुर्धर आजाराच्या उपचारासाठी मदतीच्या मागण्या वाढत असल्यामुळे दुर्धर आजाराच्या उपचारासाठी मदतीच्या मागण्या वाढत असल्यामुळे या बाबतीत सर्व समावेशक धोरण ठरवण्यास मनपा सर्व साधारण सभेने ठराव क्रं. १५९ दि. ०९.०१.२०१५ रोजी मान्यता प्रदान केली आहे.

त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागा मार्फत राज्यातील एकूण २२ मनपाकडून वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्ती बाबत माहिती व नियमावली उपलब्ध करुन देण्यासाठी कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साप्रवि/१९४९४/२०१५ दि. २७.०१.२०१५ अन्वये विनंती करण्यात आली त्यानुसार पुणे/मालेगांव/सोलापुर/अमदनगर/कोल्हापुर या मनपाकेकडून नियमालीची प्रत प्राप्त झाली असुन त्याप्रमाणे प्रशासना मार्फत नियमावली तयार करण्यासाठी कार्यवाही प्रस्तावित आहे.

नावाशमनपा सर्व साधारण ठराव क्रं. १५ दि. २४.०५.२००२ व्दारे मंजुर उपविधीत मनपा ठराव क्रं. १०८ दि. ३१.०८.२०१३ व्दारे सुधारणा केल्याप्रमाणे प्रारुप नियमावली तयार करण्यात आली असुन त्यानुसार कर्मचारी कल्याण निधी अंतर्गत कर्मचा-यांना दुर्धर आजारावर उपचार करण्यासाठी रु. १०,०००/- ची आर्थीक मदत देण्यात येते तथापि सदरचे आर्थीक सहाय्य कमी असल्याने खालील प्रमाणे कर्मचा-यांना मनपा सर्व साधारण सभेच्या मान्यतेने वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती देण्यात आली आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नांव व पदनाम | आजाराचे स्वरुप | महापालिका ठराव क्रं. व दिनांक | कार्यालयीन आदेश क्रं. व दिनांक | अर्थसहाय्य देण्यात आलेली रक्क्म रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री आनंद बाबुराव काबळे लिपीक | रेल्वे अपघातात मुलाचे दोन्ही पाय तुटल्यामुळे शाररिक अपंगत्व आल्याने कृत्रिम पायबसविणे व औषधोपचारासाठी आर्थीक सहाय्य | ठराव क्रं. ११८ दिनांक २४.११.२०१४ | नावाशमनपा/साप्रवि/१५७४५/१४ दिनांक ०१.१२.२०१४ | रु. ५,२५,०००/- |
| २ | श्री स. जिलानी स. मौला शिपाई | स्वतःच्या मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रियेसाठी झालेल्या खर्चास व औषधोपचारासाठी आर्थीक सहाय्य | ठराव क्रं. १५९ दिनांक ०९.०१.२०१५ | नावाशमनपा/साप्रवि/२१२०३/१५ दिनांक ०२.०३.२०१५ | रु. २,५०,०००/- |
| | श्री दिगंबर हिराजी गिरी, लिपीक | स्वतःला मदुमेह, क्षयरोग,किडणी आजारावरील औषधोपचारासाठी आर्थीक सहाय्य | ठराव क्रं. १५९ दिनांक ०९.०१.२०१५ | नावाशमनपा/साप्रवि/२१२०४/ दिनांक ०२.०३.२०१५ | रु. २,५०,०००/- |

तसेच पुनश्च खालील कर्मचा-यांनी स्वत:साठी व त्यांच्या नातेवाईकांच्या दुर्धर आजारावर उपचार करण्यासाठी वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देण्याबाबत विनंती अर्ज केलेले आहेत.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नांव व पदनाम | आर्थीक मदत मागण्याचे कारण | मागणी केलेली रक्क्म |
|---|---|---|---|
| १ | श्री अशोक दिगंबर दासरे, लिपीक | संबंधीताची मुलगी कु. अनया वय ९ महिणे हिचे बंगलोर येथील नारायण –हृदयालय या दवाखान्यात –हृदयाचे ऑपरेशन झाल्यामुळे आर्थीक सहाय्यक देण्या बाबत विनंती अर्ज दिनांक ०७.०१.२०१५ | रु. ३,००,०००/- |
| २ | श्री पाशमवाड संभाजी पिराजी, स्वच्छता निरीक्षक | छातीत दुखत असल्यामुळे दिनांक ०९.१२.२०१४ रोजी यशोदा हॉस्पीटल हैद्राबाद येथे ऑपरेशन करावे लागल्यामुळे आर्थीक सहाय्य देण्या बाबत विनंती अर्ज दिनांक २३.०१.२०१५ | रु. १,८३,५७५/- |
| ३ | श्री माणिकराव रंगराव वाघमारे, लिपीक | संबंधीतांच्या मुलगा चि. निखीलकुमार माणिकराव वाघमारे, यांचा अपघात होऊन डोक्याच्या कवटीचे ऑपरेशन ग्लोबल हॉस्पीटल नांदेड येथे झाले असल्याने ऑपरेशनचा खर्च रु. २.०० लक्ष व पुढील उपचारासाठी झालेला खर्च असे एकूण रु. ९.०० लक्ष आर्थीक सहाय्य देण्याबाबत विनंती अर्ज दिनांक २८.०१.२०१५ | रु. ९,००,०००/- |
| ४ | श्री कोंडीबा केशव डोके, माळी उद्यान विभाग | संबंधीताचा मुलगा दिनेश कोंडीबा डोके यांच्या दोन्ही किडण्या काम करीत नसल्यामुळे डायलेसिस उपचार चालू असून किडण्या बदलण्यासाठी रु. ५.०० लक्ष खर्च येणार असल्यामुळे आर्थीक सहाय्य देण्या बाबत विनंती अर्ज दि. ०९.०३.२०१५ | रु. ५,००,०००/- |
| ५ | श्री विलास माधवराव मटपल्लेवार, भांडारपाल | संबंधीताची आई वय वर्ष ९२ यांची प्रकृती दि. २५.१२.२०१४ पासुन बिघडली होती नांदेड येथील दवाखाण्यात उपचार न झाल्यामुळे आपोलो हॉस्पीटल हैद्राबाद येथील दवाखान्यात उपचार चालु असतांना दि. १८.०१.२०१५ रोजी निधन झाले आहे आईच्या उपचारासाठी झालेल्या खर्चाची वैद्यकिय प्रतिपुर्ती देण्यासाठी विनंती अर्ज दिनांक १६.०२.२०१५ | रु. ५,००,०००/- |
| ६ | सौ. शीला हनुमंतराव हिरवे, अभिलेखे पर्यवेक्षक | संबंधीतांना कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/ २०४७७/ १५ दिनांक १३.०२.२०१५ अन्वये यशवंतराव चव्हाण प्रशासन विकास प्रबोधीनी पुणे येथे दि. २६ ते २८ फेब्रुवारी २०१५ सेवोत्तम या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सौ. शीला हनुमंतराव हिरवे अभिलेख पर्यवेक्षक व सौ. निलावती डावरे लिपीक यांना उपस्थित राहण्यासाठी आदेशीत करण्यात आले होते संबंधीत हया नांदेड ते पुणे हा प्रवास अमुल ट्रव्हल्सने प्रवास करत असतांना दिनांक २६.०२.२०१५ रोजी सकाळी ५.०० वाजता अहमदनगर जवळील गव्हाणवाडी येथे बसला अपघात होऊन जबरदस्त दुखापत झाल्यामुळे प्राथमिक उपचारार्थ शिरुर येथील मंगल हॉस्पीटल या ठिकाणी नेण्यात आले तसेच पुढील उपचारासाठी हार्डीकर हॉस्पीटल पुणे येथे दाखल करण्यात आले तेथे पाठीच्या मणक्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली त्यासाठी खालील प्रमाणे खर्च झालेला आहे. रुग्णवाहिकेचा खर्च रु.२०,०००/- हजार औषधाचाखर्च रु.३५,०००/- हजार शस्त्रक्रियाचा खर्च रु. २,८८,७३९/- तसेच रु. १२,०००/- हजार प्रतिमहा प्रमाणे वर्षभरासाठी १३ इजेक्शनचा खर्च रुपये १,५६,०००/- याप्रमाणे रु. ६.०० लक्ष आर्थीक सहाय्य देण्यात बाबत विनंती अर्ज दिनांक १६.०३.२०१५ रोजी संबंधीत वरील दोन्ही कर्मचारी प्रशिक्षणास उपस्थित राहण्याकरिता जात असतांना अपघात झालेला आहे. | |

उपरोक्त सर्व बाब लक्षात घेता नावाशमनपा सर्व साधारण सभा ठराव क्रं. १५९ दि. ०९.०१.१५ रोजी समंत केलेल्या ठरावानुसार प्रशासना मार्फत एकूण २२ मनपाकेकडून मनपा अधिकारी व कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देणे बाबत माहिती/नियमावली मागविण्यात आली होती त्यापैकी ५ मनपाकेच्या नियमावली प्राप्त झालेल्या आहेत सदर नियमावलीचे व प्रचलीत शासन निर्णय क्रं. एमएजी-२००५/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि. १९.०३.२०१५ चे अवलोकन करुन त्या आधारे नावाशमनपाकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देणे बाबत सविस्तर नियमावली तयार करुन मनपा सर्व साधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येणार असून त्यावर निर्णय झाल्यानंतर सदर निर्णयानुसार उक्त सर्व कर्मचा-यांना नियमावलीतील तरतुदी नुसार वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती देणे बाबत निर्णय घेणे सुलभ होईल.

**महापौर** विषय पत्रिकेवरील विषय क्र.३१ वर स्वतंत्र व पुरवणी विषयपत्रिकेवरील विषय क्र.१५,१६,१७ वर एकत्रित निर्णय धेण्यात येईल.

**विरेंद्रसिघ गाडीवाले** ज्ञान असलेले अधिकारी कर्मचारी स.सदस्यामार्फत वैद्यकिय प्रतिपुर्तीचे प्रस्ताव ठेवित आहेत परंतु आज पर्यत चतुर्थ कर्मचारी, सफाई मजुर या गरीब कर्मचा-यांनी त्याना ज्ञान नसल्यामूळे आज पर्यत त्यांनी वैद्यकिय प्रतिपूर्तीसाठी विनंती अर्ज प्रस्ताव दिलेले नाही वैद्यकिय प्रतिपुर्तीचे नियम तयार करुन ते सर्वाना समानतेने लागू करावे. वैयक्तीक प्रस्ताव मंजुर करणे चुकीचे आहे.

**उपआयुक्त प्रशासन** तीन कर्मचा-यांना वैद्यकिय मदत म्हणून अनुदान देण्यात आलेले आहे व त्याच धर्तीवर ६ कर्मचा-यानी वैद्यकिय प्रतिपुर्तीचा लाभ देण्यासाठी विनंती अर्ज सादर केलेले आहे.

**दिपकसिंह रावत** महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागचे शासन निर्णय क्र.एमएजी-२००५/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि.१९ मार्च २००५ च्या निर्णयातील तरतूदीनूसार कर्मचा-यांनी वैद्यकिय प्रतिपुर्तीची मागणी केलेली असल्यामूळे शासन निर्णयानुसार या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**सरजितसिंघ गिल** यापुर्वी महासभेने तीन कर्मचा-यांना औषधोपचारासाठी आर्थिक मदत दिलेली असून त्या अनुषंगाने इतरही कर्मचा-यांनी शासन परिपत्रकानूसार औषधोपचारासाकरीता मदत देण्याची विनंती केली आहे. करीता या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**उमेश चव्हाण** महासभेने यापुर्वी नालीत पडून एकाचा मृत्यू झाल्यामूळे त्यांच्या कुटुंबियास रु.४,०० लाखाची आर्थिक मदत दिली होती महानगरपालिकेचे कर्मचारी असल्यामूळे त्यांना औषधोपचारासाठी आर्थिक मदत देण्याचे प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**स.शेर अली** खुदवईनगर भागात ड्रेनेज चेंबरमध्ये गुदमरुन दोन मजुरांचा मुत्यृ झाल्यामूळै त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याचा ठराव सर्वसाधारण सभेने पास केलेले आहे परंतु अद्याप या ठरावाची अमलबजावणी करण्यात आलेली नाही.

**सरजितसिंघ गिल** सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्याप्रमाणे खुदवईनगर येथील चेंबरमध्ये गुंदमरुन दोन मजुरांचा मृत्यू झाला त्यांचे कुटुंबियाना आर्थिक मदत देण्याचा ठराव पास करण्यात आलेला आहे त्याप्रमाणे आर्थिक मदत देण्यात यावी.

**महापौर** सर्वसाधरण सभेने पारीत केलेल्या ठरावा प्रमाणे मजुरांच्या कुटूबियांना आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच संबंधित कंत्राटदाराचे देयकातून रक्कम कपात करुन सबंधित कुटुंबियाना आर्थिक मदत देण्यात यावी.

**अशोक उमरेकर** श्री माणिक वाघमारे.लिपिक यांनी त्यांचा मुलगा चि. निखीलकुमार माणिकराव वाघमारे, यांचा अपघात होऊन डोक्याच्या कवटीचे ऑपरेशन ग्लोबल हॉस्पीटल नांदेड येथे झाले असल्याने ऑपरेशनचा खर्च रु. २.०० लक्ष व पुढील उपचारासाठी झालेला खर्च असे एकूण रु. ९.०० लक्षाची आथिक मदत देण्यासाठी मागील दिड दोन वर्षापासुन पाठपुरावा करीत आहे. त्यांनाही आर्थिक मदत देण्यात यावी.

**सुंदरलाल गुरुखुदे** महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता महानगरपालिकेतील २००० कर्मचा-यांची संख्या विचारात धेता सर्वाना ८-९ लाखाची वैद्यकिय प्रतिपुर्ती देणे शक्य आहे काय याचाही विचार करण्यात यावा. महानगरपालिकेतील सर्व कर्मचा-यांना विमा उतरविण्यात यावा व त्याचा प्रिमियम मनपाकेने भरावा.

**आयुक्त** महानगरपालिकेतील कर्मचा-यांना ग्रूप इन्शुरन्स स्कीम आहे. फॅमीली पेन्शन योजना आहे.इतर महानगरपालिकेत कर्मचा-यांना वैद्यकिय प्रतिपुर्ती देण्यात येते काय देण्यात असेल तर त्यांच्या नियम व अटी काय आहे हे तपासून त्याप्रमाणे नियम तयार करुन प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर ठेवण्यात येइल.

**महापौर** विषय पत्रिकेवरील विषय क्र.३१ वर स्वतंत्र व पुरवणी विषयपत्रिकेवरील विषय क्र.१५,१६,१७ वर एकत्रित निर्णय घेण्यात येत असून .स.सदस्यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यात येते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. २११** **ठ रा व**

मनपा अस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांना व त्याचे कुटुंबातील व्यक्तीस गंभीर आजार प्रकरणी कर्मचारी कल्याण निधीतून आर्थिक मदत दिली जाते ती अत्यंत त्रोटक व अत्यंत अपुरी आहे.

मनपा सेवा प्रवेश नियम व उपविधी यांना अद्याप मान्यता प्राप्त झालेली नसल्याने अधिकारी व कर्मचा-यांना राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे जसेच्या तसे महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू आहेत.

राज्य शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना खाजगी रुग्णालयातील औषधोपचाराच्या वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येते.

श्री प्रकाश माधवराव येवले,सहायक आयुक्त यांना दि.४.२.२०१५ रोजी –हदविकाराचा झटका आल्याने शहरातील शासन मान्य संजिवणी हॉस्पीटीलमध्ये त्याचे वर एन्जीओग्राफी नंतर एन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात आली त्यासाठी त्यांना रु.३,५९,८६०/-(अक्षरी रु.तीन लक्ष एकोणसाठ हजार आठशे साठ फक्त) एवढा खर्च झाला आहे.

शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियानी आकस्मीक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील उपचाराच्या औषधावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९०टक्के रक्कम देण्याबाबत महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरेग्य विभागचे शासन निर्णय क्र.एमएजी-२००५/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि.१९ मार्च २००५ च्या निर्णयात नमूद आहे.या शासन निर्णयातील तरतुदीनूसार संबंधितांना औषधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के रक्कम देण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. २११/१** **ठ रा व**

मनपा अस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांना व त्याचे कुटुंबातील व्यक्तीस गंभीर आजार प्रकरणी कर्मचारी कल्याण निधीतून आर्थिक मदत दिली जाते ती अत्यंत त्रोटक व अत्यंत अपुरी आहे.

मनपा सेवा प्रवेश नियम व उपविधी यांना अद्याप मान्यता प्राप्त झालेली नसल्याने अधिकारी व कर्मचा-यांना राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे जसेच्या तसे महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू आहेत. राज्य शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना खाजगी रुग्णालयातील औषधोपचाराच्या वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येते.

खालील महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचा-यांनीही त्यांच्या कुटुंबियानी आकस्मीक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील उपचाराच्या औषधावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के रक्कम देण्याबाबत विनंती केलेली आहे. करिता खालील कर्मचा-यांना महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरेग्य विभागचे शासन निर्णय क्र.एमएजी-२००५/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि. १९ मार्च २००५ च्या निर्णयात तरतुदीनुसार औषधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के रक्कम देण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नांव व पदनाम | आर्थीक मदत मागण्याचे कारण | मागणी केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री अशोक दिगंबर दासरे, लिपीक | संबंधीताची मुलगी कु. अनया वय ९ महिणे हिचे बंगलोर येथील नारायण –हदयालय या दवाखान्यात –हदयाचे ऑपरेशन झाल्यामुळे आर्थीक सहाय्यक देण्या बाबत विनंती अर्ज दिनांक ०७.०१.२०१५ | रु. ३,००,०००/- |
| २ | श्री पाशमवाड संभाजी पिराजी, स्वच्छता निरीक्षक | छातीत दुखत असल्यामुळे दिनांक ०९.१२.२०१४ रोजी यशोदा हॉस्पीटल हैद्राबाद येथे ऑपरेशन करावे लागल्यामुळे आर्थीक सहाय्य देण्या बाबत विनंती अर्ज दिनांक २३.०१.२०१५ | रु. १,८३,५७५/- |
| ३ | श्री माणिकराव रंगराव वाघमारे , लिपीक | संबंधीतांच्या मुलगा चि. निखीलकुमार माणिकराव वाघमारे, यांचा अपघात होऊन डोक्याच्या कवटीचे ऑपरेशन ग्लोबल हॉस्पीटल नांदेड येथे झाले असल्याने ऑपरेशनचा खर्च रु. २.०० लक्ष व पुढील उपचारासाठी झालेला खर्च असे एकूण रु. ९.०० लक्ष आर्थीक सहाय्य देण्याबाबत विनंती अर्ज दिनांक २८.०१.२०१५ | रु. ९,००,०००/- |
| ४ | श्री कोंडीबा केशव डोके, माळी उद्यान विभाग | संबंधीताचा मुलगा दिनेश कोंडीबा डोके यांच्या दोन्ही किडण्या काम करीत नसल्यामुळे डायलेसिस उपचार चालू असून किडण्या बदलण्यासाठी रु. ५.०० लक्ष खर्च येणार असल्यामुळे आर्थीक सहाय्य देण्या बाबत विनंती अर्ज दि. ०९.०३.२०१५ | रु. ५,००,०००/- |
| ५ | श्री विलास माधवराव मटपल्लेवार, भांडारपाल | संबंधीताची आई वय वर्ष ९२ यांची प्रकृती दिनांक २५.१२.२०१४ पासुन बिघडली होती नांदेड येथील दवाखाण्यात उपचार न झाल्यामुळे आपोलो हॉस्पीटल हैद्राबाद येथील दवाखान्यात उपचार चालु असतांना दि. १८.०१.२०१५ रोजी निधन झाले आहे आईच्या उपचारासाठी झालेल्या खर्चाची वैद्यकिय प्रतिपुर्ती देण्यासाठी विनंती अर्ज दिनांक १६.०२.२०१५ | रु. ५,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | सौ. शीला हनुमंतराव हिरवे, अभिलेखे पर्यवेक्षक | संबंधीतांना कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/ २०४७७/ १५ दिनांक १३.०२.२०१५ अन्वये यशवंतराव चव्हाण प्रशासन विकास प्रबोधीनी पुणे येथे दि. २६ ते २८ फेब्रुवारी २०१५ सेवोत्तम या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सौ. शीला हनुमंतराव हिरवे अभिलेख पर्यवेक्षक व सौ. निलावती डावरे लिपीक यांना उपस्थित राहण्यासाठी आदेशीत करण्यात आले होते संबंधीत हया नांदेड ते पुणे हा प्रवास अमुल ट्रव्हल्सने प्रवास करत असतांना दि. २६.०२.२०१५ रोजी सकाळी ५.०० वाजता अहमदनगर जवळील गव्हाणवाडी येथे बसला अपघात होऊन जबरदस्त दुखापत झाल्यामुळे प्राथमिक उपचारार्थ शिरुर येथील मंगल हॉस्पीटल या ठिकाणी नेण्यात आले तसेच पुढील उपचारासाठी हार्डीकर हॉस्पीटल पुणे येथे दाखल करण्यात आले तेथे पाठीच्या मणक्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली त्यासाठी खालील प्रमाणे खर्च झालेला आहे. रुग्णवाहिकेचा खर्च रु.२०,०००/- हजार औषधाचाखर्च रु.३५,०००/- हजार शस्त्रक्रियाचा खर्च रु.२,८८,७३९/-तसेच रु.१२,०००/- हजार प्रतिमहा प्रमाणे वर्षभरासाठी १३ इजेक्शनचा खर्च रुपये १,५६,०००/- याप्रमाणे रु. ६.०० लक्ष आर्थीक सहाय्य देण्यात बाबत विनंती अर्ज दि. १६.०३.२०१५ रोजी संबंधीत वरील दोन्ही कर्मचारी प्रशिक्षणास उपस्थित राहण्याकरिता जात असतांना अपघात झालेला आहे. | |
| ७ | श्री म. रईसोद्यीन खाजा अहेमदोद्यीन, पशुशल्य चिकित्सक | श्री म. रईसोद्यीन पशुशल्य चिकित्सक यांचे वडील खाजा अहेमदोद्यीन यांना –हदविकाराचा झटका आल्याने त्यांना पुणे येथील शासन मान्य दिनानाथ मंगेश हॉस्पीटल येथे वैद्यकिय उपचार व औषधोपचार करण्यात आला त्यासाठी त्यांना जवळपास रु. १,६५,०००/- एवढा खर्च झालेला आहे. | रु. १,६५,०००/- |
| ८ | श्री शेख इस्माईल शेख हुसेन, लिपिक पाणी पुरवठा | शेख इस्माईल शेख हुसेन याचे पत्नीचे कमरेतून दोन्ही पाय चालण्यासाठी काम करीत नसल्यामूळे त्यांचा उपचार जसलोक हॉस्पीटल रिसर्च सेंटर मुंबई येथे उपचार चालू असून त्यांचे उपचारावर अंदाजे रु.३.०० लक्ष खर्च झालेला आहे, उपचारावर झालेला खर्च रु.३.०० लक्ष मनपा फंडातून अनुदान देणे | रु.३,००,०००/- |
| ९ | श्रीएम.एम.चंदेल.लिपिक,लेखा विभास. | मनपाकेतील कार्यरत कर्मचारी एम.एम. चंदेल लिपीक ची आई पक्षघाता आजाराने बेशुध्द अवस्थेत गेल्यामुळे चया वैद्यकिय उपचारासाठी मोठा खर्च णालेला असून डॉक्टरच्या सल्यानुसार पुढील उपचार हैद्रबाद या ठिकाणी करणे आवश्यक असल्याने त्यांच्या इलाजासाठी रु. २.०० लक्ष खर्च अपेक्षीत आहे.संबंधीत कर्मचा-यांची आर्थीक परिस्थिती अत्यंत बिकट झालेलीअसल्यामुळे संबंधीत हे येवढा खर्च करु शकत नसल्याने त्यांनामनपा तर्फे आर्थीक मदत म्हणुन रु. २.०० लक्ष देणे | रु.२,००,०००/- |

**विषय क्र.३२** **प्रस्ताव**

नांवाशमनपा मंजुर सुधारीत विकास आराखडयात आरक्षण क्र.३६ प्ले ग्रावुंड, आरक्षण क्र.३७ हायस्कुल आणि आरक्षण क्र.३८ प्रिप्रायमरी शाळेकरीता आरक्षण आहे.परंतु सदरील आरक्षण असलेल्या जागेवर मोठया प्रमाणात लोकवस्ती झालेली असून महानगरपालिका तेथील मालमत्ताधारकाकडून नियमित मालमत्ता कर इतर कराची वसुनली करीत असल्यामूळे सदर मंजुर सुधारीत विकास आराखडयातील आरक्षण वगळयासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देणे बाबत.

**सुचकः-** सौ.सविता मारोतराव कंठेवाड **अनुमोदकः-** प्रविण बालाप्रसाद बियाणी

**प्रशासकीय अभिप्राय**

नांदेड शहराची सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस ३२०६/४८८/प्र.क्र.१०४/२००६ नवि दि.३.८.२००६ अन्वये मंजुर करण्यात आलेली असून ही सुधारीत विकास योजना दि.१५.८.२००६ पासून अमलात आलेली आहे.

शासनाचे परिपत्रक क्र.टिपीबी ४३२००१/२४४२/प्र.क्र.२६०/२००१ /नवि-११ दि.२९ ऑगस्ट २००३ नुसार प्ले ग्रावुंड चे आरक्षण वगळता येत नाही. सदरचे आरक्षण वगळावयाचे झाल्यास त्यास मंत्रीमंडळाची मान्यता लागते.

नमूद तिन्ही आरक्षण वगळावयाचे झाल्यास म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अंतर्गत किरकोळ फेरबदलाची वैधानिक कार्यवाही करुन रितसर प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करावा लागेल.

**सविता कंठेवाड** अनेक दिवसापासुन आरक्षण क्र.३६ प्ले ग्रावुंड, आरक्षण क्र.३७ हायस्कुल आणि आरक्षण क्र.३८ प्रिप्रायमरी शाळेकरीता आरक्षण आहे.या आरक्षणाच्या जागेवर मोठया प्रमाणात लोकवस्ती झालेली असून ते नियमाप्रमाणे महानगरपालिकेचा कर भरीत आहेत.त्यांच्या जागेवर आरक्षण असल्यामूळे नागरीकांना बांधकामाची परवानगी मिळत नाही. करीता सदरील जागेवरील आरक्षण उठविण्यासाठी महाराष्ट्र शासनास शिफारस करण्यात यावी.

**सरजितसिंघ गिल** विकास योजनेतील ज्या ज्या आरक्षण असलेल्या जागेवर मोठया प्रमाणात लोक वस्ती झालेली आहे अशा सर्व आरक्षणचा सर्व्हे करुन अशी आरक्षणे वगळण्यासाठी सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवावा अशा प्रकारचा निर्णय याआधीच सर्वसाधारण सभेने घेतलेला आहे त्यामूळे लोकवस्ती झालेले आरक्षण वगळण्याचा एकत्रित प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा.

**स.शेर अली** अनेक आरक्षणाच्या जागेवर बिएसयुपीची घरे झालेली आहे त्यामूळे अशी लोकवस्ती झालेली आरक्षणे वगळण्यासाठीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर ठेवण्यात यावा.

**रामनाराणजी काबरा** नांदेड शहराकरीता एफएसआय वाढवून देण्यासाठी शासनास शिफारस करण्याचा ठराव सर्वसाधारण सभेने पारीत केलेला आहे. हा ठराव शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे किंवा नाही.महापौरांनी सर्व पदाधिका-याची शिष्टमंडळासह मा.मुख्यमंत्रयांना भेटून एफएसआय वाढवून देण्यासाठी निवेदन देण्यात यावे.

**आयुक्त** आरक्षणाची पाहणी करुन सविस्तर अहवाल सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात येइल.एफएसआय वाढवून देण्याबाबत शासन राज्यातील एकाच महानगरपालिका पुरता निर्णय घेणार नाही.सर्वच महानगरपालिकेकरीता एफएसआय वाढीचा निर्णय घेईल ,नांदेड शहरावर अन्याय होणार नाही.

**महापौर** श्री सरजितसिंघ गिल व श्री शेर अली यांनी मांडलेल्या प्रस्तावा प्रमाणे ज्या आरक्षणावर लोकवस्ती झालेली आहे अशी सर्व आरक्षण वगळण्याचा एकत्रित प्रस्ताव सादर करण्यात यावा.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२१२** **ठ रा व**

यापुर्वी नावांनपा सर्वसाधारण सभेने संमत केलेल्या ठरावा प्रमाणे नांवाशमनपा मंजुर सुधारीत विकास आराखडयातील सर्व आरक्षणाचा सर्व्हे करुन ज्या ज्या आरक्षणावर दाट लोकवस्ती झालेली आहे अशी सर्व आरक्षणे आरक्षण क्र.३६ प्ले ग्रावुंड, आरक्षण क्र.३७ हायस्कुल आणि आरक्षण क्र.३८ प्रिप्रायमरी शाळेकरीता असलेले आरक्षण वगळण्याचा प्रस्ताव स.संचालक नगररचना नांवामनपा यांचे मार्फत सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा असेही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वनुमते संमत करते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.३३** **प्रस्ताव**

नांवाशमनपा प्रभाग क्र.४ मधील गांधीनगरात जवळपास ८० टक्के दलित वस्ती असुन या ठिकाणी कोणत्याच प्रकारच्या नागरी सुविधा उपलब्द नाही करीता गांधीनगर हा भाग दलित वस्ती म्हणून घोषित करण्यास व तेथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत आवश्यक त्या नागरी सुविधा उपलब्द करुन देण्यासाठी लागणा-या खर्चास दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**सुचकः-** सौ.सविता मारोतराव कंठेवाड **अनुमोदकः-** प्रविण बालाप्रसाद बियाणी

**आयुक्त** स..सदस्यांनी प्रस्तावात त्याचे प्रभागात ८० टक्के दलित वस्ती असल्याचे नमूद केलेले आहे हे कशाच्या आधारावर, दलित वस्तीचा सर्व्हे कोणी केलेला आहे.सदरचा भाग हा गावठाण एरिया आहे काय, शासन निर्णयानुसार जनगणने प्रमाणे संबंधित वस्तीत ५० टक्के पेक्षा अधिक अनुसुचित जातीचे नागरीक रहात असल्याबाबत समाज कल्याण विभागाने प्रमाणित केले पाहिजे.

**सविता कंठेवाड** गांधी नगर भागात पुर्ण दलित नागरीक राहत असल्यामूळे या भागाचा सर्व्हे करणेसाठी संबंधित विभागास विनंती करण्यात आलेली आहे.त्यानी सर्व्हे केला किंवा नाही याची माहिती नाही.

**बालासाहेब देशमूख** दलित वस्ती घोषित करण्यासाठी शासनाने काय नॉर्मस ठरविलेले आहे ते सांगावे.

**महापौर** दलित वस्ती घोषित करण्याचे अधिकार महासभेस आहेत,

**उमेश चव्हाण** शासन परिपत्रकात ज्या लोकवस्तीत ब्लॉक प्रमाणे ५० टक्के पेक्षा अधिक दलित राहतात त्या वस्त्याना दलित वस्त्या घोषित कराव्यात असे नमूद आहे. सदर शासन परिपत्रकाप्रमाणे मागील ३० वर्षापासून महानगरपालिकेचे अभियंते सर्व्हे करुन दलितांची टक्केवारी काढतात व त्याप्रमाणे दलित वस्ती घोषित

करण्यासाठी सर्वसाधारण सभेची मान्यता घेतात.सर्व प्रभागातील दलित वस्तीचा सर्व्हे करुन दलित वस्त्या घोषित करण्यात याव्यात.

**गफार खान** ऑगस्ट २०१४ मध्ये शासनाने दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत दिलित वस्त्यात कामे करण्यासाठी अनुदान मंजुर केलेले असल्यामूळे या मंजुर अनुदानातून दलित वस्त्यात कामे घेण्यासाठी सर्वसाधारण सभेने मान्यता देवून प्रस्ताव जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे सादर करण्यात आलेला असून जिल्हाधिका-यांनी काही त्रुटया काढलेल्या आहेत. का.अभियंता यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधुन त्रुटयाची पुर्तता करुन तातडीने दलित वस्त्यात कोटयावधी रुपयाचे कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न करावा.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो .नियमानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.२१३** **ठ रा व**

नांवाशमनपा प्रभाग क्र.४ मधील गांधीनगरात जवळपास ८० टक्के दलित वस्ती असुन या ठिकाणी कोणत्याच प्रकारच्या नागरी सुविधा उपलब्द नाही करीता गांधीनगर हा भाग दलित वस्ती म्हणून घोषित करण्यास व तेथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत आवश्यक त्या नागरी सुविधा उपलब्द करुन देण्यासाठी लागणा-या खर्चास दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.३४** **प्रस्ताव**

नांवाशमनपा हदीतील प्रभाग क्र.२८ मधील दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत शासन निर्णय क्र.वि.हा.यो./२०१४/ प्र.क्र.९५ /नवि-४ दि.८.८.२०१४ अन्वये व मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.८३ दि.१४.८.२०१४ मधील अनुक्रमांक ४७ प्र.क्र.२८ पंचशिलनगर भागातील बुध्दविहार सभागृहाचे बांधकाम करणे असे मंजुरी मिळालेली आहे परंतु पचशिलनगर हे नाव चुकीने पडले असून ते संघसेननगर असे आहे. तशी दुरुस्ती करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचकः-** फारुख हुसेन कासिम साब **अनुमोदकः-** चांद पाशा कुरेशी

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२१४** **ठ रा व**

नांवाशमनपा हदीतील प्रभाग क्र.२८ मधील दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत शासन निर्णय क्र.वि.हा.यो. /२०१४/ प्र.क्र.९५/ नवि-४ दि.८.८.२०१४ अन्वये व मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.८३ दि.१४.८.२०१४ मधील अनुक्रमांक ४७ प्र.क्र.२८ पंचशिलनगर भागातील बुध्दविहार सभागृहाचे बांधकाम करणे असे मंजुरी मिळालेली आहे परंतु पचशिलनगर हे नाव चुकीने पडले असून ते संघसेननगर असे आहे. करीता ठराव क्र.८३ दि.१४.८.२०१४ मधील अनुक्रमांक ४७ वर प्रभाग क्र.२८ पंचशिलनगर भागातील बुध्द विहारसभागृहाचे बांधकाम करणे या ऐवजी प्रभाग क्र.२८ संघसेन नगर भागातील बुध्द विहारसभागृहाचे बांधकाम करणे तशी दुरुस्ती करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.व हा ठराव याचसभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.३५** **प्रस्ताव**

जेएनएनयूआरएम योजने अंतर्गत रोड क्र.७ व ८ या रस्त्याची सुधारणा करण्याचे आदेश मोरेश्वर बिल्डर्स ,एण्ड डेव्हलपर्स या कत्राटदारास दि.१९.७.२००७ रोजी देण्यत आले होते. रोड क्र.७ आणि ८ याठिकाणी रस्ता सुधारण्याच्या अगोदर जलनिस्सारणाची कामे करण्यासाठी ज्या कंत्राटदारास आदेशित करण्यात आले होते त्यांनी विहित मुदतीत कामे पुर्ण केले नाही तसेच रस्त्याच्या रुंदीकरणासठी लागणा-या रस्त्याचे भुसंपादनाची कार्यवाही विहित कालावधीत पुर्ण केली नाहीत, तसेच रुंदीकरणात येणारे विद्युत वितरणाचे पोलही हटविण्यात आले नाही. नियोजित रस्त्यावरील अतिक्रमणही काढण्यात आलेले नाही या सर्व बाबीमूळे मोरेश्वर बिलडर्स एण्ड डेवहलपर्स यांना विहित मुदतीत रस्त्या सुधारण्याची कामे पुर्ण करता आलेली नाहीत, हि वस्तुस्थिती आहे अशी सर्व परिस्थिती असतांनाही विहित मुदतीत कंत्राटदाराने काम पुर्ण केले नाही म्हणून प्रशासनाने एकतर्फी निर्णय घेवून मोरेश्वर बिल्डर्स एण्ड डेव्हलपर्स या कंत्राटदारास रु.२३,००,०००/- दंड आकारला मंजुर करण्यात आलेल्या निविदादरामध्ये अंशतः कमी केलेल्या दराच्या फरकाची रक्कम रु.२०,००,०००/- कपात केली तसेच त्यांनी रस्ता सुधारणाचे जे काम केले होते त्या कामाचे देयाक रु.१,५२,००,०००/-सुध्दा देण्यात आलेले नाही.त्यांची सुरक्षा अनामत रककमही रु.६३,००,०००/-देण्यात आलेली नाही.रस्त्याची कामे विहित मुदतीत पुर्ण करण्याकरीता कोणत्या अडचणी येत आहेत याबाबत कंत्राटदाराने प्रशासनाला वारंवार स्पष्टीकरणासहीत खुलासा सादरकरुन वस्तुस्थितीची जाणीव करुन दिली होती. उपरोक्त रस्त्यांच्या कामांच्या विलंबास मोरेश्वर एण्ड डेवहलपर्स हे कसुरदार नसतांनाही प्रशासनाने रु.२३,००,०००/-दंड आकारला तो माफ करण्यात येतो.मंजुर करण्यात आलेल्या निविदादरामध्ये अंशतः कमी केलेल्या दराच्या फरकाची जी रक्कम रु.२०,००,०००/- कपात केली ती परत करण्यास मान्यता देण्यात येते तसेच त्यांनी रस्ता सुधारण्याचे जे काम केले होते त्या कामाचे देयक रु.१,५२,००,०००/-अदाई करण्यास मान्यता देण्यात येते त्यांची सुरक्षा अनामत रक्कमही रु.६३,००,०००/-परत देण्यास मान्यता देण्यात येते असे एकूण रुप.२,५६,००,०००/- या रक्कमेस मोरेश्वर बिल्डर्स एण्ड डेव्हलपर्स यांना अदाई करण्याकरीता प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक :-** उमरेकर अशोक रावणराव **अनूमोदकः-** उमेश पवळे

**अशोक उमरेकर** या प्रस्तावाचे अनुषंगाने प्रशासनाने काही टिप्पणी आलेली असेल तर ती सभागृहात वाचुन दाखविण्यात यावी. गुरु ता गध्दी या पवित्र कार्यक्रम २००८ अंतर्गत जेएनएनयूआरएम योजने मधून रोड क्र.७ व ८ या रस्त्याची सुधारणा करण्याचे काम मोरेश्वर बिल्डर्स ,एण्ड डेव्हलपर्स या कत्राटदारास देण्यात आले होते परंतु या रोडच्या ठिकाणी रस्ता सुधारण्याच्या अगोदर जलनिस्सारणाची कामे करण्यासाठी ज्या कंत्राटदारास आदेशित करण्यात आले होते त्यांनी विहित मुदतीत कामे पुर्ण केले नाही तसेच रस्त्याच्या रुंदीकरणासठी लागणा-या रस्त्याचे भुसंपादनाची कार्यवाही विहित कालावधीत पुर्ण केली नाहीत, तसेच रुंदीकरणात येणारे विद्युत वितरणाचे पोलही हटविण्यात आले नाही. नियोजित रस्त्यावरील २०० ते २५० घराचे बांधकामही पाडण्यात आलेले नाही या सर्व बाबीमूळे मोरेश्वर बिलडर्स एण्ड डेवहलपर्स यांना विहित मुदतीत रस्ता सुधारण्याची कामे पुर्ण करता आलेली नाहीत, हि वस्तुस्थिती असून या वस्तुस्थितीची पुर्ण कल्पणा संबंधित कंत्राटदाराने आयुक्ताना वेळोवेळी दिलेली आहे अशी सर्व परिस्थिती असतांनाही विहित मुदतीत कंत्राटदाराने काम पुर्ण केले नाही म्हणून त्यांना दंड आकारला, कमी केलेल्या दराच्या फरकाची रक्कम कपात करण्यात आली, रस्ताचे जे काम केले होते त्या कामाचे देयक सुध्दा देण्यात आलेले नाही. त्यांची सुरक्षा अनामत रककमही देण्यात आलेली नाही हा कत्राटदारावर अन्याय आहे.आज त्यांची लेकर बाहे उघडयावर पडलेली आहे. आयुक्तांना विनंती आहे की,कत्राटदाराशी विचार विनिमय करुन त्यांच्या देयकांची अदाई त्वरीत करावी.

**उमेशसिंह चव्हाण** श्री अशोक उमरेकर यांनी कंत्राटदाराच्या बाबतीत मोठी सहानुभूती दाखविलेली आहे. गुरु ता गध्दी कार्यक्रमा अंतर्गत या रस्त्याचे काम विहित कालावधीत करणे आवश्यक होते परंतु कंत्राटदाराने काम न करता काम अर्धवट सोडून पळ काढलेला असून आयुक्तांनी आपल्या अधिकारात निर्णय घेतलेला आहे.त्या विरुध्द कंत्राटदाराने स्थायी समितीकडे अपिल केले होते.स्थायी समितीने घेतलल्या ठरावास संबंधित कंत्राटदाराने हायकोर्टातही अपिल केले होते हायकोर्टाने याप्रकरणात स्थायी समितीच्या ठरावावर राज्य शासनाने निर्णय घ्यावा असा निर्णय दिला असता राज्य शासनाने संबंधित कंत्राटदाराचे व महानगरपालिकेचे म्हणणे ऐकून घेवून स्थायी समितीचा ठराव रध्द केलेला आहे. असे असतांना ही आपणास या प्रस्तावावर निर्णय धेता येतो काय याबाबत आयुक्तांनी खुलासा करावा.रस्ता क्र. ७ व ८ चे काम दुस-या कंत्राटदाराकडून काम करुन घेण्यात आल्यामूळे जो जास्तीचा खर्च आला तो खर्चही मोरेश्वर कंपनीकडून वसुल करावा असेही निर्देष आहे.

**उमेश पवळे** याच कंत्राटदाराने सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत नांदेड जिल्हयातील रस्त्याची कामे घेतलेली होती त्या विभागाने देखील सुरवातीस खंड ३ (क) खालीच कामे काढून घेतली होती परंतु कंत्राटदाराची एकूण परिस्थिती व कामे पुर्ण करुन घेण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी त्यात फेरनिर्णय घेवून खंड ३ (क) ऐवजी खंड १५ (२) खाली कामे काढून घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. कलम १५ (२) खाली कामे काढून घेण्याचा निर्णय घेतल्याने कामाचा वाव कमी होवून कंत्राटदाराने केलेल्या बकामाचा देयक त्यांना मिळते व वाढीव खर्च त्यांच्याकडून वसुल पात्र ठरत नाही.कंत्राटदाराने फेरविनंती आणि स्थायी समितीचा फेर ठराव विचारात घेता मोरेश्वर बिल्डर्स ऍण्ड डेवहलपर्स योंच्याकडील जी कामे खंड ३ (क) नुसार काढून घेण्यात आली त्याऐवजी त्यांच्यावर कलम १५ (२) खाली कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी. त्यामूळे मोरेश्वर बिल्डर्स एण्ड डेव्हलपर्स कंत्राटदारास प्रशासनाने जो रु.२३,००,०००/- दंड आकारला आहें माफ करण्यात यावा.मंजुर करण्यात आलेल्या निविदादरामध्ये अंशतः कमी केलेल्या दराच्या फरकाची जी रक्कम रु.२०,००,०००/- कपात केली ती परत करण्यात यावी. तसेच त्यांनी रस्ता सुधारणाचे जे काम केले होते त्या कामाचे देयक रु.१,५२,००,०००/-सुध्दा देण्यात आलेले नाही. ते सुध्दा अदाई करण्यास मान्यता देण्यात यावी. त्यांची सुरक्षा अनामत रककमही रु.६३,००,०००/-देण्यात यावी असा माझा प्रस्ताव आहे. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा.

ज्यांना विरोध करावयाचा आहे त्यांचा विरोध नोंदवून प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**प्रमोद खेडकर** गुरु ता गध्दी कार्यक्रमा अंतर्गत रस्ता क्र.७ व ८ चे काम २००७ मध्ये या कत्राटदारास देण्यात आले होते या रस्त्याचे काम देण्यात आलेल्या कालावधीत पुर्ण करण्यासाठी वारंवार लेखी विनंती करण्यात आली परतु त्यानी काम तर पुर्ण केलेले नाही या रस्त्याचे काम अनेक दिवस प्रलंबित ठेवल्यामूळे तरोडेकर चौकापासून ते विमानतळ रस्त्यावर वाहतुक करण्यासाठी नागरीकांना खुप मोठा त्रास सहन करावा लागला. त्यामूळे संबंधित कंत्राटदाराचा निविदा रध्द करुन दुस-या कत्राटदारास काम देण्याची मागणी करण्यात आली होती. आयुक्तानी आपल्या अधिकारात निर्णय घेतलेला असल्यामूळै आयुक्तांनीच यावर निर्णय घ्यावा.

**दिपकसिंह रावत** निविदेतील अटी व शर्तीतील नियम काय आहे कायदा काय म्हणतो याचा खुलासा करण्यात यावा.

**संजय मोरे** कंत्राटदाराचे आर्थिक हिताचे निर्णय घेवून आम्हाला जेल मध्ये पाठविता काय .

**शेख हबीब बावजीर** सदर विषय हा पुर्वी एकवेळ महाराट्र शासनाने विखंडीत केलेला आहे. राज्य शासनाने विखंडीत केलेला विषय सभागृहासमोर चर्चेला जावू शकत नाही असे माझे मत आहे.तसेच हा विषय महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरोधात आहे.त्यामूळे या प्रस्तावास माझा विरोध आहे.

**फारुख अली खा** या कत्राटदाराने रस्ता क्र.७ व ८ चे जे काही काम केलेले आहे ते अंत्यंत बोगस व चुकीच्या पध्दतीने केलेले आहे. रस्त्याचे बाजूने ज्या नालीचे बांधकाम करण्यात आलेले आहे ते रस्त्याच्या उंचीच्या वर बांधण्यात आलेल्या आहेत या नालीतून पाणी अजिबात वाहत नाही. पुर्ण चुकीचे बांधकाम केलेले आहे.स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यास आमचा विरोध आहे.

**आयुक्त** शासनाने स्थायी समितीचा ठराव विखंडीत केला असून हायकोर्टानेही संबंधित कंत्राटदाराची याचीका फेटाळलेली आहे. त्यामूळे सभागृहाने घेतलेला ठराव व मनपा अधिनियमातील तरतूदीप्रमाणे पुढील कार्यवाही करावी लागेल.

**उमेशसिंह चव्हाण** कंत्राटदाराचा विनंती अर्ज, स्थायी समितीचा ठराव शासनाने न्यायालयाने फेटाळलेला असून यावर निर्णय झालेला आहे आता त्यावर आपणास निर्णय धेता येत नाही.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** संबंधित कंत्राटदाराच्या विनंती अर्जावर सहानुभूती पूर्वक विचार करावा अशी विनंती शासनास करण्यात यावी. सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थती खराब असल्यामूळे संबंधित कंत्राटदारास जी देयके द्यावयाची आहेत ती देयके जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत शिल्लक निधीतून देण्यात यावी.

**आयुक्त** मनपा कायदे सल्लागराचे मार्गदर्शन घेवून कंत्राटदाराची सुरक्षा अनामत रक्कम रु.६३,००,०००/-परत करण्यासाठीचा विचार करता येईल.

**उमेश पवळे** याच कंत्राटदाराने सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत नांदेड जिल्हयातील रस्त्याची कामे घेतलेली होती त्या विभागाने देखील सुरवातीस खंड ३ (क) खालीच कामे काढून घेतली होती परंतु कंत्राटदाराची एकूण परिस्थिती व कामे पुर्ण करुन घेण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी त्यात फेरनिर्णय घेवून खंड ३ (क) ऐवजी खंड १५ (२) खाली कामे काढून घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. कलम १५ (२) खाली कामे काढून घेण्याचा निर्णय घेतल्याने कामाचा वाव कमी होवून कंत्राटदाराने केलेल्या बकामाचा देयक त्यांना मिळते व वाढीव खर्च त्यांच्याकडून वसुल पात्र ठरत नाही.कंत्राटदाराने फेरविनंती आणि स्थायी समितीचा फेर ठराव विचारात घेता मोरेश्वर बिल्डर्स ऍण्ड डेवहलपर्स योंच्याकडील जी कामे खंड ३ (क) नुसार काढून घेण्यात आली त्याऐवजी त्यांच्यावर कलम १५ (२) खाली कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी. त्यामूळे मोरेश्वर बिल्डर्स एण्ड डेव्हलपर्स कंत्राटदारास प्रशासनाने जो रु.२३,००,०००/- दंड आकारला आहें माफ करण्यात यावा. मंजुर करण्यात आलेल्या निविदादरामध्ये अंशतः कमी केलेल्या दराच्या फरकाची जी रक्कम रु.२०,००,०००/- कपात केली ती परत करण्यात यावी. तसेच त्यांनी रस्ता सुधारणाचे जे काम केले होते त्या कामाचे देयक रु.१,५२,००,०००/-सुध्दा देण्यात आलेले नाही. ते सुध्दा अदाई करण्यास मान्यता देण्यात यावी. त्यांची सुरक्षा अनामत रककमही रु.६३,००,०००/-देण्यात यावी असा माझा प्रस्ताव आहे. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा.

ज्यांना विरोध करावयाचा आहे त्यांचा विरोध नोंदवून प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**उमेशसिंह चव्हाण** या प्रस्तावास आमचा विरोध आहे.

**महापौर** श्री उमेश पवळे यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह श्री अशोक उमरेकर यांचा प्रस्तावावर सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यावेळेसची परिस्थीती लक्षात घेवून प्रस्ताव बहुमताने मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.व तसेच आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.२१५** **ठ रा व**

जेएनएनयूआरएम योजने अंतर्गत रोड क्र.७ व ८ या रस्त्याची सुधारणा करण्याचे आदेश मोरेश्वर बिल्डर्स ,एण्ड डेव्हलपर्स या कत्राटदारास दि.१९.७.२००७ रोजी देण्यत आले होते. रोड क्र.७ आणि ८ याठिकाणी रस्ता सुधारण्याच्या अगोदर जलनिस्सारणाची कामे करण्यासाठी ज्या कंत्राटदारास आदेशित करण्यात आले होते त्यांनी विहित मुदतीत कामे पुर्ण केले नाही तसेच रस्त्याच्या रुंदीकरणासठी लागणा-या रस्त्याचे भुसंपादनाची कार्यवाही विहित कालावधीत पुर्ण केली नाहीत, तसेच रुंदीकरणात येणारे विद्युत वितरणाचे पोलही हटविण्यात आले नाही. नियोजित रस्त्यावरील अतिक्रमणही काढण्यात आलेले नाही या सर्व बाबीमूळे मोरेश्वर बिलडर्स एण्ड डेवहलपर्स यांना विहित मुदतीत रस्त्या सुधारण्याची कामे पुर्ण करता आलेली नाहीत, हि वस्तुस्थिती आहे अशी सर्व परिस्थिती असतांनाही विहित मुदतीत कंत्राटदाराने काम पुर्ण केले नाही म्हणून प्रशासनाने एकतर्फी

निर्णय घेवून मोरेश्वर बिल्डर्स एण्ड डेव्हलपर्स या कंत्राटदारास रु.२३,००,०००/- दंड आकारला मंजुर करण्यात आलेल्या निविदा दरामध्ये अंशतः कमी केलेल्या दराच्या फरकाची रक्कम रु.२०,००,०००/- कपात केली तसेच त्यांनी रस्ता सुधारणाचे जे काम केले होते त्या कामाचे देयाक रु.१,५२,००,०००/-सुध्दा देण्यात आलेले नाही.

रस्त्याची कामे विहीत मुदतीत पुर्ण करण्याकरीता कोणत्या अडचणी येत आहेत याबाबत कंत्राटदाराने प्रशासनास वारंवार स्पष्टीकरणासहीत खुलासा सादर करुन वस्तूस्थितीची जाणीव करुन दिली होती. उपरोक्त रस्त्यांच्या कामांच्या विलंबास मोरेश्वर बिलर्डर्स ऍण्ड डेव्हलपर्स हे कसुरदार नसतांनाही त्यांचे आर्थिक नुकसान झाले याच कंत्राटदाराने सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत नांदेड जिल्हयातील रस्त्याची कामे घेतलेली होती त्या विभागाने देखील सुरवातीस खंड ३ (क) खालीच कामे काढून घेतली होती परंतु कंत्राटदाराची एकूण परिस्थिती व कामे पुर्ण करुन घेण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी त्यात फेरनिर्णय घेवून खंड ३ (क) ऐवजी खंड १५ (२) खाली कामे काढून घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. कलम १५ (२) खाली कामे काढून घेण्याचा निर्णय घेतल्याने कामाचा वाव कमी होवून कंत्राटदाराने केलेल्या कामाचा देयक त्यांना मिळते व वाढीव खर्च त्यांच्याकडून वसुल पात्र ठरत नाही.कंत्राटदाराने फेरविनंती आणि स्थायी समितीचा फेर ठराव विचारात घेता मोरेश्वर बिल्डर्स ऍण्ड डेवहलपर्स यांच्याकडील जी कामे खंड ३ (क) नुसार काढून घेण्यात आली होती, त्याऐवजी त्यांच्यावर कलम १५ (२) खाली कार्यवाही करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा बहुमताने मान्यता देते. त्यामूळे मोरेश्वर बिल्डर्स एण्ड डेव्हलपर्स या कंत्राटदारास प्रशासनाने जो रु.२३,००,०००/- दंड आकारला आहें तो माफ करण्यात येतो. मंजुर करण्यात आलेल्या निविदादरामध्ये अंशतः कमी केलेल्या दराच्या फरकाची जी रक्कम रु.२०,००,०००/- कपात केली ती परत करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच त्यांनी रस्ता सुधारणाचे जे काम केले होते त्या कामाचे देयक रु.१,५२,००,०००/-अदाई करण्यास मान्यता देण्यात येते त्यांची सुरक्षा अनामत रककमही रु.६३,००,०००/-परत देण्यास मान्यता देण्यात येते. असे एकूण रुपये .२,५६,००,०००/- या रक्कमेस मोरेश्वर बिल्डर्स एण्ड डेव्हलपर्स यांना अदाई करण्याकरीता प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा बहुमताने देते, व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.३६** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यालयातील नगररचना विभाग नांदेड शहराच्या मनपा हध्दीतील नागरीकांना बांधकाम करण्यासाठी रितसर परवानगी देण्यासाठी बांधकाम धारकांकडून नांदेड शहराचा विकास करण्याच्या नावे विकास शुल्क आकारण्यात येते हा नगररचना विभागाकडून जमा केलेला विकास शुल्काची रक्कम नियमानुसार नांदेड शहराच्याच विकास कामासाठी खर्च करणे अनिवार्य आहे पण नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रशासन तसे न करता हा खर्च मनपाकेच्या इतर कामासाठी खर्च करते. त्यामूळे नांदेड शहराचा विकास कामासाठी निधी उपलबध्द होत नसल्यामूळे शहराचा विकास होत नाही.

करीता मनपा नगररचना विभागाकडून जमा केलेली व होणारी विकास शुल्काची रक्कम मनपाकेच्या बॅकेत नविन स्वतंत्र खाते उघडून त्यामध्ये जमा करण्यात यावी व ही विकास शुलकाची रक्कम केवळ नांदेड शहर विकास कामाच्याच कामासाठी खर्च करण्यासाठीचा प्रस्ताव सर्वसधारण सभेसमोर मान्यतेस्तव

**सुचक** :- आनंद शंकरराच चव्हाण **अनूमोदकः**:- संजय मोरे

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

नांवामनपाकेत जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजना व नागरी गरीबासाठी घरकुल व सुखसुविधा पुरविण्यासाठी केंद्र शासन व महाराष्ट शासनाकडून निधी प्राप्त झालेला असून मनपाचा सहभाग भरण्यासाठी पीएमडिओ कडून रुपये १२० कोटीचे कर्ज मनपाने घेतलेले असून सदरील कर्ज परतफेड नियमित भरण्यासाठी मनपा कर्ज निवारण निधी स्थापन केला असून यामध्ये पारगमन शुल्क ,विकास शुल्क पथकर ,गुंठेवारी विकासा अंतर्गत प्राप्त होणारे शुल्क जमा करुन कर्ज परत फेड करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.११८ दि.१६.८.२०१० रोजी संमत केलाअसून त्या अनुषंगाने आज पर्यत नियमित कर्जाची परत फेड करण्यात येत आहे.

परंतु उपरोक्त कर्ज निवारण निधी मधून जमा होणा-या रक्कमापैकी पारगमन शुल्क वसुली शासनाकडून बंद करण्यात आली आहे तसेच गुंठेवारी शुल्काची रक्कम अत्यल्प स्वरुपात जमा होत आहे. करीता उपरोक्त प्रस्तावाप्रमाणे विकास शुल्काची जमा होणारी रक्कम स्व्तंत्र खाते उघडून विकास कामावर खर्च करणे उचित होणार नाही.

**महापौर** प्रस्तावाच्या अनुषगाने देण्यात आलेल्या प्रशासकीय अभिप्रायानपूसार स.सदस्यांचा प्रस्ताव ना मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र.२१६** **ठ रा व**

मनपा नगररचना विभागाकडून जमा केलेली व होणारी विकास शुल्काची रक्कम मनपाकेच्या बॅकेत नविन स्वतंत्र खाते उघडून त्यामध्ये जमा करण्याचा प्रस्ताव ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते ना मंजुर करते.

**विषय क्र.३७** **प्रस्ताव**

मनपा प्रभाग क्र. १५ मधील शिवाजीनगर भागातील शुक्रवार आठवाडी बाजार गोकुळनगर रस्ता,रस्ता क्र.२६ व स्टेडियम परिसर येथे भरत असल्यामूळे वाहतुकीची समस्या निर्माण होत आहे.

त्याकरीता इंदीरा गांधी मैदानामध्ये मुरुम टाकून रोलींग करुन सिलकोट टाकून दिवाबत्तीची व्यवस्था करुन संपुर्ण शुक्रवार आठवडी बाजार इंदिरा गांधी मैदान येथे भरविण्याची व्यवस्था करणे करीता हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक :-** कमलाबाई रामस्वामी मुदिराज **अनुमोदक :-** संजय मोरे

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्र.२१७** **ठ रा व**

मनपा प्रभाग क्र. १५ मधील शिवाजीनगर भागातील शुक्रवार आठवाडी बाजार गोकुळनगर रस्ता,रस्ता क्र.२६ व स्टेडियम परिसर येथे भरत असल्यामूळे वाहतुकीची समस्या निर्माण होत आहे.

त्याकरीता इंदीरा गांधी मैदानामध्ये मुरुम टाकून रोलींग करुन सिलकोट टाकून दिवाबत्तीची व्यवस्था करुन संपुर्ण शुक्रवार आठवडी बाजार इंदिरा गांधी मैदान येथे भरविण्यासाठी ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानमते मान्यता देते . आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी .

**विषय क्र.३८** **प्रस्ताव**

मनपा प्रभाग क्र. ३९ सिडको, येथील मनपाकेच्या मोकळया जागेत (एनडी -३१ गार्डन) गार्डनचे सुशोभिकरण करुन त्याठिकाणी लहान मुलांसाठी खेळण्याचे साधने तसेच अद्यावत व्यायामाची उपकरणे बसविण्यासाठी तसेच अभ्यास केंद्राचा विकास करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**सुचक** :- प्रा.डॉ.ललिता शिंदे (बोकारे), **अनुमोदक** :- डॉ.करुणा जमदाडे

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र.२१८** **ठ रा व**

मनपा प्रभाग क्र. ३९ सिडको, येथील मनपाकेच्या मोकळया जागेत (एनडी -३१ गार्डन) गार्डनचे सुशोभिकरण करुन त्याठिकाणी लहान मुलांसाठी खेळण्याचे साधने तसेच अद्यावत व्यायामाची उपकरणे बसविण्यासाठी तसेच अभ्यास केंद्राचा विकास करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते .

**पुरवणी विषय पत्रिका**

**विषय क्र.१**

पोलिस निरीक्षक, अन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांनी तक्रारदार श्री मोहमद इरशादोदीन खाजा मशीयोदीन, खाजगी गुत्तेदार, रा.रहेमत नगर, देगलुर नाका, नांदेड यांच्या तक्रारीवरुन तक्रारदार यांनी गुलजार बाग, नांदेड येथे केलेल्या सिमेंट कॉन्क्रीट रोडच्या बांधकामाचे 10 लाख (अक्षरी रुपये दहा लक्ष) रुपयांचे सादर केलेले बिल मंजूर करुन देण्यासाठी शहर अभियंता श्री माधव शंकरराव बाशेट्टी यांना विनंती केली असता सदर कामासाठी त्यांनी तक्रारदार यांचेकडे 25 हजार (अक्षरी रुपये पंचवीस हजार) रुपयांच्या लाचेची मागणी केली तेंव्हा तक्रारदार यांनी काम होणार नाही म्हणून नाईलाजाने होकार दिला व अन्टी करप्शन ब्युरो, नांदेड कार्यालयात हजर होवून तक्रार दिल्यावरुन श्री माधव शंकरराव बाशेट्टी, शहर अभियंता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांचेविरुध्द दिनांक. 01.10.2014 रोजी सापळा रचुन सदरच्या सापळा कार्यवाहीमध्ये श्री माधव शंकरराव बाशेट्टी, शहर अभियंता यांनी 25 हजार (अक्षरी रुपये पंचवीस हजार) रुपये लाचेची मागणी करुन स्वत: स्विकारल्यानंतर रंगेहाथ पकडून त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला व संबंधितांविरुध्द करण्याचे तपासकामी दि.02.10.2014 रोजी 6.20 वाजता त्यांना अटक केली असुन त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 13(1)(ड) सह 13(2) अन्वये दलेल्या सरकारतर्फे फिर्यादीवरुन पोलिस ठाणे वजिराबाद येथे दिनांक.02.10.2014 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला व 6.20 वाजता संबंधितास अटक केले असल्याचे श्री एस.जे.माने, पोलिस निरीक्षक, अन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांनी फॅक्स संदेश क्रं.सापळा केस/असीबी/नांदेड/3508 दिनांक.02.10.2014 पत्र या कार्यालयास सादर केले आहे.

त्यांनतर दिनांक.02.10.2014 रोजी मा.विशेष न्यायालय, नांदेड यांचेसमक्ष हजर करुन 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी मिळणेस विनंती केली असता मा.न्यायालयाने दि.16.10.2014 पर्यंत संबंधितास न्यायालयीन कोठडी मंजूर करुन नंतर जामीनावर मुक्त केले आहे.

पोलिस निरीक्षक, अन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांचे पत्र क्रं.3585/2014 दिनांक.08.10.2014 व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं.अभियो-1312/प्र.क्रं.30/पुर्नबांधीत-1/11-अ, मंत्रालय, मुंबई दिनांक.12.02.2013 या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 56 (1)(ब) मधील तरतुदीनुसार श्री माधव शंकरराव बाशेट्टी, शहर अभियंता यांना कार्यालयीन आदेश क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/13640/14 दि.28.10.2014 च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

मा.अपर महासंचालक, अन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्रं.अकब्यु/ मुख्यालय/सीआर/957/नांदेड/ 2014/824 दि.17.01.2015 अन्वये सदर प्रकरणात पोलिस स्टेशन वजिराबाद, नांदेड येथे दाखल गुन्हा र.नं.54/2014 कलम 7, 13 (1)(ड) सह 13(2) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा या गुन्ह्यात आरोपी लोकसेवक श्री माधव शंकरराव बाशेट्टी, शहर अभियंता (निलंबित) यांचेविरुध्द मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्याकरीता मंजूरी प्राप्त करणेसाठी मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे विनंती केली आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी श्री माधव शंकरराव बाशेट्टी, शहर अभियंता (निलंबित) यांचेविरुध्द अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्याबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं.अभियो-1312/प्र.क्रं.30/ पुर्नबांधीत-1/11-अ, मंत्रालय, मुंबई दिनांक.12.02.2013 चे शासन निर्णयानुसार मार्गदर्शक सुचना आहेत त्यामधील 1(ब) नुसार ईतर कोणत्याही व्यक्तिच्या बाबतीत त्याला त्याच्या पदावरुन काढून टाकण्याबाबत सक्षम असलेल्या प्राधिकरणाची

पुर्वमंजूरी असल्याशिवाय, न्यायालय अपराधाराची दखल घेणार नाही, अशी तरतुद आहे व सदर पत्रान्वये श्री बाशेट्टी हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत शहर अभियंता या पदावर कार्यरत असल्याने त्यांचेविरुध्द अभियोग दाखल करण्याच्या परवानगीबाबतची कार्यवाही करुन अहवाल शासनास सादर करण्याचे कळविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(1) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहीत आहेत. त्यानुसार श्री माधव शंकरराव बाशेट्टी यांना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने अधिनियमातील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 45(1) अन्वये शासन मान्यतेच्या अधिन राहून शहर अभियंता या पदावर पदोन्नती देण्यात आली होती त्यानंतर शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 45(4) नुसार त्यांच्या पदोन्नतीस महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्रं.नांमपा-0811/प्र.क्रं.307/पुर्नबांधणी-5/नवि-24 दि.06.09.2012 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 50(3) नुसार सदर अधिनियमाचे कलम 45 अन्वये नेमलेले सर्व अधिका-यांने गैरवर्तन केल्यास किंवा आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास हयगय केल्यास किंवा ती पार पाडण्यास तो अक्षम ठरल्यास, त्याला एकूण पालिका सदस्यांपैकी कमीतकमी निम्म्या सदस्यांच्या मतानी कोणत्याही वेळी काढून टाकता येईल, अशी तरतुद आहे.

त्यानुसार श्री माधव शंकरराव बाशेट्टी, शहर अभियंता (निलंबित) हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 45 अन्वये नियुक्त अधिकारी असुन त्यांना सदर पदावर नियुक्त करण्याचे व कामावरुन काढून टाकण्याचे अधिकार महानगरपालिका सर्वसाधारण सभेस असल्याने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं.अभियो-1312/प्र.क्रं.30/पुर्नबांधीत-1/11-अ, मंत्रालय, मुंबई दिनांक. 12.02.2013च्या शासन निर्णयातील तरतुदींच्या अनुषंगाने पोलिस स्टेशन वजिराबाद, नांदेड येथे दाखल गुन्हा र.नं.54/2014 कलम 7, 13 (1)(ड) सह 13(2) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये दाखल झालेल्या गुन्ह्यात श्री माधव शंकरराव बाशेट्टी, शहर अभियंता (निलंबित) यांचेविरुध्द मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्यासाठी महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**दिपकसिंह रावत** — श्री माधव बाशेटटी यांना निलंबित करण्यात आल्यानंतर त्यांचे निलंबन आदेशास कायम करण्याच्या प्रस्तावास या सभागृहाने एकमताने फेटाळला होता असे असतांनाही हा प्रस्ताव सभागृहासमोर कसा काय आणला हा या सभागृहाचा अवमान आहे. गुलजार बाग, नांदेड येथील सिमेंट कॉन्क्रीट रोडचे काम मे. ए.व्ही. पंदे कंपनीस देण्यात आले होते तक्रारदार श्री मोहमद इरशादोदीन खाजा मशीयोदीन, खाजगी गुत्तेदार, रा.रहेमत नगर, देगलुर नाका, नांदेड यांना देण्यात आलेले नाही व हे काम त्यांना सबलेट पण केलेले नव्हते असे असतांना त्यांची तक्रार कशी काय ग्राहय धरता येईल म्हणून या प्रकरणात तत्कालिन आयुक्तांनी श्री बाशेट्टी यांची चौकशी करण्यासाठी उपसमिती कायम केली होती या उपसमितीने श्री बाशेट्टी यांचे वर लादण्यात आलेले आरोप हे बिनबिडाचे असून ते बेकसुर असल्याचा अहवाल दिलेला आहे. असे असतांना असा प्रस्ताव सभागृहात मांडणे हे कितपत योग्य आहे. सभागृहास विनंती आहे की, श्री माधव शंकरराव बाशेट्टी, शहर अभियंता (निलंबित) यांचेविरुध्द मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव एकमताने फेटाळावा.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** — यापुर्वी सर्वसाधारण सभेने श्री बाशेटटी यांना निलंबित करण्याचा प्रस्ताव एकमताने फेटाळला असून त्यांना पुर्ववत सेवेत रुजू करुन घेण्यात यावे अशा प्रकारचा निर्णय सर्वसाधारण सभेने घेतलेला असतांनाही त्या ठरावाची अद्याप अमलबजावणी करण्यात आलेली नाही.

**आयुक्त** — निलंबन करुन सहा महिण्याचा कालावधी पुर्ण झालेला नव्हता.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** — विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे की, तत्कालिन आयुक्तांनी याप्रकरणात चौकशी करण्यासाठी उपसमिती नेमली होती त्यानुसार उपसमिती श्री बाशेटटी हे निर्दोष असल्याचा अहवाल दिलेला असून श्री बाशेटटी यांचेवर अन्याय करण्यात येवू नये. प्रशासनाचा प्रस्ताव फेटाळण्यात यावा.

**प्रमोद खेडकर** — सभेने निलंबन आदेश कायम करण्याचा प्रस्ताव फेटाळलेला असतांना व उपसमितीने श्री बाशेटटी हे निर्दोष असल्याचा अहवाल दिलेला असतांना त्याचे विरुध्द कार्यवाही करण्याचा प्रस्ताव देणे म्हणजे हा सर्वसाधारण सभेचा अवमान आहे. प्रस्ताव फेटाळण्यात यावा.

**स.शेर अली.** — या प्रस्तावावर आयुक्तांनीच नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सरजितसिंघ गिल** — यापुर्वी निलंबनाचा आदेश कायम करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात आला होता त्यावेळी या सभागृहाने निलंबन आदेश कायम करण्याचा प्रस्ताव फेटाळलेला असतांना पुन्हा प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात आला हा सर्वसाधारण सभेचे अवमान आहे.सभागृहाने त्यांना पुर्ववत मनपा सेवेत रुजू करुन घेण्यास मान्यता दिली परंतु अद्याप सेवेत रुजू करुन घेण्यात आलेले नाही. सभागृहाने घेंतलेल्या निर्णयाप्रमाणे त्यांना तात्काळ मनपा सेवेत रुजू करुन घेण्यात यावे. प्रशासनाचा प्रस्ताव एकमताने फेटाळण्यात यावा.

**आयुक्त** सभागहाचा अवमान झाला असेल तर मी प्रशासनाचे वतीने माफी मागतो. कायदेशिर बाबी तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल. यापुढे सर्व कायदेशिर बाबीची तपासूनच प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर ठेवण्यात येइल

**सरजितसिंघ गिल.** आयुक्तांनी झालेल्या चुकीबध्दल मनाचा मोठेपणा दाखवून माफी मागीतली त्याबध्दल सभागृह त्यांचे ऋणी आहे.महानगरपालिकेत अभियंत्याची कमतरता असल्यामूळे आयुक्तांनी श्री बाशेटटी यांना तात्काळ मनपा सेवेत रुजू करुन घेण्यासाठी आदेश काढावेत.

**महापौर** स. सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावा आयुक्तांचा प्रस्ताव फेटाळण्यात येतो. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२१९** **ठ रा व**

आयुक्त नावाशमनपा नांदेड यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर विचार करण्यात आला. बिएसयुपी योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात गुलजार बाग (फेज नं. 7) येथील 273 घरकुलांचे व त्या अंतर्गत रस्ता, नाली इत्यादी कामाचे कार्यारंभ आदेश क्रं 400/2009 दि.24.08.2009 व्दारे मे. ए.व्हि. पंदे कंत्राटदार, सोलापुर यांना देण्यात आले आहे. निविदेतील कलम 26 नुसार सदरील काम सबलेट करावयाची महानगरपालिकेकडुन परवानगी देण्यात आलेली नाही. देयक अदाई संबधीत मे. ए.व्ही. पंदे कंत्राटदार यांचेकडुन कोणतीही लेखी तक्रार झालेली नाही.

श्री माधव शंकर बाशेट्टी हे शहर अभियंता या संविधानिक पदावरील अधिकारी असुन त्यांच्या नियुक्तीस महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.नामपा-0811/प्र.क.307/पुनर्बाधणी-5/नवि-24, दिनांक 6 संप्टेबर 2012 व्दारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 45 (4) नुसार शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. यानुसार त्यांची नियुक्ती प्राधिकरण सर्वसाधरण सभा असल्यामुळे या प्रकरणात त्यांना निलंबीत केल्यानंतर आधिनियमातिल कलम 56 नुसार त्यांचे निलंबन कायम करण्यासाठी प्रशासना तर्फे प्रस्ताव सादर झाला होता, परंतु मो.इरशादोदिन खाजा मशियोदीन गुत्तेदार यांचा याकामाशी कुठलाही संबध नसल्यामुळे त्यांनी जाणुन-बुजुण श्री माधव शंकर बाशेट्टी शहर अभियंता यांना बदनाम करण्याच्या उद्देशाने हेतुपुरस्पर त्यांचे विरुध्द खोटी तक्रार केल्याचे सकृत दर्शनी दिसुन आल्यामुळे प्रशासनाचा निलंबन कायम करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेने दि. 24.11.2014 रोजी ठराव क्र. 119 व्दारे नाकारला आहे.

प्रस्तुत प्रकरणात गुलजार बाग भागातील कामा बाबत तपासणी करुन अहवाल सादर करण्या बाबत पोलिस अधिक्षक अन्टी करप्शन ब्युरो, नांदेड परीक्षेत्र यांनी त्यांचे पत्र अ.शा.पत्र क्रं.पो.अ/ऐ.सी.बी./ 50/14 दि.12.12.2014 रोजी महापालिकेस कळविले होते. यानुसार या प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने कार्यालयीन आदेश क्रं.16044, दि.04.12.2014 व्दारे तांत्रिक अधिका-यांची समिती गठित करुन सदर भागाची तपासणी करण्यात आली या तांत्रिक समितीमध्ये वरीष्ट अभियंता अपिल सल्लागार, उपअभियंता बिएसयुपी, कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, मुख्य लेखाधिकारी, मनपा, नांदेड यांचा समावेश करण्यात आला होता.

तांत्रिक समितीने या प्रकरणी सखोल चौकशी करुन तपासणी अहवाल सादर केला. या तपासणी अहवालात समितीने खालील प्रमाणे निष्कर्ष दिला आहे.

1. संबधित तक्रारदार हा सदर कामाचा अधिकृत कंत्राटदार नाही तसेच संबंधिताने दि.13/11/2014 रोजी च्या अर्जामध्ये मुळ कंत्राटदार मे.पंदे इन्फ्राकॉम यांचे कडुन सबलेट करुन काम करीत असल्याचे नमुद केलेले दिसुन येते, परंतु सबलेट करण्यासाठी B-1 निविदा कलम 26 अन्वये कार्यकारी अभियंता यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतु अशी परवानगी बिएसयुपी विभागाकडुन देण्यात आली नसल्याचे कार्यकारी अभियंता बिएसयुपी विभाग यांनी कळविले आहे.
2. तक्रारदाराच्या तक्रारीमध्ये चौकशीअंती व तपासणीअंती तथ्य दिसुन येत नाही व विभागाने प्रस्तावित केलेले देयक योग्य आहे.

तांत्रिक समितीने सादर केलेला सविस्तर स्वरुपाचा तपासणी अहवाल आयुक्त मनपा यांचे कडुन अ.शा.क्र./ नावाशमनपा/ बिएसयुपी/18354/15 दि.05.01.2015 रोजी तपासणी अहवालाच्या प्रतीसह तक्रारीत तथ्य आढळुन आले नसल्याचे पोलिस अधिक्षक, अन्टी करप्शन ब्युरो, नांदेड परिक्षेत्र, नांदेड. यांना कळविण्यात आलेले आहे.

भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अंतर्गत अभियोग दाखल करण्यास मंजुरी देण्या बाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं.अभियो-1312/प्र.क्र.30/पुर्नबांधित-1/11अ दि.12 फेब्रुवारी 2013 मध्ये अभियोग दाखल करण्यास मंजुरी देणे वा नाकारणे हा आधिकार सक्षम प्राधिकरणास असल्याचे नमुद आहे.

वरिल सर्वबाब विचारात घेता या शासन निर्णयातील तरतुदी नुसार श्री माधव शंकर बाशेट्टी शहर अभियंता, यांच्या विरुध्द पोलिस स्टेशन, वजिराबाद, नांदेड येथे दाखल गुन्हा र.न.54/2014 कलम 7, 13 (1) (ड) सह 13 (2) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये दाखल झालेल्या गुन्हयात त्यांचे विरुध्द मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्याची अनुमती नाकारण्यात येते. तसेच संबंधीतास निलंबीत केल्याच्या दिनांका पासुन कामावर रुजु करण्याच्या दिनांका पर्यंतचा कालावधी कर्तव्यकाळ ग्रहित धरण्यात येते. असे हि सभा सर्वानुमते संमत करते. हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.2**

` नांदेड वाधाळा शहर महानगरपालिका हदीमध्ये नव्याने होणा-या बांधकाम परवानगी मनपा च्या नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगीमध्ये परवाना देतांना आरोग्याच्या दृष्टीने ना हरकत प्रमाणपत्र द्यावयाचे आहे.

सदरील ना हरकत प्रमाणपत्र हे स्वच्छता निरिक्षक यांच्याकडून झालेल्या बांधकामाची तपासणी करुन वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने द्यावयाचे आहे. सदरील प्रमाणपत्र बांधकाम तपासणी करुन देण्यासाठी रु.1000/- शुल्क आकारावयाचे आहे. करीता सदर आरोग्य विभागाचा ना हरकत प्रमाणपत्रासाठी रु.1000/-फीस आकारणीचा प्रस्ताव मान्यतेस्तव .

**महापौर** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२२०** **ठ रा व**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हदीमध्ये नव्याने होणा-या बांधकाम परवानगी मनपा च्या नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगीमध्ये परवाना देतांना आरोग्याच्या दृष्टीने ना हरकत प्रमाणपत्र द्यावयाचे आहे.

सदरील ना हरकत प्रमाणपत्र हे स्वच्छता निरिक्षक यांच्याकडून झालेल्या बांधकामाची तपासणी करुन वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने द्यावयाचे आहे.सदरील प्रमाणपत्र बांधकाम तपासणी करुन देण्यासाठी रु.1000/- शुल्क आकारावयाचे आहे. करीता सदर आरोग्य विभागाचे ना हरकत प्रमाणपत्रासाठी रु.1000/-फीस आकारणीचे प्रस्तावास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.3**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडचा समावेश Smart City मध्ये होण्यासाठी शहराच संपुर्ण माहिती सर्व्हे ,प्रेक्षेन्टेंशन सादर करणे,सल्लागार नेमणे व डिपीआर तयार करणेकरीता विविध क्षेत्रातील कांही तज्ञ व्यक्तींची आवश्यकता आहे. त्यातून City Transformation Resource Team ची स्थापना करता येईल.

याकरीता कांही अनुभवी तज्ञ व सल्लागार यांची नियुक्ती करण्याचे सर्वाधिकार आयुक्तांना प्रदान करण्यासाठी प्रस्ताव सादर. व सदरचा ठराव याच सभेत कायम करण्यासाठी शिफारस करण्यात येते.

**विरेंद्रसिंध गाडीवाले** अनुभवी तज्ञ व सल्लागाराची फिस देण्यासाठी लागणा-या खर्चाची प्रशासकीय व आर्थिक मान्यता सर्वसाधारण सभा /स्थायी समितीकडून घेण्यात यावी.

**विनय पाटील** याकरीता लागणा-या खर्चास संबंधित प्राधिकरणाची मान्यता धेण्यात यावी.

**आयुक्त** या कामाकरीता १) Planning Consultation Research Assiciate ,२) Multi Media Research Associate ३) Cultural & Public Relaeation Associate अशा तीन पदाची आवश्यकता असून त्यांना अनुक्रमे ३०,०००/- २०,०००/-२५,००,०००/-याप्रमाणे मानधन देण्यासाठी लागणा-या खर्चास मान्य्ता देण्यात यावी.

**महापौर** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२२१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडचा समावेश Smart City मध्ये होण्यासाठी शहराच संपुर्ण माहिती सर्व्हे ,प्रेक्षेन्टेंशन सादर करणे,सल्लागार नेमणे व डिपीआर तयार करणेकरीता विविध क्षेत्रातील कांही तज्ञ व्यक्तींची आवश्यकता आहे.त्यातून City Transformation Resource Team ची स्थापना करता येईल.

करीता उपरोक्त कामाकरीता खालील प्रमाणे अनुभवी तज्ञ व सल्लागार यांची नियुक्ती करण्याचे सर्वाधिकार आयुक्त नांवामनपा नांदेड यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते, व सल्लागारांचे मानधन देण्याकरीता व अनुषंगीक कामाकरीता लागणा-या खर्चासही प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| अ.क्र. | पदनाम | पद सख्या | कामाचे स्वरुप | शैक्षणिक पात्रता | मानधन प्रतिमहा |
|---|---|---|---|---|---|
| १ | Planning Consultation Research Assiciate | ०१ | प्रकल्पाचे रंखांकन करणे, प्रकल्पाचे सादरीकरण व इतर विभागाशी समन्वय साधणे | एम.टेक, आर्कीटेक्टचर | ३०,०००/- |
| २ | Multi Media Research Associate | ०१ | महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजाचे व प्रकल्पाच्या आढाव्याचे चित्रीकरण, सादरीकरण व प्रसिध्दी करणे | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची कोण्त्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता<br>ब) पत्रकारीता व जनपसंज्ञापन (Journalism & Mass Communication) | २०,०००/- |
| ३ | Cultural & Public Relaeation Associate | ०१ | महानगरपालिकेचे वेबसाईट लोकाभिमूख्य(डायनॅमिक) होण्याच्या व जास्त व्यापक होण्याचे दृष्टीने सांस्कृतिक(cultural Them Concept ) तयार करणेव प्रसारीत करणे तसेच महानगरपालिकेचा दैनंदिन कार्यक्रम प्रसिध्द करणे ,प्रकल्पाशी निगडीत दैनंदिन व इतर आवश्यक ती कामे | पदवीधर/पदव्युत्तर(post graduate) आणि संगणक विषयक ज्ञान असणे आवश्यक | २५,०००/- |

**विषय क्र.४**

सन 2011-2012 स्थानिक निधी लेखा परिक्षा औरंगाबाद तर्फे करण्यात आलेल्या लेखा परिक्षण अहवालास मान्यता देणे बाबत.

**दिपकसिंह रावत** स्थानिक निधी लेखा परिक्षा औरंगाबादने महानगरपालिकेचे सन 2011-2012 या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण केलेले असून स्थानिक निधी लेखा परिक्षा विभागाने लेख्यात अनेक उणिवा काढून अधिकारी कर्मचा-यांवर गंभिर स्वरुपाचे आक्षेप घेतलेले आहे. आयुक्तानी या पुर्ण आक्षेपाची चौकशी संबंधिताकडून काढलेल्या त्रुटीची पुर्तता करुनच हा अहवाल सभागृहासमोर ठेवावा.या अहवालास मान्यता देण्यास शिवसेना भाजप युतीचा विरोध आहे. भरती प्रक्रियेतही उणिवा दाखविलेल्या आहेत, या अहवालास मान्यता दिल्यास स.सदस्यांवर गुन्हे दाखल होतील.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** सन 2011-2012 स्थानिक निधी लेखा परिक्षा औरंगाबाद तर्फे करण्यात आलेल्या लेखा परिक्षण अहवालास मान्यता देण्याचा प्रस्ताव अनेक महिण्यापासून प्रलंबित असून स्थानिक निधी लेखा परिक्षाने जे आक्षेप घेतलेले त्या आक्षेपाची पुर्तता संबंधित विभागाने करावयाची असल्यामूळे आयुक्त नियमानुसार वैधानिक कार्यवाही करतील.

**नगरसचिव** शासन निर्णयानूसार स्थानिक निधी लेखा परिक्षा औरंगाबादने महानगरपालिकेचे सन २०११-२०१२ चे लेखा परिक्षण केलेले असून या लेखा परिक्षण अहवालास मान्यता देण्यासाठीचा प्रस्ताव ५-६ महिण्यापुर्वी देण्यात आलेला असून निवडणूक आचारसंहिता असल्यामूळे सभा घेण्यात आली नाही. या अहवालास मान्यता न दिल्यामूळे शासनस्तरावर वारंवार विचारणा होत आहे. लेखा परिक्षण अहवालावर पुढील वैधानिक कार्यवाही आयुक्तांनीच करावयाची आहे.

**सरजितसिंघ गिल** सभागृह नेते श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. लेखा परिक्षण अहवालावर नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**महापौर** लेखा परिक्षण अहवालास मान्यता देण्यात येते . या लेखा परिक्षण अहवालावर आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.२२२** **ठ रा व**

स्थानिक निधी लेखा परिक्षा औरंगाबादने नांदेड वाघाळा शहर महागनरालिकेचे सन 2011-2012 लेखा परिक्षण केलेले असून या लेखा परिक्षण अहवालाच्या प्रती सर्व स.सदस्यांना देण्यात आलेल्या आहेत. करीता नांदेड वाघाळा शहर महागनरालिकेचे सन 2011-2012 लेखा परिक्षण अहवालास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. आयुक्तांनी नियामानुसार या लेखा परिक्षण अहवालावर पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.५**

सन 2013-2014 या आर्थिक वर्षात एलबीटी पासुन मिळणारे उत्पन्न व 2014-2015 चालू वर्षात मिळत असलेले उत्पनात खुप मोठया प्रमणात घट झाल्याचे दिसून येत असल्यामूळे एलबीटीच्या उत्पन्नात होत असलेल्या घटीची चौकशी करण्याकरीता मुख्य लेखापरिक्षक याचे अध्यक्षतेखाली अंतर्गत लेखापरिक्षक श्री विलास भोसीकर,स.आयुक्त एलबीटी श्री गुलाम सादेक यांची उपसमिती कायम करण्यास नांवामनपा विशेष सभेने ठराव क्र.७० दि.१४.८.२०१४ अन्वये मान्यता दिली होती,त्यानुसार सदरील उपसमितीने सादर केलेल्या चौकशी अहवालावर निर्णय घेणे बाबत

**विरेंद्रसिंध गाडीवाले** चौकशी अहवालाची प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी तो पर्यत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** सभागृह नेत्यांनी मांडलेल्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे. चौकशी अहवालाची प्रत देण्यात यावी.

**महापौर** नगरसचिवानी सर्व स. सदस्याना चौकशी अहवालाची प्रत द्यावी तो पर्यत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र.२२३** **ठ रा व**

सन 2013-2014 या आर्थिक वर्षात एलबीटी पासुन मिळणारे उत्पन्न व 2014-2015 चालू वर्षात मिळत असलेले उत्पनात खुप मोठया प्रमणात घट झाल्याचे दिसून येत असल्यामूळे एलबीटीच्या उत्पन्नात होत असलेल्या घटीची चौकशी करण्याकरीता मुख्य लेखापरिक्षक याचे अध्यक्षतेखाली कायम करण्यात आलेल्या चौकशी समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत सर्व स. सदस्यांना देण्यात यावी. त्यानंतर या चौकशी अहवालावर सर्वसाधारण सभा निर्णय घेईल असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र.६**

जिल्हा क्रिडा अधिकारी , नांदेड यांनी सिडको नविन नांदेड येथील जून्या सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॉटची जागा जलतरण तलाव बांधण्यासाठी सदरील जागेचा संयुक्त करारनामा सिडको, तालुका क्रिडा संकुल समितीस करुन दिल्यास अद्यावत जलतरणकिेचे काम करण्यास सोईस्कर होइल असे पत्र दिले आहे.

सदरील जूना सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॉन्टची जागा सिडको प्रशासनाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेली असून महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

तरी सदरील जागेवर तालुका क्रिडा संकुल समिती यांनी जलतरणिका तयार केल्यानंतर वापर व देखभाल होण्याकरीता नावामनपाकेच्या ताब्यात द्यावी लागेल या अटीवर तालुका क्रिडा समिती व नावाशमनपा यांनी संयुक्त करारनामा करुन देवून तालूका क्रिडा समिती अद्यावत जलतरणिकेचे काम पुर्ण करण्याची परवानगी देणे योग्य राहील.व जलतरणिकेचे काम पुर्ण झाल्यावर तात्काळ महानगरपालिकेच्या ताब्यात सदर जलतरणिका वापरासाठी हस्तांतरण करण्यात येईल या अटीवर मान्यता देणे योग्य राहील.

प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभे समोर सादर.

**महापौर** आयुक्तांचा मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्र.२२४** **ठ रा व**

जिल्हा क्रिडा अधिकारी , नांदेड यांनी सिडको नविन नांदेड येथील जून्या सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॉटची जागा जलतरण तलाव बांधण्यासाठी सदरील जागेचा संयुक्त करारनामा सिडको, तालुका क्रिडा संकुल समितीस करुन दिल्यास अद्यावत जलतरणकिचे काम करण्यास सोईस्कर होइल असे पत्र दिले आहे.

सदरील जूना सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॉन्टची जागा सिडको प्रशासनाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेली असून महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

करीता जिल्हा क्रिडा अधिकारी , नांदेड यांनी कळविल्यानुसार तालुका क्रिडा संकुल समिती यांना महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या सिडको नविन नांदेड येथील जून्या सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॉटचे जागेत जलतरण तलाव बांधण्यासाठी तालुका क्रिडा समिती व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी संयुक्त करारनामा करुन देवून जलतरणिकेचे काम पुर्ण झाल्यावर तात्काळ त्याचा वापर व देखभाल करण्याकरीता महानगरपालिकेस हस्तांतरीण करण्यात येईल अटीवर तालुका क्रिडा समिती यांना सदर जागा हस्तांरतीत करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारणसभा सर्वानुमते मान्यता देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.७**

नावांमनपा हध्दीतील सर्वे नं.७० मौजे नांदेड न.भू.क्र.४७९६ च्या मंजुर अभिन्यासातील आरक्षित जागा शाळेसाठी १०६० चो.मी.व मुलांचे खेळाचे मैदानासाठी ३८२२ चो.मी.रेखाकंनातील मंजुर असलेली जागा अध्यक्ष,डॉ.बी.आर.आंबेडकर फाऊडेशन यांनी ई – लर्निग शाळेसाठी जागा देण्याची विनंती केली आहे.

सदर जागा देणे बाबत शिक्षणाधिकारी ,महानगरपालिका नांदेड व सं.संचालक नगररचना यांनी सुध्दा ई लर्निग शाळेसाठी सदरील जागा देण्याबाबत हरकत नसल्याचा अहवाल दिलेला आहे.

सदरील संस्था ही मुंबई विश्वस्थ अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ग) प्रमाणे पुढील कार्यवाही करुन प्रतिवर्षे भाडे व अनामत रक्कम स.सचांलक, नगररचना ठरवतील त्या प्रमाणे सदरील संस्थेस नियम व अटीवर मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर.

**बाळासाहेब देशमूख** डॉ.बी.आर.आंबेडकर फाऊडेशन संस्था ही सामाजिक व नोदणीकृत संस्था आहे. व मागच्या पाच वर्षापासुन गोरगरीब दलितांसाठी वृध्दाश्रम चालवते, ब्लड डोनेशनचा चांगला उपक्रम राबवित आहे. अशा सामाजिक संस्थेस शाळेकरीता जागा दिल्यास जागा संरक्षीत होवून त्यावर अतिक्रमण होणार नाही आणि महानगरपालिकेला उत्पन्नही प्राप्त होईल तसेच या भागातील दलिताच्या पाल्यांना चांगली शिक्षणाची सोय उपलब्द होईल त्यामूळे सभागृहास विनंती आहे की. प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास एकमताने मान्यता द्यावी.

**आयुक्त** याप्रकरणात कायदेशिर बाबीची तपासणी करुन नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येईल

**महापौर** जागा देण्याच्या संदर्भात योग्य तो अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त यांना देण्यात येतो. त्यांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.२२५** **ठ रा व**

नावांमनपा हध्दीतील सर्वे नं.७० मौजे नांदेड न.भू.क्र.४७९६ च्या मंजुर अभिन्यासातील आरक्षित जागा शाळेसाठी १०६० चो.मी.व मुलांचे खेळाचे मैदानासाठी ३८२२ चो.मी.रेखाकंनातील मंजुर असलेली जागा अध्यक्ष,डॉ.बी.आर.आंबेडकर फाऊडेशन यांनी प्रतिवर्ष भाडे व अनामत रक्कम,व नियम व अटीवर स.सचांलक, नगररचना हे निश्चित करतील त्या प्रमाणे ई –लर्निग शाळेसाठी जागा देण्याची विनंती केली आहे.

सदर जागा देणे बाबत शिक्षणाधिकारी ,महानगरपालिका नांदेड व सं.संचालक नगररचना यांनी सुध्दा ई लर्निग शाळेसाठी सदरील जागा देण्याबाबत हरकत नसल्याचा अहवाल दिलेला आहे.

सदरील संस्था ही मुंबई विश्वस्थ अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था आहे.

करीता अध्यक्ष,डॉ.बी.आर.आंबेडकर फाऊडेशन यांनी नावांमनपा हध्दीतील सर्वे नं.७० मौजे नांदेड न.भू.क्र.४७९६ च्या मंजुर अभिन्यासातील आरक्षित जागा शाळेसाठी १०६० चो.मी.व मुलांचे खेळाचे मैदानासाठी ३८२२ चो.मी.रेखाकंनातील मंजुर असलेली जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ग) प्रमाणे व प्रतिवर्ष भाडे , अनामत रक्कम, नियम व अटीवर स.सचांलक, नगररचना हे निश्चित करतील त्या प्रमाणे भाडेपटीवर देण्यासाठी केलेल्या विनंतीनुसार जागा भाडेपटीवर देण्याबाबत योग्य तो निर्णय

घेण्याचे पुर्ण अधिकार आयुक्त, नांवामनपा नांदेड यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**<u>स. सदस्याचे प्रस्ताव</u>**

**विषय क्र.८** **प्रस्ताव**

नांदेड शहरात संचखंड गुरुव्दारा येथे देश विदेशातील अनेक धार्मीक बांधव दर्शनासाठी दररोज येतात यात्रेकरुना नांदेड येथे राहण्यासाठी गुरुव्दारातर्फे मोफत यात्री निवास (धर्मशाळा) येथे राहण्याची व्यवस्था करण्यात येते.यात्रेकरु कडून कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. म्हणून यात्री निवास व गुरुव्दारा लंगर साहिब इमारतीला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १२९ २१ आणि १३२ मधील तरतूदीनूसार चर्चा करुन प्रतिवर्षी नाममात्र रु.१००/-या प्रमाणे मालमत्ता कर आकारण्यासाठी चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी ही सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक :-** स.सरजितसिंघ गिल, **अनुमोदक:-** स.विरेंद्रसिंघ गाडीवाले, आनंद चव्हाण, विनय पाटील, स. शेर अली

**<u>प्रशासकीय अभिप्राय</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३२(२) ब नुसार ज्या इमारती पासुन भाडे मिळते अशा इमारती व जमिनी किंवा त्याचे भाग मग अशा भाडयाचे उपयोजन धार्मीक किंवा धर्मदाय प्रयोजनसाठी करण्यात येत असो वा नसो त्या इमारती पुजा अर्चासाठी किंवा सार्वजनिक धर्मदायाच्या प्रयोजनसाठी भोगवटयात आहेत व वापरण्यात येत आहेत असे मानले जाणार नाही अशी तरतूद आहे.

तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने जवाहर नेहरु नागरी पुनरुस्थान योजनेच्या रिफार्मस मध्ये केंद्र सरकार सोबत केलेल्या करारानुसार मालमत्ता करात देण्यात येणा-या सवलती बंद करण्याचे मान्य करुन नव्याने कोणत्याही सवलती न देणे बाबत मान्यता दिलेली आहे. त्यामूळे प्रस्तूत प्रस्ताव मंजुर करणे संयुक्तीक होणार नाही.

**सरजितसिघ गिल** — संचखंड गुरुव्दारा येथे देश विदेशातील अनेक लाखो धार्मीक बांधव दर्शनासाठी दररोज येतात यात्रेकरुना गुरुव्दारातर्फे मोफत यात्री निवास (धर्मशाळा) येथे राहण्याची व्यवस्था व मोफत जेवणाची व्यवस्था करण्यात येते.व या यात्रेकरु कडून कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही,धार्मीक कार्यक्रमासाठी इमारतीचा वापर होत असल्यामूळे नाममात्र १००/- मालमत्ता कर आकारण्यात यावे या प्रस्तावास सभागृहाने एकमताने मान्यता द्यावी अशी विनंती करण्यात येते.

**दिपकसिंह रावत** — नांदेड येथील प्रसिध्द गुरुव्दारामूळे नांदेड शहरात विकासाची कामे करण्यासाठी केंद्र शासनाने रु.२००० कोटीचे अनुदान दिलेले आहे.गुरुव्दारा लंगर साहिब मार्फत पुर्ण शहरातील रस्त्याचे बाजूने मोठया प्रमाणात वृक्षारोपन केलेले असून महानगरपालिकेने त्यांना काहीच मदत केलेली नाही. श्री गील यांनी मांडलेल्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**प्रमोद खेडकर** — श्री गील यांचे प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** — यापुर्वी महासभेने धार्मीक इमारतींना नाममात्र दराने मालमत्ता कर आकारण्याचे ठराव पास केलेले आहेत परंतू त्याची अमलबजावणी करण्यात आलेली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२९ मध्ये विशेष प्रकल्पाच्या इमारतीने मालमत्ता करात सुट देण्याची तरतूद आहे. गुरु ता गध्दी हा विशेष प्रकल्प असल्यामूळे मालमत्ता करात सुट देता येते.त्यामूळे या प्रस्तावास मान्यता देण्यात येवून या ठरावाची तात्काळ अमलबजावणी करण्यात यावी.

**उमेश चव्हाण** — शहरातील इतरही धार्मीक इमारतीचा वापर कोणत्याही प्रकारचे शुल्क आकार न घेता लोककल्याणासाठी होत असेल अशा धार्मीक इमारतीना नाममात्र मालमत्ता कराची आकारणी करण्यात यावी.जसे बुध्दविहार

**आयुक्त** — सभागृहाने धार्मीक इमारतीचा वापर लोककल्याणासाठी होत असेलतर अशा इमारतींना कलम १२९ ए नुसार नाममात्र मालमत्ता कर आकरण्याचा घेतलेल्या निर्णयाचा आदर करण्यात येईल.

**महापौर** — स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२२६** **ठ रा व**

नांदेड शहरात संचखंड गुरुव्दारा येथे देश विदेशातील अनेक धार्मीक बांधव दर्शनासाठी दररोज येतात यात्रेकरुना नांदेड येथे राहण्यासाठी गुरुव्दारातर्फे मोफत यात्री निवास (धर्मशाळा) येथे राहण्याची व्यवस्था करण्यात येते.यात्रेकरु कडून कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. म्हणून यात्री निवास व गुरुव्दारा लंगर साहिब इमारतीला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १२९ २१ आणि १३२ मधील तरतूदीनूसार प्रतिवर्षी नाममात्र रु.१००/-या प्रमाणे मालमत्ता कर आकारण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.शहरातील इतरही धार्मीक ट्रस्टच्यर इमारतीचा वापर लोकल्याणासाठी होत असेल तर अशाही इमारतींना वरील तरतूदीनूसार नाममात्र मालमत्ता कर आकरण्यासही मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.९** **प्रस्ताव**

जयभिमनगर येथील खालील नांवे दर्शविलेले नागरीक जयभिमनगर येथील रहिवाशी आहेत.त्यांचे नावाने तेथे घर नव्हते,आणि ते ज्या मोकळयाजागेवर वास्तव्य करीत होते ती त्यांच्या ताब्यातील जागा बिएसयुपी योजने अंतर्गत घर बांधण्यासाठी आवश्यक लागेल

तेवढी नसल्याने बिएसयुपी अंतर्गत योजनेचा लाभ मिळाला नाही. शिवाय आता ते बेघर झालेले असल्याकारणाने त्यांना साईट नं.३४ येथील गाळे देवून त्याचे पुर्नवसन करावे असा ठराव नांवाशमनपा संमत करीत आहे.

| अ.क्र. | नांवे | अ.क्र. | नांवे |
|---|---|---|---|
| १. | मधुकर दिनाजी गोटमुखे | २. | राधाबाई हुलाजी सोनसाळे |
| ३. | मनोहर दत्ताजी महागडे | ४. | श्रीवंता विजय कदम |
| ५. | मगल सोपानराव थोरात | ६. | उषा शेकोजी ढवळे |
| ७. | सुनंदा गंगाधर तरटे | ८. | देवानंद पुंडलीक गजभारे |
| ९ | रेश्मा उत्तम हटकर | १०. | महेद्र माधवराव थोरात |
| ११. | चंद्रमुनी काशिनाथराव कांबळे | १२ | वर्षा माधव चित्ते |
| १३ | उमेश रमेश शिंदे | १४ | सिध्दार्थ सोनाजी सोनकांबळे |
| १५ | अरुण भगवान कांबळे | | |

३४ साईट येथील गाळे नांवे वाटप करुन त्याचे पुर्नवसन करावे असा ठराव करणे बाबत मान्यता

**सुचक :-** बाळासाहेब गंगाधरराव देशमुख **अनुमोदक:-** अंजली सुरेशराव गायकवाड

**अशोक उमरेकर** नांदेड शहरात जे दुर्बल घटकातील व मागासवर्गीय लोक ३०-४० वर्षापासून राहतात व त्यांना घरे नाहीत त्यांनाही बिएसयुपी योजने अंतर्गत घरे देण्यात यावी.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२२७** **ठ रा व**

जयभिमनगर येथील खालील नांवे दर्शविलेले नागरीक जयभिमनगर येथील रहिवाशी आहेत.त्यांचे नावाने तेथे घर नव्हते,आणि ते ज्या मोकळयाजागेवर वास्तव्य करीत होते ती त्यांच्या ताब्यातील जागा बिएसयुपी योजने अंतर्गत घर बांधण्यासाठी आवश्यक लागेल तेवढी नसल्याने बिएसयुपी अंतर्गत योजनेचा लाभ मिळाला नाही. शिवाय आता ते बेघर झालेले असल्या कारणाने खालील नागरीकांना साईट नं.३४ येथील गाळे देवून त्याचे पुर्नवसन करावे असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो..

| अ.क्र. | नांवे | अ.क्र. | नांवे |
|---|---|---|---|
| १. | मधुकर दिनाजी गोटमुखे | २. | राधाबाई हुलाजी सोनसाळे |
| ३. | मनोहर दत्ताजी महागडे | ४. | श्रीवंता विजय कदम |
| ५. | मगल सोपानराव थोरात | ६. | उषा शेकोजी ढवळे |
| ७. | सुनंदा गंगाधर तरटे | ८. | देवानंद पुंडलीक गजभारे |
| ९ | रेश्मा उत्तम हटकर | १०. | महेद्र माधवराव थोरात |
| ११. | चंद्रमुनी काशिनाथराव कांबळे | १२ | वर्षा माधव चित्ते |
| १३ | उमेश रमेश शिंदे | १४ | सिध्दार्थ सोनाजी सोनकांबळे |
| १५ | अरुण भगवान कांबळे | | |

**विषय क्र.१०** **प्रस्ताव**

मनपा हध्दीतील बिएसयुपी योजने अंतर्गत रिकामे असलेल्या घरकुलामध्ये मायनॉरिटी मीडिया असोसिएशन ,नांदेड या नोंदणीकृत अल्पसंख्याक उर्दू पत्रकाराची संघटनेचे पत्रकारांना ज्याचे नावावर घर नाही, त्यांचे निवासासाठी घरकुल मंजुर करुन देण्याबाबत ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचकः-** चाऊस हसिना बेगम साबेर चाऊस **अनुमोदकः-** इशरत फातेमा अ.शमीम

**दिपकसिंह रावत** नांदेड शहरात जेवढया पत्रकार संघटना आहेत त्यांना बोलावून त्यांचेशी विचार विनिमय करुन त्यांच्यासंघटनेच्या सदस्यांनाही घरकुले देण्यात यावी.

**अशोक उमरेकर** या दुरुस्ती प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** दुरुस्तीसह स. सदस्यांचा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.२२८** **ठ रा व**

मनपा हध्दीतील बिएसयुपी योजने अंतर्गत रिकामे असलेल्या घरकुलामध्ये मायनॉरिटी मीडिया असोसिएशन ,नांदेड या नोंदणीकृत अल्पसंख्याक उर्दू पत्रकाराची संघटनेचे पत्रकारांना ज्याचे नावावर घर नाही, त्यांचे निवासासाठी घरकुल मंजुर करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते तसेच शहरातील इतरही पत्रकार संघटनाना निमंत्रीत करुन त्याचेशी विचार विनिमय करुन ज्या पत्रकाराच्या नावावर धर नाही त्यांनाही बिएसयुपी योजने अंतर्गत घरे मंजुर करावी असेहीही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो नियमानुसारआयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.११** **प्रस्ताव**

नांवाशमनाकेतील कर्मचा-यांच्या संबंधी व विविध विषयावर सालसन २०१३.२०१४ व २०१४.२०१५ या मागील दोन वर्षामध्ये कोणकोणत्या विषयावर व कोण कोणत्या अधिका-यावर लक्ष वेधी सुचना /तारांकित प्रश्न (LAQ) लागली आहे त्यासंदर्भात आज पर्यतची विस्तारीत माहिती सभागृहात लेखी स्वरुपात देवून चर्चा करण्यात यावी.

**सुचकः-** रावत दिपकसिंह काशिनाथसिंग **अनुमोदकः-** विश्वास बालाजीराव कदम

**दिपकसिंह रावत** प्रस्तावाच्या अनुषंगाने माहिती देण्यात यावी.

**उपआयुक्त साप्रवि** प्रस्तावाच्या अनुषगाने सर्व विभाग पमुखांना पत्र देवून माहिती मागितली होती परंतु बहुतांशी विभागाने अद्याप माहिती दिलेली नाही.

**महापौर** स.सदस्यांच्या प्रस्तावा प्रमाणे सर्व माहिती संकलित करुन ती स.सदस्यांना देण्यात यावी.

**ठराव क्र.२२९** **ठ रा व**

नांवाशमनाकेतील कर्मचा-यांच्या संबंधी व विविध विषयावर सालसन २०१३.२०१४ व २०१४.२०१५ या मागील दोन वर्षामध्ये कोणकोणत्या विषयावर व कोण कोणत्या अधिका-यावर लक्ष वेधी सुचना /तारांकित प्रश्न (LAQ) लागली आहे त्यासंदर्भात आज पर्यतची विस्तारीत माहिती सर्व स.सदस्यांना देण्यात यावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सवानुमते संमत करते.

**विषय क्र.१२** **प्रस्ताव**

नांदेड शहरात खेळाचे वातावरण निर्मिती करण्यासाठी व आत्मसंरक्षणासाठी कराटे सारख्या मार्शल आर्ट चे क्लासेस शहरात सुरु आहेत.या खेळाच्या स्पर्धा औरंगाबाद मध्ये महापौर चषक नावाने होत असतात अशाच प्रकारच्या राष्ट्रीय पातळीच्या स्पर्धा नांदेड मध्ये आयोजित करण्यात याव्यात. सदरील स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मागील दोन वर्षापासुन सतत नांदेड शहरातल्या मुलींना मोफत प्रशिक्षण देणारी संस्था इंडियन ईटरनॅशनल शावलीन टेम्पल वजिराबाद,नांदेड यांनी तयारी दर्शविली असून महाराष्ट्र, आंध्रप्रदेश ,पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, तेलंगना, ओरीसा, कर्नाटक, तामिलनाडू, दिल्ली ई.१२ राज्य सहभागी होणार आहेत, व यास्पर्धेसाठी एकूण २४,००,०००/- (अक्षरी चौविस लक्ष ) खर्च अपेक्षित आहेत व ही स्पर्धा ऑगस्ट २०१५ या महिण्यात आयोजन केल्यास या स्पर्धेचे नियोजन व्यवस्थित प्रकारे लागेल,यास्पर्धेमूळे नांदेड शहराचे नांव राष्टीय पातळीवर खेळाच्या दृष्टीने लौकीक होईल. म्हणून सदरील ठराव एक मताने मंजुर करण्यास मान्यतेस्तव सादर.

**सुचकः-** सौ.श्रध्दा सुशिलकुमार चव्हाण **अनुमोदकः-** संदिप चिखलीकर

**प्रशासकीय टिप्पणी**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(२१),(२२),(२५), (२६) व (४१) अन्वये सास्कतिक कार्यक्रम /क्रिडा/महिला व बाल कल्याण संस्थाना देण्यात येणा-या अनुदानाची नियमावली तयार केली आहे.

सदर िनियमावलीस महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.नावांशमपा/१३००/१२३०/प्र.क्र.३०/०५/नवि-२४ दि.१० डिसेंबर २००७ अन्वये मान्यता प्रदान केलेली असून नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.जीईएन १०९१/३२/प्र.क्र.१/९२/नवि-२४ दि.१८ फेब्रूवारी १९९२ मध्ये विहित केलेल्या तरतूदीच्या अधिन राहुन वनियमावलीच्या आधारे विहित मर्यादत अनुदान मंजुर करण्याची खबरदारी नांवामनपाकेने घ्यावी असे निर्देष दिलेले आहेत. उपरोक्त शासन परिपत्रक दि.१८ फेब्रूवारी १९९२ व महानगरपालिकेने तयार केलेल्या नियमावलीतील अटी व तरतदीनूसार कोणत्याही पंजीकृत अथवा नोंदणी कृत शैक्षणिक,सांस्कृतिक ,सामाजिक,साहित्य ,कला क्रिडा नाटय क्षेत्रातील विविध संस्थांना ३ वर्षातून एक वेळेस आर्थिक वर्षात देय असलेले अंशदान रु.३.०० लक्षापेक्षा जास्त होता कामानये असे स्पष्ट नमूद आहे तसेच सदरील अंशदान मिळणे हा कोणाचाही हक्क राहणार नाही तो महानगरपालिकेच्या उपलब्ण्ध्द निधी वर अवलंबून राहील अशी तरतूद नियमावलीत आहे.करीता इंडियन नॅशनल शावलीन टेम्पल वजिराबाद नांदेड यांना प्रस्तावात नमूद स्पर्धेसाठी वरील शासन परिपत्रक व नियमावलीतील तरतूदीनूसार अनुदान देता येणार नाही.

**श्रध्दा चव्हाण** नांदेड शहरात खेळाचे वातावरण निर्माण व्हावे महिला/ मुली आत्मसंरक्षण करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यादृष्टीकोनातून हा प्रस्ताव मी ठेवलेला असून या स्पर्धेत देशातील १२ राज्यानी सहमती दर्शविलेली आहे.महापौर चषकाकरीता आपण अंदाजपत्रकात तरतूद करतो परंतु महापौर चषकाचे आयोजन करण्यात येत नाही.महापौरांना विनंती आहे की. महापौर मार्शल आर्ट चषकाचे आयोजन करण्यासाठी लागणारा अंदाजे खर्च रु.२४.०० लक्षाची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात यावी.

**सरजितसिंघ गिल** तत्कालिन नांदेड नगरपालिका अस्तित्वात असतांना नांदेड नगरपालिका व गुरुव्दारा बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य स्तरीतय हॉकी गोल्डकप स्पर्धाचे आयोजन करण्यात येत होते ,महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर ही स्पर्धा बंद करण्यात आलेली आहे तरी राज्यस्तररीत हॉकी गोल्डकपचे आयोजन करण्यासाठी रु.२५ लक्षाची अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** श्री गील यांनी जो प्रस्ताव मांडलात्यास माझे अनुमोदन आहे.

**गाफार खान** प्रथम महापौर श्री सुधाकर पांढरे यांनी महापौर चषक म्हणून केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते या स्पर्धेचे उदघाटनासाठी जागतीक स्तरावरील पहेलवार श्री खली उपस्थित होते. कुस्तीच्या स्पर्धाचे ही आयोजन करण्यात यावे.

**महापौर** प्रशासकीय अभिप्रायानुसार मार्शल आर्ट कराटे स्पर्धा आयोजनाचा प्रस्ताव ना मंजुर करण्यात येतो.श्री सरजितसिंघ गिल यांनी सुचविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे राज्यस्तरीय हॉकी गोल्डकप स्पर्धेचे आयोजन करणेसाठी चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात रु.२५.०० लक्षाची तरतूद करण्यात येईल.

**ठराव क्र.२३०** **ठ रा व**

कराटे सारख्या मार्शल आर्ट महापौर चषक स्पर्धाचे आयोजनाचा प्रस्ताव हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते ना मंजुर करते.

**विषय क्र.१३** **प्रस्ताव**

मनपा हध्दीमध्ये खाजगी संस्था, धार्मीक व सामाजिक संस्थांनी अथवा व्यक्तीनी विविध कारणासाठी मनपा मालकीचे भुखंड घेतले होते ते भुखंड ज्या कारणासासाठी धेतलेले आहे त्या कारणासाठी त्याचा वापर होत नसल्याचे दिसुन येत आहे. त्यमूळे सदरचे भुखंड तात्काळ मनपाने हस्तगत करावे.

तसेच ज्यामनपा भुखंडा बाबत मा.न्यायालयात वाद चालू असतील अथवा त्या भुखंडाचा निर्णय महानगरपालिकेच्या बाजुने निर्णय लागला असेल तर असे भुखंड महानगपालिकेत तात्काळ समाविष्ट करणे आणि सदर भुखंडा बाबत एखाद्या व्यक्ती, धार्मीक किंवा सामाजिक संस्थाना देण्यासाठी परस्परवाटाघाटी करुन निर्णय घेवू नये अथवा असे निर्णय झाले असतील तर ते तात्काळ सभेसमोर सादर करणे सदर भुखंडाची माहिती महासभेसमोर आणून त्यानंरत महासभेची मान्यता घेवून त्या बाबतचा निर्णय घेण्याकरीता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचकः-** सय्यद शेर अली महेबुब अली **अनुमोदकः-** अ.हबीब अ .रहिम बागवान

**स.शेर अली** तत्कालिन नांदेड नगरपालिकेने आपल्या मालकीच्या १५- १५, २०- २० एकर जागा शहरातील अनेक अनेक शैक्षणिक संस्थानां शैक्षणिक उपक्रमासाठी दिर्घ मुदतीच्या नाममात्र लिजवर दिलेल्या आहेत परंतु असे निदर्शनास आले आहे की संबंधित शैक्षणिक संस्था या ज्या प्रयोजनासाठी जागा दिलेल्या आहेत त्या प्रयोजनासाठी वापर न करता परस्पर, निवासस्थाने/दुकाने बांधणेकरीता, वापर करीत आहेत तर काही शैक्षणिक संस्थानी जागा खाली ठेवलेल्या आहेत त्यामूळे आयुक्तांनी महाराष्ट्र महानगपालिका अधिनियम १९४९ मधील ८१ ब नुसार अशा जागा ताब्यात घ्याव्यात असा माझा प्रस्ताव आहे.जागा हस्तांरतीत करण्याच्या सदंर्भात परस्पर सर्वसाधारण सभेच्या मान्यतेशिवाय वाटाघाटी करण्यात येवू नये.असा माझा प्रस्ताव आहे.

**दिपकसिंह रावत** श्री शेर अली यांनी महानगरपालिकेस जमिनी हस्तांरीत करण्याचा जो प्रस्ताव मांडला त्याबध्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. विद्यानगर हौ.सोसायटीची जागा सुध्दा शैक्षणिक उपक्रमासाठी लिजवर देण्यात आली होती आज त्या जागेचा वापर निवासस्थाना करीता करण्यात येत आहे.याप्रकरणात वाटाघाटी करण्यात येत असल्याची चर्चा आहे. लिजवर देण्यात आलेल्या जागेचा कमर्शियल म्हणून करण्यात येत असेल तर उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेने अशा जागा परत घ्याव्यात व त्या जागेचा विकास करावा.

**उमेशसिंह चव्हाण** ज्या जागा संस्थांना लिजवर दिलेल्या आहेत त्याजागेत पाणी पुरवठा ,मलनिस्सारण लाईन टाकण्यासाठी, नालीच्या बांधकामासाठी सुध्दा संस्था चालक जागा देत नाही. संबंधितानी महानगरपालिकेच्या जागा परस्पर विकल्या असतील तर त्याचे विरुध्द गुन्हे नोंदविण्यात यावे.

**महापौर** श्री स.शेर अली याचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. महानगरपालिकेने आपल्या मालकीच्या कोटयावधी रुपयाच्या जागा शैक्षणिक, धार्मीक, सामाजिक उपक्रमासाठी अनेक विश्वस्थ संस्थाना, व्यक्तींना दिर्धमुदतीच्या लिजवर नाममात्र दराने दिलेल्या आहेत परंतु असे निदर्शनास आलेले या संस्थानी ,व्यक्तीनी ज्या उपक्रमासाठी जागा घेतल्या त्या उपक्रमासाठी त्याचा वापर न करता त्याची परस्पर गृहनिर्माण संस्थेला निवासस्थानाकरीता व व्यापारी संकुलाचे बांधकाम करण्याकरीता विक्री करीत आहे. काही विश्वस्थ संस्थांनी जागेचा काहीही वापर न करता खाली (oprn) ठेवलेल्या आहे. करीता आयुक्तांनी विविध विश्वस्थ संस्था/व्यक्तीना दिर्घमुदतीवर नाममात्र दराने लिजवर दिलेल्या मनपा जागेचा सर्व्हे करुन ज्या विश्वस्थ संस्था/ व्यक्ती दिलेल्या उपक्रमाकरीता जागेचा वापर करीत नाही किंवा जागा खाली (oprn) ठेवन त्या जागेचा काहीही वापर करीत नाही अशा जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ८१ ब नुसार कार्यवाही करुन ताब्यात घेंवून महानरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याठी त्या जागा विकसित कराव्यात .व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२३१** **ठ रा व**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने आपल्या मालकीच्या कोटयावधी रुपयाच्या जागा शैक्षणिक, धार्मीक, व सामाजिक उपक्रमासाठी अनेक विश्वस्थ संस्थाना, व्यक्तींना दिर्धमुदतीच्या लिजवर नाममात्र दराने दिलेल्या आहेत परंतु असे निदर्शनास आले आहे की, या विश्वस्थ संस्था,व्यक्ती ज्या उपक्रमासाठी जागा घेतल्या त्या उपक्रमासाठी त्याचा वापर न करता त्याची परस्पर गृहनिर्माण संस्थेला निवासस्थानाकरीता व व्यापारी संकुलाचे बांधकाम करण्याकरीता विक्री करीत आहे. किंवा स्वतः जागेवर व्यापारी संकुल बांधून

त्याचा वापर करीत आहे तर काही विश्वस्थ संस्थांनी जागेचा काहीही वापर न करता खाली (open) ठेवलेल्या आहे. करीता आयुक्तांनी विविध विश्वस्थ संस्था/व्यक्तीना दिर्घमुदतीवर नाममात्र दराने लिजवर दिलेल्या मनपा जागेचा सर्व्हे करुन ज्या विश्वस्थ संस्था/ व्यक्ती दिलेल्या उपक्रमाकरीता जागेचा वापर करीत नाही किंवा जागा खाली (open) ठेवून त्या जागेचा काहीही वापर करीत नाही अशा जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ८१ ब नुसार कार्यवाही करुन ताब्यात घ्याव्यात,आणि महानरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याठी सदरच्या जागा विकसित कराव्यात असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

तसेच ज्या नांवामनपा भुखंडा बाबत मा.न्यायालयात वाद चालू असतील अथवा त्या भुखंडाचा निर्णय महानगरपालिकेच्या बाजुने निर्णय लागला असेल तर असे भुखंडाचा ताबा आयुक्तांनी तात्काळ घ्यावा. एखाद्या भुखंडा बाबत न्यायालयात चालू असलेल्या प्रकारणात एखाद्या व्यक्ती, धार्मीक किंवा सामाजिक संस्थाना देण्यासाठी आयुक्तांनी परस्पर वाटाघाटी करुन निर्णय घेवू नये अथवा असे निर्णय झाले असतील तर ते तात्काळ नांवामनपा सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात यावे. सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात यावी असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठरव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१४** **प्रस्ताव**

नांवामनपा हदीत प्रभाग क्र.१२ मधील तानाजीनगर, गोपाळनगर. मित्रनगर, याभागात दलित समाजाची लोकसंख्या मोठया प्रमाणात असून हा भाग नविन वसलेला आहे येथील नागरीक मुलभूत सुविधापासुन वंचित आहे.

त्यामूळे सदरील भाग दलित वस्ती सुधारण्यासाठी असलेल्या निधीतून विकास करण्यास व दलित वस्ती म्हणून घोषित करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचकः**- सौ.जयश्री आनंद जाधव **अनुमोदकः**- सौ.संगिता पुथ्वीराज राओत्रे

**विनय गूर्रम** याच प्रभागातील नगरोत्थान योजने अंतर्गत निधी अभावी प्रलंबित मित्रनगरचा प्रमुख रस्ता, आवश्यक ड्रेनेज लाईन लगतच्या श्रीकृष्ण चौक या रस्त्याचे साईड वाईडींग व नालीचे बांधकाम तसेच गोवर्धनघाट भागात बिएसयुपी योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुल इमारतीपासून ते पोलिस परेड ग्रावंड संरक्षण भिंतीपर्यतच्या रस्त्याचे काम व अजिंठा बौध्द विहाराचे काम सन चौदा पंधरा या आर्थिक वर्षात दलित वस्ती सुधारण योजनेत मंजुर असलेल्या निधीतून करण्यास मान्यता देण्यात यावी.

**अनुजा तेहरा** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री विनय गुर्रम यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह स.सदस्यांचा पस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.२३२** **ठ रा व**

नांवामनपा हदीत प्रभाग क्र.१२ मधील तानाजीनगर, गोपाळनगर. मित्रनगर, याभागात दलित समाजाची लोकसंख्या मोठया प्रमाणात असून हा भाग नविन वसलेला आहे येथील नागरीक मुलभूत सुविधापासुन वंचित आहे.

त्यामूळे सदरील भाग दलित वस्ती सुधारण्यासाठी असलेल्या निधीतून विकास करण्यास व दलित वस्ती म्हणून घोषित करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. तसेच याच प्रभागातील नगरोत्थान योजने अंतर्गत निधी अभावी प्रलंबित असलेला मित्रनगरचा प्रमुख रस्ता,आवश्यक ड्रेनेज लाईन लगतच्या श्रीकृष्ण चौक या रस्त्याचे साईड वाईडींगचे, नालीचे बांधकाम व गोवर्धनघाट भागात बिएसयुपी योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलापासून ते पोलिस परेड ग्रावंड संरक्षण भिंतीपर्यतचे रस्त्याचे काम, अजिंठा बौध्द विहाराचे काम ही सर्व कामे सन चौदा पंधरा या आर्थिक वर्षात नागरी दलीत वस्ती सुधार योजनेतुण करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानूमते मान्यता देते.

**नगरसचिव** विषय क्र.१५,१६,१७ या विषयावर मुळ विषय पत्रिकेवरील विषय क्र.३१ एकत्रितरित्या अगोदरच निर्णय घेण्यात आला.

**विषय क्र.१८** **प्रस्ताव**

मनपा आस्थापनेवरील रिक्त पदावर नियमानुसार तात्काळ मनपाकेतील कर्मचा-यांना सेवाजेष्टतेनुसार पदोन्नती देवुन भरणे बाबात कार्यवाही करणे

**सुचकः**- विरेंद्रसिंघ गाडीवाले, प्रमोद खेडकर **अनुमोदकः**- चव्हाण आनंद शंकरराव, विनय पाटील

**विरेद्रसिंघ गाडीवाले** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील विविध विभागात चतुर्थश्रेणी व तृतिय श्रेणी व इतर संवर्गातील अनेक पदे रिक्त असल्यामूळे यापदाचा अतिरिक्त पदभार इतर अधिकारी व कर्मचा-याकडे सोपविण्यात आल्यामूळे कार्यालयीन कामकाजात दिरंगाई होत आहे.करीता महानगरपालिकेतील सर्व रिक्त असलेल्या विविध संवर्गातील पदावर महानगरपालिकेतील कर्मचा-याना सेवा जेष्ठतेनुसार व गुणवत्तेनुसार पदोन्नती देण्याची कार्यवाही तात्काळ आयुक्तांनी करावी

**उमेश चव्हाण** मनपा कर्मचा-यांना सेवा जेष्ठतेनूसार रिक्त पदावर पदोन्नती देण्यात यावी.

**महापौर** स.सदस्यांचा पस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्र.२३३** **ठ रा व**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील विविध विभागात चतुर्थश्रेणी व तृतिय श्रेणी व इतर संवर्गातील अनेक पदे रिक्त असल्यामूळे यापदाचा अतिरिक्त पदभार इतर अधिकारी व कर्मचा-याकडे सोपविण्यात आल्यामूळे कार्यालयीन कामकाजात दिरंगाई होत आहे. करीता महानगरपालिकेतील सर्व रिक्त असलेल्या विविध संवर्गातील पदावर महानगरपालिकेतील कर्मचा-याना सेवा जेष्ठतेनुसार व गुणवत्तेनुसार पदोन्नती देण्याची कार्यवाही तात्काळ आयुक्तांनी करावी असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभासर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१९** **प्रस्ताव**

मनपा मालमत्ता कर आकारणी व वसुली विभागातील श्री दत्तात्रय जनार्धन जाधव पाटील लिपीक हे सन १९८६-८७ पासुन कर आकारणी विभागात कार्यरत असुन सन २००५-०६ ची कर आकारणी व सन २०१३-१४ ची भांडवली मुल्याधारीत कर आकारणी करण्यात त्यांनी उत्कृष्ट नियोजन करुन कर आकारणी नियम तयार करुन भारांक निश्चीतीवदारे यशस्वीपणे लागु करण्यात सहभाग नोंदवली आहे ज्यामुळे मनपाकेने घेतलेल्या निर्णयानुसार भांडावली मुल्याधारीत पध्दतीने कर आकारणी लागु करणा-या मोजक्याच मनपा पैकी एक महानगरपालिका ठरली आहे व त्याकरिता राज्य शासनाने मनपाकेस उत्तेजनार्थ अनुदान रु. ३.५० कोटी +१२ कोटी २२ लाख असे एकूण रु. १६ कोटी ७२ लाख सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये प्रदान केले आहे सन २००५-०६ ची कर आकारणी व जाहिरात कर वसुलीचे उत्पन्नात भरीव वाढ झाल्यामुळे तत्कालीन आयुक्तांनी जाहिरात निरीखक पदावर त्यांना बढती देण्याकरिता प्रशासना मार्फत प्रस्ताव सादर केला होता तथापी ठराव क्रं. ३७ दि. २४ मे २००६ ठरावामध्ये इतर १७ कर्मचा-यांचे नावे समाविष्ट झाल्यामुळे या ठरावाची अमलबजावणी करण्यात आली नाही व तो शासनाकडेही मंजुरी करिता पाठविण्यात आला नाही मनपाकेत असे अनेकाना बढती देऊन काम करणारांना संधी दिली आहे.

संबंधीताने आतापर्यंत केलेले कार्याव्दारे मनपाकेस सन २००५-०६ मध्ये सामान्य करात रु. ३.६० कोटी व सन २०१३-१४ च्या कर आकारणीवदारे सामान्य करात रु. ७.२७ कोटी उत्पन्नात भर पडली

श्री दत्तात्रय जनार्धन पाटील यांनी मालमत्ता कर आकारणी बाबत व इतर कार्यालयीन प्रशिक्षण वेळोवेळी यशदा पुणे व ऑल इंडीया लोकल सेल्फ गर्व्हनमेंट घेऊन ऑल इंडीया लोकल सेल्फ गर्व्हनमेंट या संस्थेकडून एलएसजीडी पदविका प्राप्त केली आहे.

खालील प्रमाणे प्रशिक्षण संस्था व प्रशिक्षण कालावधीत प्राप्त केले आहे.

१) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे तर्फे Property Tax administration A major Source of Revenue for Local Bodies दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर २००६

२) यशदा पुणे तर्फे Review on JNNURM Reforms दिनांक १६ ते १८ जुन २००९

३) यशदा पुणे तर्फे क्षमतावृध्दी प्रशिक्षण दि. २९ जुन ते ३ जुलै २००९

४) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे तर्फे भांडवली मुल्याधारीत पध्दतीने कर आकारणी व वसुली सुधारीत पध्दती प्रशिक्षण कार्यक्रम दि. ३० ते ३१ ऑक्टोबर २०१०

५) यशदा पुणे तर्फे ट्रेनिंग ऑन मल्टील्पाय युवर स्कील्स विथ एक्सेल दि. १२ ते १४ जुलै २०११

६) यशदा पुणे तर्फे भांडवली मुल्याधारीत मालमत्ता कर आकारणी दि. २६ ते २८ नोव्हेंबर २०१२

७) यशदा पुणे तर्फे Advance Automation using word and Excel दि. १ ते ४ जुलै २०१३

सांस्कृतीक कार्य विभाग महाराष्ट्र शासन आयोजीत लोकोत्सव २००४ नांदेड उत्कृष्ट आयोजनात सहकार्याबदल प्रमाणपत्र देऊन गौरवीले आहे तसेच गुरु ता गद्दी त्रिशताब्दी सोहळा २००८ कॅम्प व्यवस्थापनात योगदाना बदल प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. संबंधीताची काम करण्याची सचोटी प्रमाणीकपणा व त्याव्दारे मनपाकेस प्राप्त झालेला महसुल यामध्ये त्याचा महत्वपुर्ण सहभाग सहीला आहे तसेच त्यांच्या वरील प्रशिक्षणामुळे व मनपा कर विभागाचे संगणकीकरणात व ऑनलाईन करप्रणाली लागु करण्यात त्यांचे महत्वाचे योगदान लक्षात घेऊन त्यांची सध्या लागु असलेली वरिष्ठ लिपीक वेतनश्रेणी रु. ४०००-६००० आहे त्यांना याच वेतनश्रेणीतील रिक्त पदावर बढती देऊन सहाय्यक कर अधिक्षक किंवा वरिष्ठ लिपीक म्हणुन पदावर बढती देण्यात येते सदरील ठरावाची अमलबजावणी त्वरीत परिणामाने करण्यात यावी हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः**- आनंद शंकरराव चव्हाण **अनुमोदकः**- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. तसेच नगरसचिव विभागाचा व भरती प्रक्रियाचा अनुभव लक्षात घेता रिक्त असलेल्या श्री जुलफेखार अहेमद लिपीक यांना वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येते नियमानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.२३४** **ठ रा व**

मनपा मालमत्ता कर आकारणी व वसुली विभागातील श्री दत्तात्रय जनार्धन जाधव पाटील लिपीक हे सन १९८६-८७ पासुन कर आकारणी विभागात कार्यरत असुन सन २००५-०६ ची कर आकारणी व सन २०१३-१४ ची भांडवली मुल्याधारीत कर आकारणी करण्यात त्यांनी उत्कृष्ट नियोजन करुन कर आकारणी नियम तयार करुन भारांक निश्चीतीदारे यशस्वीपणे लागु करण्यात सहभाग नोंदवला आहे ज्यामुळे मनपाकेने घेतलेल्या निर्णयानुसार भांडावली मुल्याधारीत पध्दतीने कर आकारणी लागु करणा-या मोजक्याच मनपा पैकी एक महानगरपालिका ठरली आहे व त्याकरिता राज्य शासनाने मनपाकेस उत्तेजनार्थ अनुदान रु. ३.५० कोटी +१२ कोटी २२ लाख असे एकूण रु. १६ कोटी ७२ लाख सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये प्रदान केले आहे सन २००५-०६ ची कर

आकारणी व जाहिरात कर वसुलीचे उत्पन्नात भरीव वाढ झाल्यामुळे तत्कालीन आयुक्तांनी जाहिरात निरीक्षक पदावर त्यांना बढती देण्याकरिता प्रशासना मार्फत प्रस्ताव सादर केला होता तथापी ठराव क्रं. ३७ दि. २४ मे २००६ ठरावामध्ये इतर १७ कर्मचा-यांचे नावे समाविष्ट झाल्यामुळे या ठरावाची अमलबजावणी करण्यात आली नाही व तो शासनाकडेही मंजुरी करिता पाठविण्यात आला नाही मनपाकेत

असे अनेकाना बढती देऊन काम करणा-याना संधी दिली आहे. संबंधीताने आतापर्यंत केलेले कार्याव्दारे मनपाकेस सन २००५-०६ मध्ये सामान्य करात रु. ३.६० कोटी व सन २०१३-१४ च्या कर आकारणीवदारे सामान्य करात रु. ७.२७ कोटी उत्पन्नात भर पडली

श्री दत्तात्रय जनार्धन पाटील यांनी मालमत्ता कर आकारणी बाबत व इतर कार्यालयीन प्रशिक्षण वेळोवेळी यशदा पुणे व ऑल इंडीया लोकल सेल्फ गर्व्हनमेंट घेऊन ऑल इंडीया लोकल सेल्फ गर्व्हनमेंट या संस्थेकडून एलएसजीडी पदविका प्राप्त केली आहे. खालील प्रमाणे प्रशिक्षण संस्था व प्रशिक्षण कालावधीत प्राप्त केले आहे.

१) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे तर्फे Property Tax administration A major Source of Revenue for Local Bodies दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर २००६

२) यशदा पुणे तर्फे Review on JNNURM Reforms दिनांक १६ ते १८ जुन २००९

३) यशदा पुणे तर्फे क्षमतावृध्दी प्रशिक्षण दि. २९ जुन ते ३ जुलै २००९

४) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे तर्फे भांडवली मुल्याधारीत पध्दतीने कर आकारणी व वसुली सुधारीत पध्दती प्रशिक्षण कार्यक्रम दि. ३० ते ३१ ऑक्टोबर २०१०

५) यशदा पुणे तर्फे ट्रेनिंग ऑन मल्टील्पाय युवर स्कील्स विथ एक्सेल दि. १२ ते १४ जुलै २०११

६) यशदा पुणे तर्फे भांडवली मुल्याधारीत मालमत्ता कर आकारणी दि. २६ ते २८ नोव्हेंबर २०१२

७) यशदा पुणे तर्फे Advance Automation using word and Excel दि. १ ते ४ जुलै २०१३

सांस्कृतीक कार्य विभाग महाराष्ट्र शासन आयोजीत लोकोत्सव २००४ नांदेड उत्कृष्ट आयोजनात सहकार्याबदल प्रमाणपत्र देऊन गौरवीले आहे तसेच गुरु ता गद्यी त्रिशताब्दी सोहळा २००८ कॅम्प व्यवस्थापनात योगदाना बदल प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

संबंधीताची काम करण्याची सचोटी प्रामाणीकपणा व त्याव्दारे मनपाकेस प्राप्त झालेला महसुल यामध्ये त्याचा महत्वपुर्ण सहभाग सहीला आहे तसेच त्यांच्या वरील प्रशिक्षणामुळे व मनपा कर विभागाचे संगणकीकरणात व ऑनलाईन कर प्रणाली लागु करण्यात त्यांचे महत्वाचे योगदान लक्षात घेऊन त्यांची सध्या लागु असलेली वरिष्ठ लिपीक त्यांना याच वेतनश्रेणीतील रिक्त पदावर बढती देऊन सहाय्यक कर अधिक्षक किंवा वरिष्ठ लिपीक म्हणुन पदावर बढती देण्यास मान्यता देण्यात येते तसेच नगरसचिव विभागाचा व भरती प्रक्रियाचा अनुभव लक्षात घेता श्री जुलफेखार अहेमद लिपीक यांना वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येते सदरील ठरावाची अमलबजावणी त्वरीत परिणामाने करण्यात यावी हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२०** **प्रस्ताव**

मनपा तर्फे अथवा संयुक्त विद्यमाने व इतरत्र मिळुन सांस्कृतीक, क्रिडा, आर्थीक वैद्यकिय मदत एकूण खर्च करण्या बाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी चर्चा करणे बाबत.

**सुचकः-** विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदकः-** किशोर भवरे

**विरेंद्रसिंध गाडीवाले** प्रत्येक महासभेत स.सदस्यांमार्फत अंदाजपत्रकात तरतूद आहे किंवा नाही नियमावलीतील तरतूद काय आहे. शासन निर्णय काय आहे हे न पाहता, विविध संस्थांना सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ,विविध खेळाचे स्पर्धा घेण्याकरीता, कर्मचा-याना वैद्यकिय उपचाराकरीता, दुर्घटनाग्रस्ताच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याचे प्रस्ताव मांडण्यात येतात अशा प्रस्तावास विरोध करता येत नसल्यामूळे त्यास मान्यता देण्यात येते .आजच्या सभेत स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी २४ लक्षाचे अनुदान देण्याचा प्रस्ताव देण्यात आलेला आहे, हे कुठेतरी थांबले पाहिजे. याबाबत धोरणात्मक निर्णय घेवून प्रत्येक वर्षी अंदापत्रकात सांस्कृतीक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा, अनुदान, वैद्यकिय उपचार मदत याकरीता स्वतंत्र तरतूद करुन त्याप्रमाणे विनियोग व्हावयास पाहिजे.

**महापौर** श्री विरेंद्रसिघ गाडीवाले यांचे प्रस्तावावर पूढील सभेत चर्चा करुन निर्णय घेण्यात येइल.

**ठराव क्र.२३५** **ठ रा व**

शहरातील विविध संस्थांना सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ,विविध खेळाचे स्पर्धा घेण्याकरीता, कर्मचा-याना वैद्यकिय उपचाराकरीता, दुर्घटनाग्रस्ताच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याचे प्रस्ताव मांडण्यात येतात परंतु अशा प्रकारचे अनुदान /आर्थिक मदत देण्याकरीता महानगरपालिकेने अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे किंवा नाही. अनुदान देण्यासंबधी काय नियम करण्यात आलेले आहे पाहिजे जात नाही. म्हणून याबाबतीत धोरणात्मक निर्णय आवश्यक आहे करीता याबाबत सर्व स.सदस्यांनी अभ्यास करुन आपल्या सुचना पुढील सभेत याव्यात जेणे करुन आलेल्या सुचनेवर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा असे ही नांवमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र.२१** **प्रस्ताव**

मनपा आस्थापनेवरील मेडीकल ऑफिसर निवृत्त झाल्यामुळे रिक्त पद तात्काळ भरणे बाबत

**सुचकः-** चव्हाण आनंद शंकरराव, **अनुमोदकः-**, विरेंद्रसिंघ गाडीवाले

**प्रशासकिय टिपपणी**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी या अभिनामाची एकूण 16 पदे मंजूर आहेत व सद्यस्थितीत त्यापैकी आस्थापनेवर एकूण 14 पदे भरलेली असुन यापुर्वी कार्यरत अधिका-यांच्या सेवानिवृत्तीमुळे 02 पदे रिक्त आहेत. मा.सहाय्यक आयुक्त (मा.व.क.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी प्रमाणित करुन दिलेल्या बिंदु नामावलीनुसार वैद्यकीय

अधिकारी या पदाचे भ.ज.ब प्रवर्गाचा 01 व इ.मा.व. प्रवर्गाचा 01 असा एकूण 02 पदांचा अनुशेष शिल्लक आहे व शासन परिपत्रकानुसार अपंग प्रवर्गाचा 01 अनुशेष शिल्लक असुन सदर 03 पदांचा आरक्षित प्रवर्गाचा शिल्लक अनुशेष भरणे आहे.

वैद्यकीय अधिकारी चे शिल्लक 01 अपंग अस्थिव्यंग प्रवर्गाचा अनुशेष भरुन काढणेसाठी यापुर्वी 02 वेळेस दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवून उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले असता दोन्ही वेळेस उमेदवार उपलब्ध झाले नाही त्यामुळे अपंग प्रवर्गाचा अनुशेष भरण्याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे अद्याप अप्राप्त आहे.

त्यामुळे सद्यस्थितीत वैद्यकीय अधिकारी या अभिनामाची 02 पदे रिक्त असुन शिल्लक अनुशेषानुसार सदरची पदे भरण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**महापौर** स.सदस्यांचा पस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्र.२३६** **ठ रा व**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील मेडीकल ऑफिसर निवृत्त झाल्यामुळे अनेक दिवसापासून मेडीकल ऑफिसरचे पद रिक्त असल्यामूळे शहरातील नागरीकांना आरोग्याच्या सुविधा उपल्बध्द मिळत नाही करीता मेडीकल ऑफिसरचे पद तात्काळ भरण्यासाठी आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२२** **प्रस्ताव**

मनपा हद्दीत बिएसयुपी योजने अंतर्गत एकूण किती झोपडपट्टी भागात एकूण किती घरकुले मंजुर झाली झोपडपट्टी निहाय तपशील देण्यात यावा तसेच अद्याप पर्यंत शासनाकडून किती निधी प्राप्त झाली व किती मंजुर झाला झोपडपट्टीनिहाय मुलभूत सुविधासहीत तपशील देण्यात यावा.

नांदेड मनपाकेने किती झोपडपट्टी भागात घरकुलाचे व मुलभुत सुविधाचे कामे पुर्ण केली व एकूण किती घरकुलेची कामे पूर्ण केली व किती घरकुलाचे कामे प्रगतीपथावर आहे व त्यावर झालेला व होणारा संभाव्य खर्च झोपडपट्टी निहाय सर्व साधारण सभेसमोर देण्यात यावा.

**सुचकः-** गफार खान गुलाम महमंद खान **अनुमोदकः-** स. शेर अली

**महापौर** प्रस्तावाच्या अनुषंगाने माहिती तयार करुन स. सदस्यांना देण्यात यावी

**ठराव क्र.२३७** **ठ रा व**

मनपा हद्दीत बिएसयुपी योजने अंतर्गत एकूण किती झोपडपट्टी भागात एकूण किती घरकुले मंजुर झाली झोपडपट्टी निहाय तपशील देण्यात यावा तसेच अद्याप पर्यंत शासनाकडून किती निधी प्राप्त झाली व किती मंजुर झाला झोपडपट्टीनिहाय मुलभूत सुविधासहीत तपशील तसेच नांदेड मनपाकेने किती झोपडपट्टी भागात घरकुलाचे व मुलभुत सुविधाचे कामे पुर्ण केली व एकूण किती घरकुलेची कामे पूर्ण केली व किती घरकुलाचे कामे प्रगतीपथावर आहे व त्यावर झालेला व होणारा संभाव्य खर्च याबाबतची सविस्तर माहिती स. सदस्यांना लेखी स्वरुपात देण्यात यावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र.२३** **प्रस्ताव**

मनपा हद्दीत बीएसयुपी योजने अंतर्गत अनुक्रमे केंद्र शासन व राज्य शासन यांचा मोठया प्रमाणात निधी आला होता पण सदर निधी आता पर्यंत किती खर्च करण्यात आला आहे विहित मुदतीअंती कांही निधी केंद्र व राज्य शासनास परत करावा लागत आहे काय या संदर्भात सविस्तर माहिती सभागृहासमोर ठेवण्यात यावी.

**सुचकः-** प्रमोद खेडकर **अनुमोदकः-** सौ.सुदर्शना महेश बाळु खोमणे, उमेश चव्हाण

**महापौर** विषय क्र.२२ प्रमाणे विषय क्र.२३ माहिती स. सदस्यांना लेखी स्वरुपात देण्यात यावी.

**ठराव क्र.२३८** **ठ रा व**

मनपा हद्दीत बीएसयुपी योजने अंतर्गत अनुक्रमे केंद्र शासन व राज्य शासन यांचा मोठया प्रमाणात निधी आला होता पण सदर निधी आता पर्यंत किती खर्च करण्यात आला आहे विहित मुदतीअंती कांही निधी केंद्र व राज्य शासनास परत करावा लागत आहे काय या संदर्भात सविस्तर माहिती सर्व स.सदस्यांना लेखी स्वरुपात देण्यात यावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते .

**विषय क्र.२४** **प्रस्ताव**

मनपा प्राथमिक शाळा क्रं. ४ जंगमवाडी, नांदेड येथील पाण्याच्या टाकी खाली वर्कशाप तात्पुरत्या स्वरुपात मागील एप्रिल २०१४ मध्ये शिफट करण्यात आली होती. जुनी इमारत जंगमवाडी दवाखाना येथे असून ती इमारत त्वरीत दुरुस्त करुन जुन २०१५ च्या आत परत जुन्याच इमारतीत पाठविणे योग्य राहील अन्यथा ही नामवंत शाळा बंद पडेल गरीब होतकरुन मागास विद्यार्थ्यांच अतोनात नुकसान होईल करिता हा प्रस्ताव चर्चेसाठी सादर.

**सुचकः-** किशोर भवरे **अनुमोदकः-** आनंद चव्हाण

**किशोर भवरे** जंगमवाडी येथील शाळा वर्कशॉप पाण्याच्या टाकीखाली स्थलांतरीत करण्यात आली आहे. जंगमवाडी भागातील मागासवर्गीय लहान लहान मुलांना जाण्या येण्याचा त्रास होत असल्यामूळे या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या २० टक्यानी कमी झालेली आहे. भविष्यात विद्यार्थी संख्ये अभावी ही शाळा बंद पडू शकते त्यामूळे लवकरात लवकर जंगमवाडी येथे शाळा स्थलांतरीत करण्यात यावी.

**महापौर** स.सदस्यांचा पस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्र.२३९** **ठ रा व**

मनपा प्राथमिक शाळा क्रं. ४ जंगमवाडी, नांदेड येथील पाण्याच्या टाकी खाली वर्कशाप तात्पुरत्या स्वरुपात मागील एप्रिल २०१४ मध्ये शिफट करण्यात आली होती. जुनी इमारत जंगमवाडी दवाखाना येथे असून ती इमारत त्वरीत दुरुस्त करुन जुन २०१५ च्या आत परत जुन्याच इमारतीत स्थलांतरीत करण्यात यावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र.२५** **प्रस्ताव**

जुना मोंढा येथील मनपाकेचे रंजीतसिंघ मार्केटच्या जागेत बिओटी तत्वावर होणा-या बांधकाम हा मनपाकेच्या नगररचना विभागाचे पत्र क्रं. नावाशमनपा/नरवि/झोन४/मा.आधी १०७/दि. ०५.०१.२०१५ नुसार सन्माननीय स्विकृत सदस्य श्री हसन बीन उबेद अलकसरी यांनी माहितीच्या अधिकारा अंतर्गत नगररचना विभागाकडून जुना मोंढा येथील रंजितसिंघ मार्केटच्या जागेवर होत असलेल्या जय केदारनाथ बिल्डकॉन प्रा.लि. बांधकामा बाबत माहिती मागीतली होती व त्या अनुषंगाने वरील नगररचनाने पत्राव्दारे दिलेल्या माहितीनुसार सदरील जागेवर पुर्णः विनापरवाना व अनाधिकृत बांधकाम चालू असल्याचे स्पष्ट झालेले आहे.

तसेच रंजीतसिंघ मार्केट व कै. माधवराव बिंदु मंगल कार्यालयाचया जागेवर बिओटी तत्वावर व्यापारी संकुल व इतर कार्यालये बांधण्यासाठी जय केदारनाथ बिल्डकॉल प्रा.लि. या नावाच्या ठेकेदाराला विकसीत करण्यासाठी देण्यात आलेले आहे व या जागेवर बांधकाम सुरु करण्यापुर्वी संबंधीत ठेकेदारास जे अटी व शर्ती ठेवण्यात आलेले आहे त्यानुसार त्यांनी बांधकाम सुरु करण्या अगोदर नियमानुसार बांधकाम परवानगी घेणे बंधनकारक होते पण संबंधीत ठेकेदाराने तसे न करता मनपा प्रशासनाला व बांधकाम परवानगीच्या नियमाला धुडकावून अनाधिकृतपणे सदरील जागेवर बांधकाम जोराने सुरु करुन छतापर्यंत बांधकाम णालेले असतांना सुध्दा मनपा प्रशासनाने याची दखल घेतलेली नाही व तसेच सदरचे बांधकाम रोखण्या बाबत कोणतेही प्रकारचे प्रयत्न दिसून येत नाही.

म्हणुन जय केदारनाथ बिल्डकॉन प्रा.लि. या ठेकेदाराने बिओटी तत्वावर देण्याचया अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याने व बिओटी कराराच्या अटीनुसार संबंधीतांनी अटी व शर्तीचे उल्लंघन केल्या कारणाने त्यांना मंजुर करण्यात आलेने बिओटी चे करार तात्काळ रद्द करावे व आजपर्यंत झालेले बांधकाम बाबतची जबाबदारी, जबाबदारी अधिका-यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरोधी पक्षनेता, सभागृहनंता, स्थायी सिभापती, मा उपमहापौर व मा. महापौर यांचाही समावेश करण्यात यावा जेणे करुन यापुढे कोणत्याही बिओटी तत्वावरील ठेकेदार बिओटी अटी व शर्तीचे उल्लंघन करणार नाही व आता पर्यंत दिलेल्या बिओटी तत्वावरील सर्व बांधकामाची या समितीव्दारे चौकशी करण्यात यावी. करिता वरील ठराव या सर्व साधारण सभेत सर्वानुमते समंत करण्यात येते व या सभे मध्ये या ठरावास कामय करण्याची मंजुरी देण्यात येते.

**सुचकः-** हसन बीन उबेद अलकसेरी **अनुमोदकः-** अंजुम बेगम शे. अफरोज

**महापौर** प्रस्तावाचे सुचक व अनुमोदन सभागृहात उपस्थित नसल्यामूळे प्रस्ताव विषयपत्रिकेतून वगळण्यात येतो.

**विषय क्र.२६** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीत वसंतनगर भागात प्रत्येक उन्हाळयामध्ये टेलएंड पॉईटवर राहणा-या नागरीकांना तीव्र पाणी टंचाईस तोंड द्यावे लागत आहे.

करीता मगनपुरा,वसंतनगर भागात जूनी पाईप लाईन काढून नविन पाईप लाईन टाकून पाणी पुरवठा सुरळीत करण्याकरीता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर देते.

**सुचकः-** सौ.सोनाबाई रामचंद्र मोकले **अनुमोदकः-** ईशरत फातेमा अ.शमीम

**महापौर** स.सदस्यांचा पस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्र.२४०** **ठ रा व**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीत वसंतनगर भागात प्रत्येक उन्हाळयामध्ये टेलएंड पॉईटवर राहणा-या नागरीकांना तीव्र पाणी टंचाईस तोंड द्यावे लागत आहे.करीता मगनपुरा, वसंतनगर भागातील नागरीकांचा पाण्यचा प्रश्न सोडविण्यासाठी तेथील अस्तित्वात असलेली जूनी पाईप लाईन काढून त्याठिकाणी नविन पाईप लाईन टाकण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते .

**विषय क्र.२७** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी गुंठेंवारी प्रस्तावाचे पुनश्च दाखल करुन घेण्यासाठी गुठेवारीस मुदतवाढ देण्यास मान्यता देणे बाबत.

**सुचकः-** आनंद शंकरराव चव्हाण **अनुमोदकः-** शफी अहेमद कुरेशी

**आनंद चव्हाण** महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीकोनातून ३१ मार्च २०१६ पर्यत गुठेंवारीस मुदतवाढ देण्यात यावी.

**महापौर** श्री आनंद चव्हाण यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र.२४१** **ठ रा व**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी गुंठेंवारी प्रस्ताव पुनश्च दाखल करुन घेण्यासाठी गुठेवारीस दि.३१ मार्च २०१६ पर्यत मुदतवाढ देण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. व हा ठराव याचसभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२८** **प्रस्ताव**

जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत नादेड शहरातील विविध विकास कामासाठी तसेच बिएसयुपी घरकुल बांधकाम व मुलभूत सुविधाचे कामासाठी केद्र शासन व महाराष्ट्र शासनाचे सहायाने सन २००५-२००६ पासून महानगरपालिका, नांदेडला निधी वितरीत करण्यात आला होता, त्यानुसार महानगरपालिका नांदेडने कामास सुरुवात करुन मोठया प्रमाणात कामे अंतिम केलेली आहे. काही शिल्लक कामे प्रगती पथावर आहेत. ३१ मार्च २०१५ जी कामे अंतिम होणे अपेक्षित आहे अशा सर्व कामासाठी निधी केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडे मागणी करुन निधी प्राप्त करुन घ्यावा जेणे करुन मनपा नांदेडला बोजा सोसावा लागणार नाही. सदर लागणारा अपेक्षित निधी केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडून मागणी कफन प्राप्त करुन घेण्यासाठी तसेच जर शासनाकडून प्राप्त निधी शासनाकडे परत करावयाची आवश्यकता भासल्यास सदर निधी परत करतांना सर्वसाधारण सभेची मान्यता घेवूनच निधी परत करण्यात यावा.

**सुचकः-** सरजितसिघ गिल **अनुमोदकः-** उमेश चव्हाण, चॉदपाशा कुरेशी

**सरजितसिंघ गिल**

जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत नांदेड शहरातील विविध भागात बि.एस.यु.पी. योजने अंतर्गत घरकुल बांधकाम व मुलभूत सुविधाच्या कामासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला होता. पण सदर योजना 31 मार्च 2015 पर्यंत संपविण्यासाठी केंद्र शासनाकडून कळविण्यात आल्यामुळे सदर कामासाठी आलेला निधी केंद्र शासनाला परत करणे अगोदर सर्व साधारण सभेपुढे ठेवून सर्व साधारण सभेची मान्यता घेवूनच परत करण्यास ही सर्व साधारण सभा मान्यता देते. तसेच टप्पा क्र. 1 मधील बि.एस.यु.पी. योजने अंतर्गत विविध भागात पाणी पुरवठा व मलनिसारणची व्यवस्था करण्याच्या खालील प्रमाणे संदर्भ सादर करण्यात येत आहेत.

<u>**संदर्भ :-**</u>

1) जा.क्र. नांवाशमनपा (बि.एस.यु.पी.)/साबावि/4892/2007 दि. 17.07.2007 व नांवाशमनपा/ पापुवजनी /6917/ 2007 दि.04.08.2007.
2) दि.25.10.2007 रोजी त्रिसदस्यीय समिती समोर उघडण्यात आलेल्या निविदा.
3) नांवाशमनपा स्थायी समितीने पारित केलेला ठराव क्र. 214, दि.21.08.2009 द्वारे आयुक्त, नांवाशमनपा नांदेड यांना दिलेले अधिकार.
4) जा.क्र.नांवाशमनपा/बिएसयुपी/445/2009, दि.29.08.2009 निविदा मंजूरी आदेश
5) जा.क्र.नांवाशमनपा/बिएसयुपी/461,462,463 दि. 30.08.2009.
6) करारनामा दि.29.08.2009.
7) का.आ.नांवाशमनपा/बिएसयुपी/464, 465, 466, 467, 468, 469 दि. 31.08.2009
8) कंत्राटदाराचे पत्र दि.03.10.2009, दि.31.10.2009, दि.27.01.2010
9) अपिल कन्सलटन्सी यांचे पत्र क्र. 1549/09, दि. 15.10.2009, 1643/09, दि.10.11.2009.
10) जा.क्र.उपआयुक्त (विकास)/4508/10, दि.30.01.2010 प्राथमिक चौकशी अहवाल.
11) जा.क्र.नांवाशमनपा/जेएनएनयुआरएम/बीएसयुपी/2028/2010 दि. 05.02.2010.
12) जा.क्र.नांवाशमनपा/बिएसयुपी/1086, 1087, 1088, 1089,1091 दि.03.02.2010
13) जा.क्र.नांवाशमनपा/जे.एन.एन.यु.आर.एम./बि.एस.यु.पी./2028/10,दि.05.02.2010.
14) कंत्राटदाराचे पत्र दि.26.04.2010, दि.27.04.2010.
15) कंत्राटदाराचे सी.डी.आर. (सुरक्षा अनामत रक्कम) परत मिळण्यासाठी केलेला अर्ज दि. 31.07.2014 व दि. 01.08.2014.
16) कंत्राटदाराचे सी.डी.आर. (सुरक्षा अनामत रक्कम) परत केलेली दि. 10.10.2014.

वरील संदर्भीय क्र. 1 द्वारे निविदा सूचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आली असता, सदर निविदेत कंत्राटदाराने भाग घेवून निवीदा भरली होती. भरलेल्या निविदाधारका पैकी पात्र असलेल्या निविदाधारकांची निविदा त्रिसदस्यी समिती समोर दि. 25.10.2007 रोजी निविदा उघडण्यात आल्या होत्या. पण घरकुलाचे काम सुरु न झाल्यामुळे उघडण्यात आलेल्या निविदा तसेच ठेवण्यात आले होते. नंतरच्या काळात सदर कामांच्या कंत्राटदारांना कोणतेही पत्र देवून निविदा का प्रलंबित ठेवल्या त्या बाबत कळविण्यात आले नाही. तसेच नंतरच्या काळात सदर कामांच्या कंत्राटदारांशी निविदा दर वाटाघाटी मंजूर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना संदर्भ क्र. 3 द्वारे आयुक्त यांना देण्यात आले असता, आयुक्त यांनी सदर कंत्राटदारांशी वाटाघाटी करुन संदर्भ क्र. 4 द्वारे निविदा दर मंजूर केले. त्यानंतर संदर्भ क्र. 5 द्वारे कंत्राटदारांना सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा सादर करण्यासाठी कळविले असता, संबंधी कंत्राटदाराने सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा करुन दि. 29.08.2009 रोजी सादर केला व वरील संदर्भ क्र. 7 द्वारे सदर कंत्राटदारांना कामाचे कार्यरंभ आदेश निर्गमीत केले. कार्यरंभ आदेश मिळाल्यानंतर संबंधीत कामाच्या कंत्राटदाराने कामाचे मार्कआऊट घेवून कामांना सुरुवात केली. तसेच वरील संदर्भ क्र. 1 ते 9 चे अवलोकन व्हावे. तसेच सदरील काम चालू असतांना संदर्भ क्र. 12 द्वारे काम रद्द केल्या बाबत कळविले आहे.

तसेच संदर्भ क्र. 10 द्वारे कामांची प्राथमिक चौकशी अहवाल उपआयुक्त (विकास) यांनी संदर्भीय पत्राद्वारे मा.आयुक्त यांच्याकडे दिले. त्यानंतर संदर्भ क्र. 12 द्वारे निविदा रद्द करण्या बाबत पत्र कळविले. नंतर कंत्राटदारांनी आपले म्हणणे दि. 26.04.2010 व दि. 27.04.2010 द्वारे प्रशासनास कळविले, पण संदर्भीय पत्र क्र. 10 दि. 03.02.2010 च्या पत्राचे अवलोकन व्हावे. तसेच काम रद्द करण्या आगोदर कोणतीही निविदा अटी व नियमा प्रमाणे नोटीस न देता काम रद्द करणे म्हणजे हा करारनाम्याचा भंग आहे. तसेच पत्र क्र. 4508, दि. 30.01.2010 मधील अ.क्र. 1 व 2 च्या कामाचे देयक चौकशी न करता दि.16.06.2010 रोजी कंत्राटदारांना देण्यात आले. या वरुन असे सिद्ध होते की, या चौकशी मध्ये काहीही तथ्य नसल्याचे दिसून येते. तसेच निविदा अंजदापत्रक दर हे साल सन 2005 व 2006 च्या जिल्हा दर सुचीवर आधारीत होते. पण कंत्राटदाराची निविदा ही 2009 मध्ये मंजूर केले.जे की, महापालिकेच्या हिताचे होते. कारण की, सदरील कंत्राटदार काम करावयास तयार असतांना कामे का रद्द केली हे समजत नाही कारण की, पत्र क्र. 4508 मधील एकुण 8 कामा पैकी 6 कामेच रद्द केले व अ.क्र. 1 व 2 चे त्या कामाचे देयक दिले असतांना उर्वरीत 6 कामाबाबत कोणतीही सखोल चौकशी न करता तसेच आज तारखे पर्यंत केलेल्या चौकशीचा अहवाल किंवा निर्णय दिलेला नाही. यावरुन असे दिसते की, ह्यांनी करारनाम्याचा भंग करुन कामे रद्द केले. जेंव्हा की, कामे रद्द करण्या आगोदर कंत्राटदारांना एक महिन्याची नोटीस नियमाने द्यावे लागते ते सुध्दा केले नाही. तसेच सदर चौकशी अहवालातील अ.क्र. 1 व 2 च्या कामा बाबत अधिक्षक अभियंता हयांनी सदरील कामे या कंत्राटदाराकडून करुन घेणे हे सुध्दा महापालिकेच्या हिताचे असल्या बाबत टिपणी मध्ये उल्लेख केलेले आहे. तरी सुध्दा मलनिसारणच्या कामाची निविदा का रद्द करण्यात आली हे समजत नाही. तसेच सदरील कामाच्या कंत्राटदारांची कोणतीही सुनावनी न घेता एकतर्फीच कार्यवाही केलेली दिसते. तसेच सदर कामांच्या कंत्राटदारांचे रोखुन धरण्यात आलेली सुरक्षा अनामत रक्कम (सी.डी.आर.) चे नुतनीकरण सुध्दा केलेले नाही. जे की, निविदा अटी नियमा नुसार आवश्यक आहे. तसेच दि.03.02.2010 च्या पत्रामध्ये सदर निविदाची चौकशी पूर्ण होई पर्यंत इसरा रक्कम व सुरक्षा रक्कम रोखून ठेवण्यात येत आहे असे सूचविलेले असतांना ही आज पर्यंत सदरील कंत्राटदारांना चौकशी बाबत काहीही कळविलेले नाही. पण स्वता: कंत्राटदारांनी सदरील कामा मध्ये झालेल्या नुकसानाची भरपाई व कामे केल्यावर Cantractor Profit (फायदा) मिळणारी रक्कम द्यावी म्हणून अनेकदा पत्र दिले. पण त्या पत्राबाबत ही प्रशासना मार्फत काहीही कळविण्यात आले नाही. तसेच सदरील कंत्राटदार हे कर्ज बाजारी झाल्यामुळे सदरील कंत्राटदाराने संदर्भ क्र. 15 द्वारे सी.डी.आर. परत मिळण्यासाठी अर्ज केला असता, सदर सी.डी.आर. हे दि. 10.10.2014 रोजी परत केले असता सदर कंत्राटदार हे सी.डी.आर. घेवून बँकेत गेले असता, बँक व्यवस्थापकांनी असे सांगितले की, महापालिकेने सदर सी.डी.आर.चे नुतनीकरण केलेले नाही. त्यामुळे कंत्राटदारांचा सी.डी.आर. वर मिळणारा व्याजाचे नुकसान झाले. त्यासाठी बुडालेल्या व्याज ही महानगरपालिकाने भरुन द्यावे. तसेच टप्पा क्र. 1 मधील सर्व कामांची उपयोगीता पत्र (Utilization Certificate) शासनास सादर केलेले असल्यामुळे सदर कामाचे रद्द केलेल्या कामा बाबत किंवा चौकशी अहवाल नियमाप्रमाणे स्थायी समिती व सर्वसाधारण सभे पुढे ठेवणे गरजेचे असतांनाही त्यांनी स्थायी समिती किंवा सर्वसाधरण सभेस नजरेस आणून दिलेले नाही. तसेच संचिकामध्ये अधिक्षक अभियंता यांनी नोटसीट 20 वर 10 प्रमाणे महानगरपालिकेच्या कायदे सल्लागाराच्या अभिप्राय घेण्यासाठी कळविले असता, ते पण घेतले नाही. तसेच नोटसीट 21 वर पॅरा क्र. 2 मध्ये अधिक्षक अभियंता यांनी सदर कामाचे कार्यरंभ आदेश कोणत्या कलमाअन्वये रद्द करता येते हे कायदे सल्लागार यांचा अभिप्राय घेवूनच मगच निविदा रद्द करावी असे टिपणीवरुन दिसते. पण त्यांनी तसेच न करता एकतर्फा निविदा रद्द केली आहे. पण सदरील कामाच्या निविदा रद्द करते वेळी कोणत्याही कायद्याचा आधार न घेतल्यामुळे व नियम न पाळल्यामुळे तसेच एकतर्फी निर्णय घेतल्यामुळे व सदर कामाची चौकशी अहवाल सन 2010 ते 2015 पर्यंत स्थायी समिती व सर्वसाधारण सभे पुढे न आणल्यामुळे ही सर्वसाधरण सभा प्रशासनाने केलेली एकतर्फी कार्यवाही रद्द बातल ठरवते. तसेच कंत्राटदाराच्या करारनामा व अटी प्रमाणे कंत्राटदारास झालेल्या नुकसान भरपाई व कामापासून मिळणा-या नफ्याचे नुकसान भरपाई करुन देण्यासाठी तसेच टप्पा क्र. 1 मधील कामाचे उपयोगीता प्रमाणपत्र शासनाकडे कामे पुर्ण झाली म्हणून दिल्यामुळे सदर कामांच्या संदर्भ क्र. 4 च्या आदेशातील सर्व कंत्राटदारांच्या केलेल्या कामांचे व झालेल्या नुकसान भरपाईच्या रक्कमेचे व्याजासह अदाई करण्यास तसेच मल व जलनिस्सारणाच्या कामाच्या निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे होणारी बाजार दरवाढ अतिरिक्त बाबीवर व वाढीव झालेल्या कामासाठी लागणा-या जास्तीच्या ख्र्चास यापुर्वी सर्व साधारण सभेने ठराव क्रं. 132 दिनांक 24.11. 2014 अन्वये दिलेल्या मान्यता ठरावानुसार तसेच दलीत वस्ती योजना कामाच्या व आदेश क्रमांक 1538/2006 व 13687/2007 मधील तसेच मराठवाडा पॅकेज, अकरावे वित्त आयोग अंतर्गत झालेल्या कामावर निविदा अटी प्रमाणे बाजार दरवाढ, अतिरिक्त बाबीवर व वाढीव कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकानुसार संबंधीत कामासाठी लागणारा जास्तीच्या खर्चास हि सर्व साधारण सभा कार्योत्तर मान्यता देते. तसेच सदर कामाच्या खर्चासाठी लागणा-या रक्कमेस सन 2015-16 च्या अर्थसंकल्पात तरतुद अपुरी पडल्यास अर्थसंकल्पात पुनरनियोजन करुन तरतुद करण्यास व सदर कामांना पुर्नर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देते तसेच थकीत संबंधीत कंत्राटदारांची देयके त्वरीत अदायी करण्यास मान्यता देण्यात यावी.

**स.शेर अली** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** स.सदस्यांचा पस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

ठराव क्र.२४२ ठ रा व

जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत नांदेड शहरातील विविध भागात बि.एस.यु.पी. योजने अंतर्गत घरकुल बांधकाम व मुलभूत सुविधाच्या कामासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला होता. पण सदर योजना 31 मार्च 2015 पर्यंत संपविण्यासाठी केंद्र शासनाकडून कळविण्यात आल्यामुळे सदर कामासाठी आलेला निधी केंद्र शासनाला परत करणे अगोदर सर्व साधारण सभेपुढे ठेवून सर्व साधारण सभेची मान्यता घेवूनच परत करण्यास ही सर्व साधारण सभा मान्यता देते. तसेच टप्पा क्र. 1 मधील बि.एस.यु.पी. योजने अंतर्गत विविध भागात पाणी पुरवठा व मलनिसारणची व्यवस्था करण्याच्या खालील प्रमाणे संदर्भ सादर करण्यात येत आहेत.

<u>संदर्भ :-</u>

1) जा.क्र. नांवाशमनपा (बि.एस.यु.पी.)/साबावि/4892/2007 दि. 17.07.2007 व नांवाशमनपा /पापुवजनी/6917/ 2007 दि.04.08.2007.
2) दि.25.10.2007 रोजी त्रिसदस्यीय समिती समोर उघडण्यात आलेल्या निविदा.
3) नांवाशमनपा स्थायी समितीने पारित केलेला ठराव क्र. 214, दि.21.08.2009 द्वारे आयुक्त, नांवाशमनपा नांदेड यांना दिलेले अधिकार.
4) जा.क्र.नांवाशमनपा/बिएसयुपी/445/2009, दि.29.08.2009 निविदा मंजूरी आदेश
5) जा.क्र.नांवाशमनपा/बिएसयुपी/461,462,463 दि. 30.08.2009.
6) करारनामा दि.29.08.2009.
7) का.आ.नांवाशमनपा/बिएसयुपी/464, 465, 466, 467, 468, 469 दि. 31.08.2009
8) कंत्राटदाराचे पत्र दि.03.10.2009, दि.31.10.2009, दि.27.01.2010
9) अपिल कन्सलटन्सी यांचे पत्र क्र. 1549/09, दि. 15.10.2009, 1643/09, दि.10.11.2009.
10) जा.क्र.उपआयुक्त (विकास)/4508/10, दि.30.01.2010 प्राथमिक चौकशी अहवाल.
11) जा.क्र.नांवाशमनपा/जेएनएनयुआरएम/बीएसयुपी/2028/2010 दि. 05.02.2010.
12) जा.क्र.नांवाशमनपा/बिएसयुपी/1086, 1087, 1088, 1089,1091 दि.03.02.2010
13) जा.क्र.नांवाशमनपा/जे.एन.एन.यु.आर.एम./बि.एस.यु.पी./2028/10,दि.05.02.2010.
14) कंत्राटदाराचे पत्र दि.26.04.2010, दि.27.04.2010.
15) कंत्राटदाराचे सी.डी.आर. (सुरक्षा अनामत रक्कम) परत मिळण्यासाठी केलेला अर्ज दि. 31.07.2014 व दि. 01.08.2014.
16) कंत्राटदाराचे सी.डी.आर. (सुरक्षा अनामत रक्कम) परत केलेली दि. 10.10.2014.

वरील संदर्भीय क्र. 1 द्वारे निविदा सूचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आली असता, सदर निविदेत कंत्राटदाराने भाग घेवून निवीदा भरली होती. भरलेल्या निविदाधारका पैकी पात्र असलेल्या निविदाधारकांची निविदा त्रिसदस्यी समिती समोर दि. 25.10.2007 रोजी निविदा उघडण्यात आल्या होत्या. पण घरकुलाचे काम सुरु न झाल्यामुळे उघडण्यात आलेल्या निविदा तसेच ठेवण्यात आले होते. नंतरच्या काळात सदर कामांच्या कंत्राटदारांना कोणतेही पत्र देवून निविदा का प्रलंबित ठेवल्या त्या बाबत कळविण्यात आले नाही. तसेच नंतरच्या काळात सदर कामांच्या कंत्राटदारांशी निविदा दर वाटाघाटी मंजूर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना संदर्भ क्र. 3 द्वारे आयुक्त यांना देण्यात आले असता, आयुक्त यांनी सदर कंत्राटदारांशी वाटाघाटी करुन संदर्भ क्र. 4 द्वारे निविदा दर मंजूर केले. त्यानंतर संदर्भ क्र. 5 द्वारे कंत्राटदारांना सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा सादर करण्यासाठी कळविले असता, संबंधीत कंत्राटदाराने सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा करुन दि. 29.08.2009 रोजी सादर केला व वरील संदर्भ क्र. 7 द्वारे सदर कंत्राटदारांना कामाचे कार्यरंभ आदेश निर्गमीत केले. कार्यरंभ आदेश मिळाल्यानंतर संबंधीत कामाच्या कंत्राटदाराने कामाचे मार्कआऊट घेवून कामांना सुरुवात केली. तसेच वरील संदर्भ क्र. 1 ते 9 चे अवलोकन व्हावे. तसेच सदरील काम चालू असतांना संदर्भ क्र. 12 द्वारे काम रद्द केल्या बाबत कळविले आहे. तसेच संदर्भ क्र. 10 द्वारे कामांची प्राथमिक चौकशी अहवाल उपआयुक्त (विकास) यांनी संदर्भीय पत्राद्वारे मा.आयुक्त यांच्याकडे दिले. त्यानंतर संदर्भ क्र. 12 द्वारे निविदा रद्द करण्या बाबत पत्र कळविले. नंतर कंत्राटदारांनी आपले म्हणणे दि. 26.04.2010 व दि. 27.04.2010 द्वारे प्रशासनास कळविले, पण संदर्भीय पत्र क्र. 10 दि. 03.02.2010 च्या पत्राचे अवलोकन व्हावे. तसेच काम रद्द करण्या आगोदर कोणतीही निविदा अटी व नियमा प्रमाणे नोटीस न देता काम रद्द करणे म्हणजे हा करारनाम्याचा भंग आहे. तसेच पत्र क्र. 4508, दि. 30.01.2010 मधील अ.क्र. 1 व 2 च्या कामाचे देयक चौकशी न करता दि.16.06.2010 रोजी कंत्राटदारांना देण्यात आले. या वरुन असे सिद्ध होते की, या चौकशी मध्ये काहीही तथ्य नसल्याचे दिसून येते. तसेच निविदा अंजदापत्रक दर हे साल सन 2005 व 2006 च्या जिल्हा दर सुचीवर आधारीत होते. पण कंत्राटदाराची निविदा ही 2009 मध्ये मंजूर केले.जे की, महापालिकेच्या हिताचे होते. कारण की, सदरील कंत्राटदार काम करावयास तयार असतांना कामे का रद्द केली हे समजत नाही कारण की, पत्र क्र. 4508 मधील एकुण 8 कामा पैकी 6 कामेच रद्द केले व अ.क्र. 1 व 2 चे त्या कामाचे देयक दिले असतांना उर्वरीत 6 कामाबाबत कोणतीही सखोल चौकशी न करता तसेच आज तारखे पर्यंत केलेल्या चौकशीचा अहवाल किंवा निर्णय दिलेला नाही. यावरुन असे दिसते की, ह्यांनी करारनाम्याचा भंग करुन कामे रद्द केले. जेंव्हा की, कामे रद्द करण्या आगोदर कंत्राटदारांना एक महिन्याची नोटीस नियमाने द्यावे लागते ते सुध्दा केले नाही. तसेच सदर चौकशी अहवालातील अ.क्र. 1 व 2 च्या कामा बाबत अधिक्षक अभियंता हयांनी सदरील कामे या कंत्राटदाराकडून करुन घेणे हे सुध्दा महापालिकेच्या हिताचे असल्या बाबत टिपणी मध्ये उल्लेख केलेले आहे. तरी सुध्दा मलनिसारणच्या कामाची निविदा का रद्द करण्यात आली हे समजत नाही. तसेच सदरील कामाच्या कंत्राटदारांची कोणतीही सुनावनी न घेता एकतर्फीच कार्यवाही केलेली दिसते. तसेच सदर कामांच्या कंत्राटदारांचे रोखुन धरण्यात आलेली सुरक्षा अनामत रक्कम (सी.डी.आर.) चे नुतनीकरण सुध्दा केलेले नाही. जे की, निविदा अटी नियमा नुसार आवश्यक आहे. तसेच दि. 03.02.2010 च्या पत्रामध्ये सदर निविदाची चौकशी पूर्ण होई पर्यंत इसरा रक्कम व सुरक्षा रक्कम रोखून ठेवण्यात येत आहे असे सूचविलेले असतांना ही आज पर्यंत सदरील कंत्राटदारांना चौकशी बाबत काहीही कळविलेले नाही. पण स्वता: कंत्राटदारांनी सदरील कामा मध्ये झालेल्या नुकसानाची भरपाई व कामे केल्यावर Cantractor Profit (फायदा) मिळणारी रक्कम द्यावी म्हणून अनेकदा पत्र दिले. पण त्या पत्राबाबत ही प्रशासना मार्फत काहीही कळविण्यात आले नाही. तसेच सदरील कंत्राटदार हे कर्ज बाजारी झाल्यामुळे सदरील कंत्राटदाराने संदर्भ क्र. 15 द्वारे सी.डी.आर. परत मिळण्यासाठी अर्ज केला असता, सदर सी.डी.आर. हे दि. 10.10.2014 रोजी परत केले असता सदर कंत्राटदार हे सी.डी.आर. घेवून बँकेत गेले असता, बँक व्यवस्थापकांनी असे सांगितले की, महापालिकेने सदर सी.डी.आर.चे नुतनीकरण केलेले नाही. त्यामुळे कंत्राटदारांचा सी.डी.आर. वर मिळणारा व्याजाचे नुकसान झाले. त्यासाठी बुडालेल्या व्याज ही महानगरपालिकाने भरुन द्यावे. तसेच टप्पा

क्र. 1 मधील सर्व कामांची उपयोगीता पत्र (Utilization Certificate) शासनास सादर केलेले असल्यामुळे सदर कामाचे रद्द केलेल्या कामा बाबत किंवा चौकशी अहवाल नियमाप्रमाणे स्थायी समिती व सर्वसाधारण सभे पुढे ठेवणे गरजेचे असतांनाही त्यांनी स्थायी समिती किंवा सर्वसाधरण सभेस नजरेस आणून दिलेले नाही. तसेच संचिकामध्ये अधिक्षक अभियंता यांनी नोटसीट 20 वर 10 प्रमाणे महानगरपालिकेच्या कायदे सल्लागाराच्या अभिप्राय घेण्यासाठी कळविले असता, ते पण घेतले नाही. तसेच नोटसीट 21 वर पॅरा क्र. 2 मध्ये अधिक्षक अभियंता यांनी सदर कामाचे कार्यरंभ आदेश कोणत्या कलमाअन्वये रद्द करता येते हे कायदे सल्लागार यांचा अभिप्राय घेवूनच मगच निविदा रद्द करावी असे टिपणीवरुन दिसते. पण त्यांनी तसेच न करता एकतर्फा निविदा रद्द केली आहे. पण सदरील कामाच्या निविदा रद्द करते वेळी कोणत्याही कायद्याचा आधार न घेतल्यामुळे व नियम न पाळल्यामुळे तसेच एकतर्फी निर्णय घेतल्यामुळे व सदर कामाची चौकशी अहवाल सन 2010 ते 2015 पर्यंत स्थायी समिती व सर्वसाधारण सभे पुढे न आणल्यामुळे ही सर्वसाधरण सभा प्रशासनाने केलेली एकतर्फी कार्यवाही रद्द बातल ठरवते. तसेच कंत्राटदाराच्या करारनामा व अटी प्रमाणे कंत्राटदारास झालेल्या नुकसान भरपाई व कामापासून मिळणा-या नफ्याचे नुकसान भरपाई करुन देण्यासाठी तसेच टप्पा क्र. 1 मधील कामाचे उपयोगीता प्रमाणपत्र शासनाकडे कामे पुर्ण झाली म्हणून दिल्यामुळे सदर कामांच्या संदर्भ क्र. 4 च्या आदेशातील सर्व कंत्राटदारांच्या केलेल्या कामांचे व झालेल्या नुकसान भरपाईच्या रक्कमेचे व्याजासह अदाई करण्यास तसेच मल व जलनिस्सारणाच्या कामाच्या निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे होणारी बाजार दरवाढ अतिरिक्त बाबीवर व वाढीव झालेल्या कामासाठी लागणा-या जास्तीच्या ख्र्चास यापुर्वी सर्व साधारण सभेने ठराव क्रं. 132 दिनांक 24.11. 2014 अन्वये दिलेल्या मान्यता ठरावानुसार तसेच दलीत वस्ती योजना कामाच्या व आदेश क्रमांक 1538/2006 व 13687/2007 मधील तसेच मराठवाडा पॅकेज, अकरावे वित्त आयोग अंतर्गत झालेल्या कामावर निविदा अटी प्रमाणे बाजार दरवाढ, अतिरिक्त बाबीवर व वाढीव कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकानुसार संबंधीत कामासाठी लागणारा जास्तीच्या खर्चास हि सर्व साधारण सभा कार्योत्तर मान्यता देते. तसेच सदर कामाच्या खर्चासाठी लागणा-या रक्कमेस सन 2015-16 च्या अर्थसंकल्पात तरतुद अपुरी पडल्यास अर्थसंकल्पात पुनरनियोजन करुन तरतुद करण्यास व सदर कामांना पुर्नर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देते तसेच थकीत संबंधीत कंत्राटदारांची देयके त्वरीत अदायी करण्यास ही सर्व साधारण सभा मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करते.

**विषय क्र.२९** **प्रस्ताव**

नांवामनपाकेच्या स्थायी समितीने ठराव क्र. १४९ दि. २१.१०.२०११ रोजी संमत केलेल्या ठरावानुसार हि सर्वसाधारण सभा त्याठरावा प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून सदर ठराव त्याच सभेत कामय करते.

**सुचकः-** सरजितसिघ गिल **अनुमोदकः-** उमेश चव्हाण, चॉदपाशा कुरेशी

